**<u>प्रकरण - दुसरे</u>**

# गांधीवाद

**२.१ प्रस्तावना**

**२.२ महात्मा गांधी : एक अल्प परिचय**

**२.३. गांधीवादी विचारपरंपरा**

२.३.१ समग्र दृष्टिने विचार

२.३.२ राजकारण आणि धर्म

२.३.३ राज्यविषयक कल्पना

२.३.४ स्वराज्याची सकारात्मक संकल्पना

२.३.५ भौतिकबरोबरच नैतिक क्रांतीची गरज

२.३.६ नवा पर्याय

२.३.७ सर्वादय

२.३.८ समालोचन

**२.४ अहिंसा**

२.४.१ खालील प्रकारची हिंसा ही हिंसा नाही असे गांधीजी म्हणत.

२.४.२ अहिंसेसंबंधी गांधींनी सांगितलेली तत्त्वे

२.४.३ अहिंसेसंबंधी पाच साधी सिध्दांतसूत्रे

२.४.४ अहिंसेसंबंधी गांधींचे तत्त्व विचार

२.४.५ गांधींच्या अहिंसेची पाच प्रत्यक्ष प्रमाणे

२.४.६ शूरांची अहिंसा

२.४.७ संकल्पित अहिंसादलाच्या सभासदाला आवश्यक पात्रता

**२.५ सत्याग्रह**

२.५.१ सत्याचा आग्रह

२.५.२ सत्याग्रहाचे शस्त्र आणि शास्त्र

२.५.३ सत्याग्रही व्यक्तीच्या अंगी कोणते गुण असावेत ?

२.५.४ सत्याग्रहासंबंधीचे नियम

२.५.५ सत्याग्रहाची साधने/ अहिंसात्मक आंदोलनाची तंत्रे

२.५.६ सत्याग्रहाचा प्रयोग कोठे कोठे करता येईल ?

**२.६ महात्मा गांधींचे आर्थिक विचार**

२.६.१ सर्वोदय

२.६.२ सर्वोदय व साम्यवाद यांतील फरक

२.६.३ गांधींची ग्रामस्वराज्य संकल्पना

२.६.४ महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना

**२.७ महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार**

२.७.१  गांधीप्रणीत शिक्षणाची उद्दिष्टे

२.७.२  शिक्षणाच्या माध्यमासंबंधी गांधीचे विचार

२.७.३  शिक्षकासंबंधी गांधींचे मते

२.७.४ प्रौढ शिक्षणासंबंधी गांधीची मते

२.७.५ स्त्रीशिक्षणाबाबत गांधींचे विचार

२.७.६ हरिजन शिक्षणासंबंधी गांधींचे विचार

२.७.७ बालशिक्षण

२.७.८ धार्मिक शिक्षण

२.७.९ विद्यापीठीय शिक्षण

२.७.१० लैंगिक शिक्षण

२.७.११ शिक्षणातील विषय

२.७.१२ वर्धा शिक्षण योजना

**२.८ महात्मा गांधींचे धर्मविचार**

**२.९ सारांश**

## २.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात गांधीवाद म्हणजे काय? गांधींचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक विचार कोणते ? यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. श्री. अण्णा हजारे हे एक गांधीवादी नेतृत्व असल्यामुळे अण्णा हजारे यांच्या समग्र विचारांचा आणि केलेल्या एकूण कार्याचा अभ्यास करण्यापुर्वी महात्मा गांधींचा अल्प परिचय, महात्मा गांधींचे समग्र विचार, गांधीवाद म्हणजे काय? यांचा सुरवातीस अभ्यास करण्यात येईल.

## २.२ महात्मा गांधी : एक अल्प परिचय :

राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर नामक गावी झाला. काठियावाड संस्थानच्या पदरी दिवाण म्हणून त्यांच्या पूर्वजांनी काम केले होते. घरचे वातावरण अत्यंत धार्मिक होते. धर्मश्रध्देचा वारसा त्यांना प्रामुख्याने त्यांच्या मातेकडून मिळाला. वैष्णव पंथाचे संस्कार त्यांच्या मनावर अगदी बालपणापासून झाले; परंतु त्याचवेळी त्यांच्या घरात इतर पंथीयांना व इतर धर्मीयांना मुक्तद्वार असल्यामुळे सर्व धर्मांबद्दलच्या सहिष्णुतेचे बाळकडू त्यांना तेथेच मिळाले.

त्यांचे बालपण पोरबंदरातच गेले. त्यांचे विद्यार्थिजीवन फारसे उज्ज्वल म्हणता येणार नाही. ‘कोठल्याशा शाळेत मला घातले होते. कसेबसे काही पाढे शिकलो...दुसरे काही एक आठवत नाही. त्यावरून मी अनुमान करतो, की माझी बुध्दी मंद असावी आणि स्मरणशक्ती कच्च्या पापडासारखी असावी.’[१] असे गांधीं म्हणत. प्रकृतीने यथातथाच व स्वभावाने कचखाऊ असल्यामुळे त्यांना सवंगडीही फारसे लाभले नाहीत, घरकोंबडेपणा व एकलकोंडेपणा हे त्यांचे स्थायीभाव झाले. पुढे त्यांच्या बंधूंनी

त्यांना शिक्षणार्थ परदेशी पाठवले. विलायतेत त्यांची गाठ दोन थिऑसॉफिस्ट मित्रांशी पडली. त्यांचा सहवास गांधींच्या जीवनाला नवी दिशा दाखविण्यास कारणीभूत झाला. त्यांच्या प्रेरणेने गांधीं गीताध्ययनास प्रवृत्त झाले. दुसऱ्या अध्यायातील पुढील श्लोकाने गांधींच्या मनावर खोल ठसा उमटला.

ध्यायतो विषयान्पुंसः संङ्स्तेषूपजायते |

संङ्गात्संजायते काम : कामात्क्रोधोभिजायते ||

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः|

स्मृतिभ्रंशाद् बुध्दिनाशो बुध्दिनाशात्प्रणश्यति ||

गांधींनी स्वतःच यासंबंधी लिहिताना म्हटले आहे, की भगवद्गीता हा अमूल्य ग्रंथ आहे. अशी माझी त्या वेळी समजूत झाली. ती समजूत हळूहळू दृढ होत गेली व आज तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मी तिला सर्वोत्तम ग्रंथ समजतो.[२] त्याच त्यांच्या मित्रांनी बुध्दचरित्राशीही गांधींचा परिचय करुन दिला. एका ख्रिस्ती मित्राच्या सौजन्याने बायबलच्या अंतरंगात त्यांना शिरता आले. येशूच्या गिरिप्रवचनांची छाप फार चांगली पडली, ते गांधीजींच्या हृदयात उतरले. बुध्दीने त्याची गीतेशी तुलना केली.[३] या अनेक धर्मग्रंथांच्या समन्वयानेच गांधीच्या भावी जीवनाची तात्त्वीक पायाभरणी झाली आणि पुढे सत्याग्रहाच्या त्यांच्या प्रयोगाला लागणारी साधनसामग्री गोळा झाली. विलायतेतील वास्तव्याची दुसरी एक जमेची बाजू म्हणजे कायद्याची पदवी त्यांनी पदरात पाडून घेतली. पुढे विश्वस्त कल्पनेला जन्म देताना आणि दक्षिण आफ्रिकेत चंचुप्रवेश मिळवताना हे भांडवल त्यांना उपयोगी पडले.

काठियावाडला काही दिवस वकिली केली; पण तिथल्या वातावरणाला ते लवकरच विटले. इतक्यात पोरबंदरच्या एक मेमन पेढीतर्फे दक्षिण आफ्रिकेत दावा चालविण्यासाठी जाण्याची संधी त्यांना

मिळाली. गांधींच्या जीवनाला महत्त्वाचे वळण देणारी ही त्यांची दुसरी परदेशयात्रा ठरली. तिथे टॉलस्टॉय, रस्किन, आणि थोरो यांच्या विचारवैभवाशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांच्या जीवनावर, कार्यावर व तत्त्वज्ञानावर या त्रयींच्या विचारांचा खोल ठसा उमटला व तो पुढे जन्मभर टिकला. आपल्या आत्मकथेत एक संपूर्ण प्रकरण त्यांनी रस्किनच्या **अन टु धिस लास्ट** नामक पुस्तकाच्या आपल्यावर झालेल्या प्रभावाचे वर्णन करण्यासाठी खर्चिले आहे. त्यात ते म्हणतात, “हे पुस्तक वाचण्यास सुरवात केल्यानंतर माझ्याने ते सोडवेचना त्याने मला पकडून धरले.” [४] जोहान्सबर्ग ते नाताळ चोवीस तासांचा रस्ता आहे. ट्रेन संध्याकाळी डरबनला पोचली. पोचल्यानंतर सबंध रात्रभर झोप येईना. पुस्तकात दर्शविलेले विचार अमलात आणण्याचा विचार ठरला. पुढे त्यांनी या पुस्तकाचे गुजराथी भाषांतर ‘सर्वोदय’ या नावाने केले. ते म्हणतात, सर्वोदयाचे सिध्दांत मी समजलो ते असे.

१) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

२) वकील काय किंवा हजाम काय दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे; कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.

३) साधे, अंगमेहनतीचे, शेतकऱ्यांचे जीवन हेच खरे जीवन होय.

अर्थात रस्किनशी त्यांचे असे नैतिक, आध्यात्मिक सख्य जडले तरी राजकीय विषयावर त्या दोघांमध्ये मौलिक स्वरुपाचे मतभेद होते. रस्किन लोकशाहीपेक्षा सुज्ञांच्या शासनाची तरफदारी करीत होता. गांधींना हे पटणे शक्य नव्हते. राज्याचे स्वरुप आणि कार्ये याबद्दलही त्या दोहोंत मतभेद होते.

राजकीय क्षेत्रात गांधींच्या असहकारविषयक मतांना थोरोच्या विचारांनी पुष्टी दिली. दक्षिण आफ्रिकेत मी जे कार्य आरंभिले होते त्याला थोरोलिखित ड्यूटी ऑफ सिव्हिल डिसओबिडीयन्स या निबंधामुळे शास्त्रीय दृढता प्राप्त झाली अशा शब्दांत स्वत: गांधींनीच थोरोचे धोरण मान्य केले आहे.

मात्र राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात थोरो, रस्किन यांच्यापेक्षा टॉलस्टॉय यांचाच गांधींवर अधिक खोल प्रभाव पडलेला आढळतो. आपल्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टीचे श्रेय गांधी टॉलस्टॉयना देतात. स्वत:ला त्यांचे निस्सीम उपासक म्हणवतात. टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड' ग्रंथामधील 'ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे.' या संदेशामुळे गांधीजी भारावून गेले. त्यांचा संदेहवाद शमला. ते अहिंसेचे पुजारी झाले. 'आपल्या लेखनाची जी नायिका आहे व जी नितांत सुंदर असून आपले जिच्यावर प्रेम आहे तिचे नाव 'सत्य' हे आहे,' असे टॉलस्टॉयचे म्हणणे होते. गांधींनी आपल्या तत्त्वज्ञानात टॉलस्टॉय यांचाच 'दार्शनिक अराज्यवाद' उतरविला आहे. युरोपीय व पाश्चिमात्य सभ्यतेवर प्रखर टीका करण्यात या दोन महात्म्यांत कमालीचे साधर्म्य आढळते किंवा गांधींवर टॉलस्टॉयचाच सर्वाधिक प्रभाव पडलेला दिसून येतो.[५] मे ३०, १९१० रोजी गांधींनी टॉलस्टॉय फार्मची स्थापना केली. सविनय प्रतिकाराचे मार्ग व तत्त्वज्ञान यांच्या प्रयोगांची ती प्रयोगशाळा व्हावी अशी गांधींची अपेक्षा होती. ट्रान्सवालमधील गांधींचे कार्य अत्यंत महत्त्वाचे व मौलिक स्वरुपाचे असून संपूर्ण जगालाच उपकारक ठरणार असल्याचे मत टॉलस्टॉयनी गांधींना लिहिलेल्या एका पत्रात व्यक्त केले होते. अर्थात तरीही गांधीजी पूर्णत: टॉलस्टॉयवादी नव्हते. टॉलस्टॉयच्या प्रेरणेमुळे त्यांच्या कार्यात उत्साह वाढला असला तरी

त्यांची सत्याग्रह कल्पना टॉलस्टॉय यांच्या 'सविनय प्रतिकारा' पेक्षा निराळी आहे. किंबहुना ती तशी आहे म्हणूनच 'सविनय प्रतिकारा' ऐवजी 'सत्याग्रह' अशी नवी संज्ञा गांधीनी उपयोजिली.

दक्षिण आफ्रिकेत गांधींना सत्याग्रहाचा मार्ग गवसला. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना न्याय मिळवून देण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न म्हणजे सत्याचेच प्रयोग होते. १८९३ ते १९१४ या काळात त्यांचा गोऱ्या सरकाराविरुध्द अहिंसात्मक लढा सुरु होता. आत्म्याच्या शस्त्राने त्यांनी अत्याचाराशी झुंज दिली आणि शेवटी ते यशस्वी झाले. दक्षिण आफ्रिकेतील या लढ्याला स्वयमेव महत्त्व तर आहे; पण गांधींच्या जीवनकार्यात, त्यांनी पुढे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी उभारलेल्या जनआंदोलनाच्या संदर्भात दक्षिण आफ्रिकेतील अनुभवाला एक पूर्वतयारी म्हणूनही अत्यंत महत्त्वांचे स्थान आहे. गांधींचे नेतृत्व त्यातून जसे प्रस्थापित झाले, त्याचप्रमाणे अहिंसात्मक चळवळीचे एक नवसाधनही त्यातून निष्पन्न झाले.

भारताच्या राजकारणात गांधींनी प्रवेश केला तो काळ पहिल्या महायुध्दाच्या परिसमाप्तीचा काळ होता. त्या वेळी चळवळीची अवस्था द्विधा झाली होती. मवाळ आणि नेमस्त यांच्यातील संबध दुरावले होते; मात्र गांधींबद्दल त्या दोन्ही गटांना सारखाच आदर होता. गोखल्यांना गांधी आपले राजकीय गुरु मानत. अर्थात त्यांच्या विचारांची बैठक व साधनशुचितेचा आग्रह आणि राजकारणाचे आध्यात्मीकरण इत्यादी संकल्पना गोखल्यांपासून त्यांनी उचलल्या असल्या तरी असहकारादी त्यांचे मार्ग गोखल्यांपेक्षा टिळकांशीच त्यांचे साधर्म्य स्पष्ट करतात असे दिसून येते. पाश्चात्त्य सभ्यतेच्या मूल्यांकनाबद्दल गांधी-गोखले यांच्यात जमीन -अस्मानाचे अंतर आढळते. किंबहुना असेही म्हणता येईल, की गोखले- टिळक या दोन्ही प्रवाहांच्या समन्वयातून एक तिसराच अभिजात प्रवाह गांधींनी निर्माण केला. यातच त्यांच्या यशाचे रहस्य होते. गांधीं उदयापूर्वी फक्त दोनच मार्ग ज्ञात होते. एक, सनदशीर व शांततामय चळवळीचा

आणि दुसरा, बेसनदशीर व हिंसक उठावाचा. 'अहिंसक युध्द' व 'शांततामय क्रांती' या संकल्पनाही अजून कुणाच्या ऐकिवात नव्हत्या. गांधींनी प्रथमच जी सनदशीर असेल वा नसलेही; पण शांततापूर्ण असेलच अशी अभिनव चळवळ जनतेसमोर मांडली.[६]

रौलेट कायदा व जालियनवाला बाग या प्रकरणी सरकारविरुध्द गांधींनी १९२१ मध्ये सुरु केलेल्या असहकाराच्या अहिंसात्मक आंदालनाने देशात नवचैतन्याची लाट उसळली. चौरीचौरा येथे चळवळीने हिंसक वळण घेताच गांधींनी असहकार मागे घेतला. कारण केवळ सत्य, अहिंसा या नैतिक शस्त्राच्याच बळावर चळवळ चालावी असा त्यांचा आग्रह होता. त्या दृष्टीने त्यांच्या पहिल्या चळवळीस अपयश आले. त्यानंतर त्यांनी अधिक जोमाने, अधिक पध्दतशीरपणे व सूत्रबध्दरीत्या चळवळ उभी करण्याचा प्रयत्न सुरू केला. रचनात्मक कार्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. खादी ग्रामोद्योगास उत्तेजन दिले. 'यंग इंडिया' नामक साप्ताहिक काढून निरनिराळ्या विषयांवर लेखन केले. त्यानंतर 'हरिजन' नावाचे बहुभाषीय नियतकालिक सुरु केले.

१९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये पूर्ण स्वराज्याचे ध्येय जाहीर केले. गांधींच्या हाती दुसऱ्यांदा अहिंसात्मक आंदोलनाची सूत्रे आली. १९३० मध्ये देशव्यापक सविनय कायदेभंगाचा आदेश त्यांनी दिला. गांधींना अटक झाली तरी कायदेभंगाचे पाऊल मागे हटले नाही. याच सुमारास लॉर्ड आयर्विन यांच्याशी एक करार त्यांनी केला. गांधी - आयर्विन करार म्हणून तो प्रसिध्द आहे. त्यानुसार लंडनच्या गोलमेज परिषदेस ते उपस्थित राहिले; परंतु जातीय समस्येवर तोडगा काढण्यास परिषदेस यश येऊ शकले नाही. गांधींनी पुन्हा सत्याग्रह सुरु केला. तो १९३४ पर्यंत चालला. गांधी त्या वेळी हिंदुस्थानचे एकमेवाद्वितीय नेते ठरले. एवढ्या प्रचंड देशातील एवढ्या विराट चळवळीचे नेतृत्व एकट्या व्यक्तीच्या हाती असल्याचा

जगाच्या इतिहासातील हा पहिलाच प्रसंग होता. १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वये प्रांतांमध्ये मंत्रिमंडळे अस्तित्वात आली. द्वितीय महायुध्दाच्या वेळी भारतीयांच्या इच्छेविरुध्द हिंदुस्थान युध्दात सामील असल्याचे इंग्रज सरकारने जाहिर केले. याच्या निषेधार्थ काँग्रसी मंत्रिमंडळाने राजीनामा दिला आणि काँग्रेसने गांधींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह चालवला.

गांधींच्याच प्रेरणेने १९४२ मध्ये ‘चले जाव’ चळवळ सुरु झाली. त्या चळवळीने या देशातील इंग्रजी साम्राज्याचा पाया खिळखिळा केला. गांधींना अटक झाली. कारागृहात त्यांनी आत्मशुध्दीस्तव उपोषण केले. १९४४ मध्ये त्यांना सोडण्यात आले. त्या वेळी जिनांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानच्या मागणीने मूळ धरले होते. आपला द्विराष्ट्र सिध्दांत ते आग्रहाने प्रतिपादित होते. गांधींना फाळणीची कल्पना पसंत नव्हती. अस्पृश्योध्दाराइतकेच हिंदु-मुस्लिम ऐक्य हे त्यांचे अत्यंत प्रिय स्वप्न होते. जिनांशी त्यांनी वाटाघाटी केल्या; पण त्या फिसकटल्या. कॅबिनेट मिशन योजनेअंतर्गत झालेल्या निवडणुका गांधींच्याच नावावर काँग्रेसने जिंकल्या. १९४६ मध्ये काँग्रसचे अंतिम शासन सत्तेवर आले. माऊंटबॅटन योजनेनुसार हिंदुस्थानची भारत व पाकिस्तान अशी फाळणी होऊन १९४७ मध्ये ते दोन्ही देश स्वतंत्र झाले. गांधींचे एक स्वप्न साकार झाले; मात्र तितकेच प्रिय स्वप्न भंग पावले होते. त्यांच्या इच्छेविरुध्द हिंदुस्थान दुभंगला होता.

३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे याच्या गोळ्यांना त्यांचा नश्वर देह बळी पडला. गांधींना मारुन गांधींची शिकवण मारता आली नाही. उलट दुप्पट जोमाने ती उसळी मारुन वर आली. आयुष्यभर नव्हता, तेवढा प्रभाव गांधींना या हौतात्म्याने प्राप्त करुन दिला.[७]

## २.३ गांधीवादी विचारपरंपरा :

गांधीवाद असा एखादा `वाद` अस्तित्वात नाही असे स्वतः गांधींनी जरी म्हटले असले, तरीपण त्यांच्या विस्तृत आणि विविध विषयांवरच्या लेखनसंभारातून गांधीवादी राजकीय विचाराची मांडणी करणे मुळीच अशक्य नाही. एवढेच नाही तर अशी मांडणी करण्याचे अनेकानेक प्रयत्न आजवर झाले आहेत. भारतीय स्वातंत्र्यलढ्यांचे नेतृत्व गांधींकडे आले तोपर्यंत क्रांतिकारकांचा राष्ट्रवाद, जहालांचा राष्ट्रवाद, नेमस्तांचा उदारमतवाद अशा काही विचारप्रवाहांचा प्रभाव दिसून आला होता. गांधी हे गोखल्यांचे शिष्य असले तरी नेमस्तांपेक्षा त्यांच्या विचारांचे मूलस्त्रोत, त्यांच्या पश्चिमी सभ्यतेविषयीच्या धारणा, कार्यपध्दती व साध्य या प्रत्येक बाबतीत गांधींचे वेगळेपण स्पष्ट होते. जहालांप्रमाणे धार्मिक परिभाषा, स्वाभिमान, स्वदेशीवर भर, लोकसंग्रह,भावनिकता गांधींच्याही विचारात असली तरी साध्यसाधनविवेक, सामाजिक सुधारणा, हिंसेबद्दलची भूमिका, संघर्षाचे स्वरुप वगैरे अनेक बाबतीत गांधी जहालांशी सहमत होऊ शकत नव्हते. गांधींचे हे वेगळेपण, त्यांच्या विचारांच्या ठिकाणी असलेली आवाहकता व प्रभावक्षमता आणि स्वतंत्र भारताने जरी त्यांची तत्त्वे उपेक्षिली तरी आजच्या जागतिक परिस्थितीत जगभराच्या चिंतकांना जाणवू लागलेली त्या तत्वांची उपयुक्तता लक्षात घेता गांधीवादी विचारांचा ऊहापोह करणे गरजेचे ठरते.

### २.३.१ समग्र दृष्टीने विचार :

गांधींच्या आधी आधुनिक भारतातील कोणत्याही चिंतकाने त्यांच्याइतका सर्वस्पर्शी विचार केला होता असे दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा, शेती

कोणतेही क्षेत्र असो- वैयक्तिक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत, गावापासून विश्वापर्यंत प्रचंड मोठा आवाका गांधीविचाराने व्यापला आहे. मानवावर प्रभाव टाकणाऱ्या सर्व प्रक्रियांचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्यांचे मूलगामी चिंतन गांधींनी केले होते. माणसाचा विचार करताना कोणतेही आयात तत्वज्ञान स्वीकारुन त्यानुसार मानवी जीवनाचा अर्थ गांधींनी लावला नाही. तर माणसाची प्रगती ज्या अनेकानेक क्षेत्रांतील सुयोग्य प्रक्रियांवर अवलंबून असते त्यांचा समग्र दृष्टीने मागोवा घेऊन, त्या सर्व प्रक्रिया मानवांच्या सुखशांतीमध्ये कशा परिणत होतील याचे सर्वस्पर्शी, सर्वलक्ष्यी व सर्वहितकारक विश्वमानवदर्शन देण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता; त्यामुळेच जात, धर्म, पंथ, वर्ग, राष्ट्र इत्यादी भेदभाव मनात न आणता मानवांच्या भवितव्याबद्दल आस्था बाळगणारे सर्वविचारी मानव गांधींच्या विचारामुळे प्रभावित झाले आहेत.[८]

जीवन हेच परम सत्य असून त्याची सगळी अंगोपांगे मिळून एक अखंड पूर्णांक बनला आहे हे सत्य माणसाच्या रोजच्या व्यवहारात साकार करण्याचा प्रयत्न गांधींनी केला. हीच त्यांची जीवनसाधना होती, तिलाच त्यांनी ‘सत्याचे प्रयोग’ असे नाव दिले होते. माणसामाणसांच्या संबंधात जीवनाच्या एकतेकडे वाटचाल करत राहणे म्हणजे सामाजिक प्रगती आणि त्या दिशेने केलेले प्रयत्न म्हणजे सत्याचे प्रयोग अशा त्यांच्या व्याख्या होत्या. ब्रिटिशांविरुध्दच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करण्याची ऐतिहासिक जबाबदारी गांधींनी पार पाडली, तत्पूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या जुलमी सताधाऱ्यांविरुध्द तिथल्या भारतीयांना संघटित करुन त्यांनी सत्याग्रहाचे नवे लढातंत्र विकसित केले. हे खरे असले तरी त्यांच्या विचारांचा बंध जो निष्पन्न झाला त्याचे लक्ष्य केवळ त्या ऐतिहासिक घटनांपुरते सीमित राहिलेले नव्हते. आधुनिक सभ्यतेने जे सत्तेचे अफाट केंद्रीकरण केले आहे आणि जो टोकाचा व्यक्तिवादी विचार

प्रचलित केला आहे, त्याला उचित पर्याय देण्याचे व्यापक उद्दिष्ट त्यांच्या चिंतनाचे होते. जगाच्या सामाजिक इतिहासात केंद्रीभूत सत्ता आणि अतिरिक्त व्यक्तिवाद या दोन प्रवृत्तींनी समुदायाच्या सुसंवादी व जैविक संरचनांचा विध्वंस केला असून परिणामस्वरुप सामाजिक परात्मभाव आणि आर्थिक दारिद्र्य यांच्यात वाढ होणे अटळ झाले आहे असे गांधींचे निदान होते. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण विचाराचा रोख आधुनिक सभ्यतेतील विध्वसंक प्रवृत्तींचा बीमोड करुन त्यांना रचनात्मक सामाजिक पर्याय कसे देता येतील यावर होता. गांधींनी आधुनिक सभ्यतेचे पायाभूत आधारच प्रश्नांकित केले. आधुनिक पाश्चिमात्य जीवनशैलीतील विलासीकरण, आक्रमकता, निधर्मीपणा, तंत्रज्ञानशरणता इत्यादी वैशिष्ट्ये त्यांना भावत नव्हती. दुर्बल राष्ट्रांच्या शोषणावर पश्चिमी औद्योगिक सभ्यतेची उभारणी झालेली असल्यामुळे उच्च विचारसरणीशी ती विसंगत आहे. ती अंधकार युगाची व रुग्णाईत स्वरुपाची आहे. वस्तुसंचयाचा आत्यंतिक सोस बाळगल्यामुळे मानवी मूल्यांचा ऱ्हास या सभ्यतेने अटळ ठरतो. निसर्गाच्या जवळ जाणारी, निसर्गाशी जुळवून चालणारी, स्वेच्छेने स्वीकारलेल्या साधेपणाची संस्कृतीच खरी मानवी संस्कृती गांधींच्या मते असू शकते.

देशाविषयी गांधींना वाटणारी भक्ती हा शाश्वत मुक्तीच्या आणि शांतीच्या दिशेने सुरु असलेल्या त्यांच्या प्रवासातील केवळ एक टप्पा होता. स्वतः त्यांनीच म्हटल्याप्रमाणे : “अखिल मानवजातीशी मी एकरुप आहे असे जर मी मानले नसते तर धर्मपरायण जीवन घालवणे मला शक्य झाले नसते आणि मानव जातीशी एकरुप व्हायचे तर राजकारणात भाग घेतल्यावाचून मला गत्यंतर नव्हते, माणसाच्या कर्मप्रवृत्तीचा एकूण पसारा अविभाज्य असा आहे. त्यात तुम्हाला हे सामाजिक, हे आर्थिक, हे राजकीय आणि हे शुध्द धार्मिक असे आखबंद कप्पे पाडताच येत नाहीत....राजकीय क्षेत्रात मला पदार्पण करणे

भाग पडले कारण सामाजिक कार्यसुध्दा राजकारणाला स्पर्श केल्यावाचून शक्य होणार नाही असे मला आढळून आले”

### **२.३.२ राजकारण आणि धर्म :**

गांधीवाद ही अध्यात्मवादावर आधारित एक स्वतंत्र विचारपध्दती आहे. किंबहुना तिला विशिष्ट प्रकारचा अध्यात्मवाद असे म्हटले तरी चालेल. गांधी पक्के हिंदू होते. स्वतःला ते सनातनी हिंदू म्हणवत असत; पण सर्व धर्मांत मूलभूत ऐक्य असल्यामुळे सर्व धर्मांचे प्रामाण्य त्यांना मान्य होते. शब्दप्रामाण्याला मात्र त्यांच्या विचारात स्थान नव्हते. सर्व धर्मग्रंथ मानवनिर्मित असल्यामुळे मानवाच्या स्वाभाविक मर्यादा त्यांच्यावरही पडणे त्यांना अपरिहार्य वाटत होते. ईश्वर हा ज्ञानापेक्षा अनुभवण्याचा विषय आहे अशी तुलसीदास, चैतन्य प्रभू, तुकाराम प्रभृतींप्रमाणे गांधींची धारणा होती. ईश्वर हा सर्वांचा अंतरात्मा असतो. जीवात्मा हा त्याचाच अंश असतो; त्यामुळे त्याची उपासना करणारी नास्तिक व्यक्तीही गांधींच्या मते धार्मिकच असते. “गांधीवाद हा मूलतः धार्मिक मानवतावाद आहे. नीतिशास्त्र, समाजरचना व राजनीती यांना आधारभूत अशी नैतिक दृष्टी या मानवतावादात स्वीकारलेली आहे.”[१०]

जहाल आणि नेमस्त यांच्यापेक्षा अगदीच वेगळ्या दृष्टीने गांधींनी राजकारण व धर्म यांच्या आंतरसंबंधांची मांडणी केली. मानवी इतिहासातील एक सृजनशील शक्ती म्हणून गांधी धर्माला मानत होते. तत्त्वज्ञान, नीती, आचार आणि विवेक या चारही लक्षणांचा समन्वय म्हणजे धर्म असतो; पण प्रत्यक्षात हा समन्वय सर्वच धर्मांतून लुप्तप्राय झाल्यामुळे धर्म हा केवळ उपचाराचा भाग उरला आहे.

प्रत्येकाने जर आपापल्या धर्माचे तत्त्वज्ञान व नीती यांची प्रामाणिक उपासना केली तर ती योग्य धर्मसाधना तर होईलच, शिवाय सगळे धर्म हे सत्यधर्माच्या किंवा आध्यात्मिक मानवधर्माच्या शाखा आहेत हेही समजू शकेल. सत्य आणि अहिंसा या दोहोंच्या द्वारे नैतिक परिपूर्णता मिळवण्याचे प्रतीक त्यांना धर्मात दिसत होते. हिंदू धर्म श्रेष्ठ आहे असे ते मानीत. प्रत्येकाने स्वतःच्या धर्माचा अभिमान बाळगणे म्हणजे दुसऱ्या धर्माचा अपमान नव्हे हेही त्यांच्या मते प्रत्येकाने लक्षात घ्यायलाच पाहिजे. त्यांची धर्मदृष्टी संकुचित नव्हती. 'माझ्या धर्माला भौगोलिक सरहद्दी नाहीत' अशी त्यांची भूमिका होती. सर्व धर्मांप्रति त्यांना समान आदर होता. ईश्वरानेच सर्व धर्म स्थापन केले असल्यामुळे शेजाऱ्याचा धर्म माझ्या धर्मापेक्षा कनिष्ठ आहे तेव्हा त्याने स्वतःचा धर्म सोडून माझ्या धर्मात यावे अशी सुप्त इच्छाही कोणी बाळगता कामा नये असे गांधी मानत असत. वैश्विक मुक्ती हेच त्यांचे आध्यत्मिक गंतव्य होते, व्यक्तिगत मोक्षामागे धावणे हे नव्हे.

राजकारणाचे आध्यात्मीकरण किंवा नैतिकीकरण करावे हा गांधींचे गुरु गोखले यांचा संदेश होता. माणसाला ईश्वराशी तसेच माणसाला माणसाशी जोडण्याचे कार्य धर्मातून साधते; कारण धर्मच माणसातील पाशवी प्रवृत्तींचे नियमन करु शकतो. धर्माशी राजकारण जोडले जाण्यातून राजकारणाचे शुध्दीकरण व उन्नयन घडून येणे गांधींना अभिप्रेत होते. धर्माचे सामाजिक जीवनातून निर्मूलन करु पाहणे व्यर्थ तर आहेच पण जर तो प्रयत्न यशस्वी झालाच तर ती समाजजीवनाचीच अखेर ठरेल, अशी त्यांची खात्री होती. भारतीय राजकारणातील गांधीपर्वाचा उल्लेख काही लेखक 'संतपणाचे राजकारण' असा करतात. 'माझ्यातल्या राजकारण्याचा माझ्या एकाही निर्णयावर मी वरचष्मा होऊ दिलेला नाही' अशी कबुली देऊन गांधींनी पुढे असे म्हटले होते, 'मी राजकाणात भाग घेतो; कारण आज कोणी कितीही

प्रयत्न केला तरी राजकारणातून त्याची सुटका नाही. एखाद्या सापाप्रमाणे राजकारणाने आपल्याभोवती विळखा घातला आहे. मी त्या सर्पाशी जाणीवपूर्वक १८९४ पासून आणि अजाणतेपणे कळू लागल्यापासून झटापट करतो. आजूबाजूच्या घोंगावणाऱ्या वादळातही शांत राहता यावे या स्वार्थाखातर म्हणा, हवे तर मी स्वतःवर व मित्रांवर राजकारणात धर्म आणण्याचे प्रयोग करीत आहे.' याचा अर्थ स्पष्ट आहे. गांधी व्यक्तीचे शुध्दीकरण करुन तिच्या अर्थपूर्ण व सृजनशील सामाजिक व राजकीय कृतीच्या क्षमता वाढवू पाहत होते. मानवी समाजात उन्नयन त्या कृतीतून त्यांना घडवून आणायचे होते. माणसाच्या स्वार्थी व संकुचित प्रेरणांवर मात करणाऱ्या नैतिक व आध्यात्मिक प्रेरणा राजकारणाच्या पाठीशी उभे करण्याचा गांधींचा हा प्रयत्न अभूतपूर्वच म्हणायला हवा. धर्मविरहित राजकारण म्हणजे निव्वळ कचरा आहे. प्रत्येकाने तो दूर ठेवावा. राजकारणाचा संबंध समाजाच्या व्यापक हितसंबंधांशी असल्यामुळे धर्माच्या अधिष्ठानाखेरीज खरे राजकारण संभवतच नाही. धर्माने परिष्कृत झालेले व्यक्तिजीवनच स्वतःच्या उद्दिष्टांचा समाजाच्या हितसंबंधांशी मेळ घालू शकते. अर्थात धर्माचे असे महत्त्व सांगणाऱ्या गांधींना धर्माधिष्ठित राज्य स्थापन करणे मुळीच अभिप्रेत नव्हते. एवढेच नव्हे तर राजकारणाखातर लोकांच्या धार्मिक भावनांचा वापर करणेही त्यांच्या विचारात सपशेल बसणारे नव्हते. गांधीवादी परंपरेतील सर्वोदय विचारानेही हीच धर्मविषयक भूमिका पुढे चालवलेली दिसून येते. प्रत्येक धर्माचा गाभा मानवता, क्षमाशीलता, सहिष्णुता, प्रेम हाच असल्यामुळे सत्तेच्या राजकारणात वावरणाऱ्या व्यक्तींच्या औध्दत्याला लगाम घालण्याचे सामर्थ्य फक्त धर्मातच असू शकते हे गांधीवादी विचारपरंपरेचे गृहीतकृत्य होते. विद्यमान सामाजिक, राजकीय व आर्थिक संस्थांना अशा एका नैतिक पातळीवर आणायचे, की समाजजीवनातील सर्व अरिष्टांचा अंत होऊन रामराज्य स्थापन होईल असा त्या

परंपरेतील चिंतकांचा प्रयत्न होता. त्यामुळेच धर्मविरहित राजकारणाला ते आत्म्याला ठार करणारा मृत्यूचा सापळा मानत होते; पण त्याचवेळी त्यांच्या धर्मकल्पनेत संकुचित पंथवाद, धर्मपिसाटपणा किंवा जमातवाद यांना मुळीच थारा नव्हता.

गांधीवादाने राजकीय क्षेत्रात नैतिकतेचे आणि सभ्यतेचे बीज पेरण्याचा अभूतपूर्व प्रयत्न केला. परंपरागत राजकारणाचे सूत्र व्यवहारवादी होते. त्याला आदर्शवादाची मुरड गांधीवादी विचारप्रवाहाने घालण्याचा जो प्रयत्न केला होता, त्याला जगात तोड नाही. “आजचा मित्र उद्याचा शत्रू असू शकतो. त्यामुळे आजच्या मित्रापासून सावध राहा” असा प्रचलित राज्यशास्त्राचा संकेत होता. गांधीप्रणीत सदाचाराचे सूत्र याच्या अगदी उलट आहे. ते असे, की “आजचा शत्रू उद्याचा मित्र असू शकतो. म्हणून आजपासूनच विश्वास ठेवायला सुरवात करा.” गांधीवादाच्या मते ही विश्वासपरायणताच मानवी व्यवहारांतील वीरतेचे तत्त्व होय. तिलाच वास्तविक वीरता किंवा वास्तविक आस्तिकता असे नाव आहे. या आस्तिकतेचा विनियोग गांधींनी राजकारणात केला होता.

### २.३.३ राज्यविषयक कल्पना :

गांधीवादी विचारपरंपरेची राज्यविषयक संकल्पना तिच्या धर्मचिंतनाशी सुसंगतच म्हणावी लागेल. गांधींच्या आदर्श रामराज्यांतील राज्य संस्था मूलतः अहिंसक असणार होती. राज्यविषयक अ-राज्यवादी (अनार्किस्ट) दृष्टिकोनाला हे धरुनच होते. राज्यसंस्थेने आणि लोकांनीही अहिंसक राजकीय कृतीशी बांधिलकी ठेवल्यास अहिंसक समाजाची निर्मिती शक्यतेच्या कोटीत येईल अशी गांधींना खात्री

होती. 'सुविहित अराज्यस्थिती' (ऑर्डर्ड अनार्की) किंवा 'प्रबुध्द अराज्यस्थिती' (एन्लायटन्ड अनार्की) असे गांधींच्या आदर्श राज्याचे स्वरुप होते. पोलिस राज्याला जसा यात नकार आहे त्याचप्रमाणे अतिव्यापक कार्यक्षेत्र असलेल्या कल्याणकारी राज्यालाही आहे. राज्यसत्ता ही हिंसेचे मूर्त रुप असल्यामुळे तिची सत्ता जितकी न्यूनतम असेल तेवढे मानवी स्वातंत्र्याला ते उपकारक ठरेल हा गांधींचा विचारच विनोबांच्या भूदान विचारातून आणि जयप्रकाश नारायण यांच्या लोकशक्ती संकल्पनेतून केलेला दिसून येतो.

सामाजिक अन्याय दूर करुन न्यायावर आधारित समाजरचना उभी करण्याच्या संदर्भात किंवा आमूलाग्र सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या बाबतीत हिंसेला सफलता प्राप्त झालेली नाही. वर्गहीन समाजाच्या निर्मितीसाठी जनतेने सशस्त्र क्रांती केली तरी क्रांतीनंतर ज्या राज्यसत्ता सर्वहारांच्या सर्वाधिकारशाहीच्या स्वरूपात उभ्या राहिल्या, त्यांना भांडवलशाही उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेला समूळ पर्याय उपलब्ध करुन देता आला नाही. औद्योगिक संस्कृतीच्या विध्वंसक आक्रमकतेला प्रभावी पायबंद घालणे साम्यवादी किंवा समाजवादी राज्यव्यवस्थांना साध्य झाले नाही. त्यामुळे गांधीवाद असे मानतो, की उद्योगवादातच (इंडस्ट्रियालिझम) हिंसा अंतर्भूत असते. कितीही सामाजीकरणाची मात्रा दिली तरी त्याचा हा अंगभूत विकार दूर होऊ शकत नाही. मुळापासूनच पर्यायांचा शोध घेणे त्यामुळे क्रमप्राप्त ठरते. बळावर आधारित राज्यसत्ता नव्हे तर व्यक्ती आणि राज्य यांच्यात दुहेरी, अर्थपूर्ण आणि सृजनशील संबंध जोडणारी राज्यसंस्थाच समाजाला हितकारक ठरु शकते. गांधींचा हाच विचार सर्वोदय, समग्र क्रांती, सामुदायिक राजकारण अशा संकल्पनांच्या स्वरुपात गांधीवादी चिंतकांनी मांडला आहे. राज्यसत्तेच्या आज्ञांचे व्यक्तींनी पालन करण्यातून राज्यसत्तेला अधिमान्यता लाभते; पण कधी कधी असे

प्रसंग येतात जेव्हा व्यक्ती व राज्यसंस्था यांच्या हितसंबंधांत स्पष्ट अंतर्विरोध उद्भवतात. अशा वेळी एकेकट्या व्यक्तीनेही राज्यसत्तेच्या विरोधात सत्याग्रह पुकारण्याची तयारी ठेवावी असे गांधीवाद सांगतो.

### २.३.४ स्वराज्याची सकारात्मक संकल्पना :

गांधींचा राजकीय क्षितिजावर उदय होईपर्यंत किमान काँग्रेसच्या व्यासपीठावरुन तरी स्वातंत्र्याचा अर्थ ब्रिटिश सत्तेने भारतातून निघून जाणे एवढाच मांडला जात असे. परकी सत्ता जाऊन स्वकीयांची सत्ता येणे हा स्वातंत्र्याचा नकारात्मक अर्थ होता. गांधींनी स्वातंत्र्याचा अधिक समावेशक आणि सकारात्मक अर्थ सांगितला. त्यांच्या मते, स्वातंत्र्य हे राजकीय, आर्थिक व नैतिक अशा तिन्ही प्रकारचे असावे. राजकीय संदर्भात स्वातंत्र्याचा अर्थ सैन्यबळाचा ताबा देशावर असता कामा नये आणि परकीय सत्तेचे आधिपत्यही राहू नये. आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे परकीय भांडवलवाल्यांपासून तसेच त्यांच्या देशी भाऊबंदांपासून देशाची सर्वस्वी मुक्तता व्हावी. नैतिकदृष्ट्या स्वतंत्र समाज प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा प्रस्थापित होऊन समानता हा सर्व सामाजिक संबंधांचा जेव्हा आधार असतो तेव्हाच शक्य होतो. सत्य, अहिंसेच्या पायावरच असा समाज उभा राहू शकतो. ज्या आदर्श स्वराज्याचे गांधींनी रामराज्य असे वर्णन केले त्याचा दशरथपुत्र रामाशी संबंध नाही तर ज्यात संपन्नता व दारिद्र्य ही विषमता तसेच वर्णवंशभेद व स्त्री - पुरुषविषमता मावळलेली असेल; प्रत्येकाला न्यायाची स्वस्त, त्वरित व निर्दोष स्वरुपात प्राप्ती होईल; प्रत्येकाला उपासनेचे व भाषणाचे स्वातंत्र्य असेल; सर्वांच्या प्राथमिक गरजा भागतील, भूक, भय, व्यसनाधीनता व हिंसा यांपासून समाज मुक्त असेल अशा राज्याचे ते आदर्शचिंतन होते.

गांधीवादानुसार राज्यतंत्रात इंग्रज आहेत, त्याऐवजी भारतीय असावेत एवढीच स्वराज्याची व्याख्या केल्यास बहिष्कार वगैरे गोष्टी वायफळ आहेत. इंग्रज सरकारच्या राजनीतीची तर्कशुध्द परिणती येथे युरोपीय सभ्यतेचा समाज निर्माण करणे हीच आहे. तसा समाज निर्माण झाल्यावर ते स्वतःच सत्ता सोडून निघून जातील; पण ते खरे स्वातंत्र्य आवश्यक आहे. जगातील कोणत्याही देशापेक्षा भारतीय संस्कृतीमध्ये सत्य, अहिंसेसारख्या मानवी नीतिमूल्यांच्या दृष्टीने तसेच विश्वधर्माच्या स्थापनेच्या दृष्टीने विशेष मोलाचे असे काहीतरी आहे. त्यामुळेच गांधीवादी विचारप्रवाह असे मानतो, की राज्यक्रांती, समाजक्रांती आणि विश्वशांती यांचा मेळ घालून सर्व मानवांचे स्वातंत्र्य, समता, शांतता व भावंडभाव या मूल्यांवर आधारित विश्वकुटुंबाचे स्वप्न साकार करण्यासाठी भारताला स्वतंत्र व्हायचे आहे.

राजकारणाच्या प्रचलित पध्दती विश्वकुटुंबाचे आदर्श प्रत्यक्षात आणण्याबाबत केवळ कुचकामीच नव्हे, तर त्या आदर्शाला बाधकही आहेत. साम्राज्यवाद जावा, वसाहतवाद इतिहासजमा व्हावा यासाठी जगभर अनेक चळवळी झाल्या. व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित लोकशाहीची कास काहींनी धरली, तर काहींना आर्थिक समतेवर भर देणाऱ्या समाजवादी विचाराने आकर्षित केले. युध्दाचे भीषण परिणाम पाहिल्यानंतर पुन्हा त्या संहारक संकटात मानवजातीला पाहावे लागू नये अशा उपायांचा शोधही जगभर सुरुच आहे. प्रत्यक्षात मात्र विश्वशांतीच्या आदर्शापासून जग खूपच दूर आहे. उलटपक्षी मानव समाजाला भयभीत करणाऱ्या अनेक घटना घडत असून हिंसक-विध्वंसक प्रवृत्ती अधिकाधिक उग्र होत चालल्या आहेत. असे का व्हावे ? विकास साध्य केलेला माणूस अमानुष का बनतो आहे? असे काही प्रश्न जगभरातल्या विचारवंतांना सतावत आहेत. स्वतंत्र भारताच्या लोकशाहीने या प्रश्नांची उत्तरे जगाला द्यावीत अशी गांधींची अपेक्षा होती. या लोकशाहीत हिंसाबळाला राजमान्यता वा लोकमान्यता मिळता

कामा नये. जनतेच्या ठिकाणी अहिंसात्मक आत्मबल संघटित होऊन त्याने राज्यसत्तेला वठणीवर ठेवावे. सत्याग्रही जनशक्ती असेल तरच सामाजिक न्याय स्थापन होऊ शकेल. अन्यथा कोणत्याही प्रकारची शासनव्यवस्था सामाजिक न्याय आणू शकणार नाही अशी गांधींची खात्री होती.

व्यक्तीचे स्वातंत्र्य संपूर्ण समुदायाच्याच स्वातंत्र्यानुभवाचा भाग असू शकतो. समुदायापासून सुटा असा व्यक्तिस्वातंत्र्याचा विचारच करता येत नाही. अंतिमतः समस्त मानवजातीचे स्वातंत्र्य हीच गांधींना व्यक्तीच्या स्वातंत्र्याची खरी हमी वाटते. एकाची स्वातंत्र्यसाधना जर दुसऱ्याच्या स्वातंत्र्याआड येत असेल तर स्वातंत्र्याचा तो विचारच एकमितीय ठरतो. माणसा-माणसांतील तसेच मानव आणि निसर्ग यांच्यातील सुसंवाद अशी जर स्वातंत्र्याची व्याख्या केली तर ते स्वातंत्र्य माणसाला माणूस-निसर्ग यांच्यातील सहज संबंधांत तसेच व्यक्तीला तिचे व्यक्तित्व न गमावता जगाशी जोडणाऱ्या असंख्य नातेसंबंधांत निश्चतच सापडू शकते. अशाप्रकारे स्वराज्याच्या अनुषंगाने "समाजाचा आध्यात्मिक विकासवाद गांधींनी मांडला आहे. म्हणजे व्यक्तीप्रमाणे समाजाचीही सामाजिक व राजकीय प्रगती होत असते असे सर्वोदयात गृहीत धरले आहे. आर्थिक समता मानवी ऐक्याच्या तत्त्वावर विकसित करणे ही ऐतिहासिक प्रगतीची गरज आहे. सत्याग्रह हे त्याचे साधन आहे. दलित व पीडित वर्गाला समतेचा न्याय पहिल्यांदा मिळाला पाहिजे. याकरिता दलित व पीडित यांची सेवा केली पाहिजे व अन्यायाचा, सत्याग्रहीद्वारे प्रतिकार केला पाहिजे,"[११] अशी मांडणी गांधींनी केली आहे.

गांधींच्या स्वराज्याचा मध्यबिंदू शहरी मध्यमवर्गीय भारतीय नसून, ग्रामीण शेतकरी-शेतमजूर होता. ग्रामीण जीवनाचा एकजिनसीपणा आणि पायाभूत महत्त्व स्वराज्यात टिकून राहिले पाहिजे. इंग्रजी राजवटीत खेडीपाडी उद्ध्वस्त झाली, ग्रामीण कारागीर बेकार झाले, त्यांना खेड्यांतून परागंदा व्हावे

लागले याचे गांधींना सर्वांत जास्त दु:ख होते. ब्रिटिश भांडवलशाहीने इथल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडेच मोडले होते. "खेड्यांकडे चला" ही गांधीवादी चळवळीची मुख्य घोषणा होती. तिचा आशय कोणत्याही दृष्टीने प्रतिगामी वा स्थितिवादी नव्हता. कालबाह्य झालेल्या ग्रामीण राजकीय अर्थव्यवस्थेचा जीर्णोध्दार त्यांना अभिप्रेत नव्हता, तर नव्या संदर्भात सुदृढ ग्रामीण राजकीय अर्थरचनाच या देशातील स्वतंत्र लोकशाहीला बळकट करु शकेल असा विश्वास त्यामागे होता. कसणाऱ्याची जमीन या क्रांतिकारी तत्त्वाचे समर्थन गांधींनी केले होते. चरखा हे ग्रामीण जनतेच्या स्वावलंबनाचे व स्वयंपूर्णतेचे प्रतीक तसेच श्रमप्रतिष्ठेचे चिन्ह म्हणून गांधींनी वापरले होते. प्रत्येक कुटुंबाला संतुलित आहार, व्यवस्थित निवारा, आरोग्य सुविधा आणि मुलामुलींच्या शिक्षणाची सोय या गोष्टी मिळाल्याच पहिजेत यावर त्यांचा कटाक्ष होता. साधी व नैसर्गिक जीवनसरणी स्वराज्यासाठी गांधींना गरजेची वाटत होती.

विकेंद्रित ग्रामोद्योग हे जसे बेकारीनिवारणाचे साधन म्हणून गांधीवाद्यांना महत्त्वाचे वाटतात त्याचप्रमाणे राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरणही ते व्यक्तिस्वातंत्र्याची पूर्वअट मानतात. उदारमतवादी लोकशाहीचे आधारभूत तत्व म्हणून व्यक्तिस्वातंत्र्य मानले गेले असले तरी प्रत्यक्षात मात्र त्या देशांत व्यक्तिस्वातंत्र्याचे रुपांतर अर्थक्षेत्रात भांडवलशाही आणि सामाजिक क्षेत्रात स्वैराचार असे झालेले आढळून आले. भांडवलशाहीत संपत्तीचे केंद्रीकरण होऊन लोकशाहीला तिच्या दासीचे स्थान मिळाले. व्यक्तिवादाची ही अनिष्ट फलश्रुती टाळण्यासाठी समाजवादाचा विचार आला; पण त्या व्यवस्थेत आर्थिक समतेखातर व्यक्तिस्वातंत्र्याचा व राजकीय समतेचा बळी पडला. भांडवलशाही लोकशाहीत संपत्तीचे; तर समाजवादात सत्तेचे केंद्रीकरण झाल्यामुळे खऱ्या लोकशाही स्वराज्याला त्या दोन्ही व्यवस्था मारक आहेत, अशी गांधीवादी भूमिका आहे. संपत्ती व सत्ता या दोहोंचे विकेंद्रीकरण झाले तरच

राजकीय, आर्थिक व सामाजिक समता साध्य होईल आणि ग्रामस्वराज्याच्या पायाभूत यंत्रणेद्वारेच हे आर्थिक व राजकीय विकेंद्रीकरण सार्थ व फलदायी होऊ शकेल, हा गांधीवादी विचारातील एक मौलिक सिध्दांत आहे.

पाश्चिमात्य लोकशाही फक्त लोकनेतृत्वाचा म्हणजे लोकांना नेतृत्व मिळवून देण्यापुरताच विचार करते. गांधीप्रणीत ग्रामस्वराज्यावर आधारित लोकशाही मात्र लोककर्तृत्वाची कास धरते. लोकांची उपक्रमशीलता, क्रियाप्रवणता आणि निर्णयक्षमता यांना वाव देणारी ग्रामीण प्रजासत्ताकाची व्यवस्था हीच खरी लोकशाही असते. कारण लोकांचे सहभागित्व ही लोकशाहीची निर्णायक कसोटी असते, असे गांधीवाद मानतो.

**२.३.५ भौतिकबरोबरच नैतिक क्रांतीची गरज :**

गांधींजीच्या आधी जो क्रांतिविचार जगात मांडला गेला तो बव्हंशी आर्थिक व भौतिक परिवर्तनावरच भर देणारा होता. गांधींनी मानसिकता बदलण्यावर अधिक जोर दिला.आमूलाग्र परिवर्तनासाठी केवळ परिस्थिती नव्हे तर माणूसच बदलण्याची त्यांना गरज भासत होती. भौतिक गरजा निश्चितच महत्वाच्या असतात आणि त्या प्रत्येकाच्या पूर्ण झाल्या पाहिजेत. जे समाजातील धनिकांना मिळते ते आपल्यालाही मिळालेच पाहिजे अशा ईर्ष्येने माणसांनी प्रयत्नप्रवण होणेही इष्टच म्हणावे लागेल; पण केवळ भौतिक गरजांची चढाओढ सुरु झाली तर स्वार्थापलीकडे पाहण्याची दृष्टीच क्षीण होत जाते. यातून समुदायभावनेला झळ लागल्यावाचून राहत नाही. “म्हणूनच माझे सुख केवळ भौतिक भोगात नसून आत्मशांतीत आहे, हे माणसांच्या व समाजाच्याही गळी उतरल्याशिवाय सर्वहित साधणार

नाही. म्हणूनच मार्क्सच्या भौतिक समतेच्या परोपकारी भौतिक प्रेरणांना व विचारप्रणालीला सर्वात्मभावाच्या साक्षात्कारी नैतिक प्रेरणांची व विचारप्रणालीची जोड दिल्याशिवाय मार्क्सला अभिप्रेत असलेली विश्वक्रांती होणार नाही...महात्मा गांधींनी भौतिक व नैतिक क्रांतीचा समन्वय करुन विश्वमानवांना खऱ्याखुऱ्या मानवक्रांतीचा व मानवशांतीचाही मार्ग दाखवला हेच त्यांच्या विभूतिमत्त्वाचे रहस्य आहे."[१२]

भौतिक प्रगती व नैतिक अधोगती या अंतर्विरोधाने मानवाचे भवितव्यच संकटात आले आहे. एवढेच नव्हे तर पृथ्वीच्याही अस्तित्वाला धोका संभवतो हे अचूक ओळखून गांधीविचाराने जगाला नवी दिशा दाखविली. गांधीवादी परंपरेने प्रत्येक प्रश्नाच्या नैतिक बाजू अधोरेखित केल्या. प्रत्येक बाबीची पारख नैतिक कसोटीवर करुन ज्या त्यावर टिकल्या नाही त्या तिने त्याज्य ठरवल्या. साध्ये व साधने यांना गांधीवाद्यांनी अविभाज्य मानले. साधने जेवढी विशुध्द असतील, साध्येही तेवढीच विशुध्द असू शकतात. आमूलाग्र नवा समाज निर्माण करण्याची शक्ती शस्त्रास्त्रांमध्ये नसते, तर आत्मशक्तीच्या किंवा सत्यशक्तीच्याच ठिकाणी ती संभवते. ती शक्ती बाहुबळावर अवलंबून तर नसतेच उलट जे हिंसेचा संपूर्ण त्याग करतात तेच त्या शक्तीची साधना आणि सिध्दीही करु शकतात. ती शक्ती चिरंजीवी असते आणि अजेयही असते. जे दुष्ट असेल त्याच्याशी असहकार पुकारणे आणि उच्चतर ईश्वरी कायद्याशी किंवा सद्सद्विवेकबुध्दीच्या आज्ञेशी विसंगत असलेल्या राज्यसत्तेच्या आदेशाचा प्रतिकार किंवा भंग करणे हे त्या शक्तीचे प्रकट रुप असते. प्रेम, निर्भयता आणि निर्वैर वृत्ती हे तिचे अधिष्ठान असल्यामुळे प्रतिपक्षाच्या भूमिकेबद्दल आदर बाळगणे, इतरांच्या मतांविषयी सहिष्णुता ठेवणे आणि विरोधकांवर

बळजबरी न करणे ही शिस्त आत्मशक्तीच्या बळावर प्रतिकार करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणी असणे गांधीवादाला अत्यावश्यक वाटते.

सत्याग्रही आत्मशक्तीसाठी अशाप्रकारे वैयक्तिक आत्मशुध्दी, आत्मस्वरुपाची जाणीव, स्थितप्रज्ञतेची साधना, साध्य-साधनविवेक व साधनशुचिता, रचनात्मक सेवाकार्यातून लोकमान्यता व त्यातून होणारी लोकजागृती व लोकशक्ती, छोट्यामोठ्या अहिंसक आंदोलनातून सत्याग्रहाची तयारी, समाजरचनेचे व जनमानसाचे सूक्ष्म निरीक्षण, निर्भय; परंतु निर्वैर प्रतिकारशक्ती आणि सामाजिक नवसर्जनासाठी आत्मविसर्जनाचा सामूहिक वज्रनिर्धार इत्यादी अनेक अंगांवर भर देणारे सर्वांगीण असे गांधींचे क्रांतिशास्त्र आहे.[१३] आधुनिक औद्योगिक सभ्यतेला गांधींचा विरोध असण्याचे कारण तिची अनैतिकता हेच होते. ही आधुनिक सभ्यता नैतिकदृष्ट्या दिवाळखोर आहे आणि आधुनिक सभ्यतेच्या या दुरवस्थेचे मूळ तिच्या अतिभौतिकतेत आहे असे गांधीवाद्यांचे निदान होते.

गांधींजींनी असे म्हटले आहे: “मार्क्सवाद्यांशी माझे भांडण एकाच मुद्यावर आहे. भौतिक समाधानाचे नंदनवन हे जे त्यांचे अंतिम साध्य आहे ते जरी पृथ्वीवर प्रत्यक्षात अवतरले; तरीही ते मानवजातीला तृप्तीची भावना किंवा शांतता देऊ शकणार नाही; पण मार्क्सवादात जे सर्वोत्तम आहे ते स्वीकारुन त्याला आपल्या सामाजिक उद्दिष्टांच्या परिपूर्ततेसाठी वापरायला मात्र मला काहीच प्रत्यवाय दिसत नाही.”[१४] मार्क्सच्या विचारात जे चैतन्य आहे, त्याचे कारण गांधींच्या मते जर कशात असेल तर ते म्हणजे मार्क्सने संपूर्ण मानवजातीचा एकत्रितपणे विचार केला होता आणि वर्गभेदांच्या पलीकडे जाऊन जगभराच्या गरीब श्रमिकांच्या लढ्याशी स्वत:ला जोडून घेतले होते, या वस्तुस्थितीत दडलेले आहे.[१५]

अर्थात जगातील सर्व संकटांचे मूळ आर्थिक घटकांतच असते हा मार्क्सचा दृष्टिकोण गांधींना मान्य नव्हता. सर्व युध्दांचे व संघर्षाचे मूळ आर्थिक कारणात शोधणेही त्यांना अर्थपूर्ण वाटत नव्हते.

गांधीविचारात आत्मशक्तीला मध्यवर्ती स्थान आहे. पाशवी बळाचा आधार आत्मप्रौढी असल्यामुळे त्यातून संघर्ष व दुःखच निष्पन्न होते. आत्मबळ मात्र प्रेम, विश्वास व नम्रता यांवर आधारित असल्यामुळे ते सुसंवाद व सुख निर्माण करते. विध्वंस चौफेर असूनही जीवन टिकून राहते. याचा अर्थच विध्वंसापेक्षा उच्चतर असा नियम असलाच पाहिजे. त्या नियमाच्या नियंत्रणामुळेच समाज सुविहित राहतो आणि जीवन जगण्याच्या लायकीचे राहते आणि तो जर जीवनाचा नियम असेल तर त्यालाच आपण आपल्या दैनंदिन जीवनात आचरले पाहिजे अशी गांधींची धारणा असल्यामुळे विरोधकांना प्रेमाने जिंकण्याच्या मार्गाची भलामण त्यांनी केली आहे. माणूस चुका करतो; पण त्यातून शिकत जातो आणि परिपूर्णतेकडे वाटचाल करतो; पण त्यासाठी त्याने सतत आत्मपरीक्षणाची सवय ठेवली पाहिजे आणि सद्हेतूने किंवा अपुऱ्या इच्छाशक्तीमुळे हातून घडलेल्या चुका दुरुस्त करण्याची तयारीही ठेवली पाहिजे. मानवाच्या परिपूर्णता क्षमतेचे तत्त्व असे राजकारणाला व समाजकारणाला लागू करुन गांधीवादाने एका परीने हॉब्जचा संपूर्ण राजकीय विचार उलटा करुन मांडला आहे. मृत्यूचे भय नष्ट करणारा हा विचार असल्यामुळे क्रांतिकारकाला तो राजकीय व शारीरिक हौतात्म्याची प्रेरणा देतो. प्रचंड मोठी नैतिक शक्ती व आत्मविश्वास देतो.

## २.३.६ नवा पर्याय :

प्रगतीचा विचार माणूस कोणत्या दिशेने प्रगती करीत आहे या दृष्टीने न करता केवळ शहरीकरण, औद्योगिकीकरण, ऊर्जाविनियोग, अभिसरण, स्थलांतर वगैरेंच्या प्रमाणात किती प्रगती झाली यालाच महत्त्व दिले गेले. प्रगती हेच जणू स्वतोमूल्य आहे असे मानून माणूस त्या प्रगतीने सुखावला, अहंमन्यही झाला. त्या भरात या प्रगतीची किती भयंकर किंमत चुकती करावी लागणार आहे याचाही विचार त्याला सुचला नाही. माणसाचे आयुर्मान वाढवू शकलो या गर्वात राहिल्यामुळे मानवसंहाराची केवढी अभूतपूर्व तयारी आपण केली आहे याकडे माणसाने दुर्लक्ष केले. उपभोक्तावादाच्या झगमगाटी विश्वाने त्याची मती गुंग केली. निसर्गातील जैवविविधता नष्ट होत आहे. नैसर्गिक संसाधनांचे साठे संपत आहेत, जमीन-पाणी-हवा जंगले प्रदूषित होत आहेत किंवा नष्ट होत आहेत आणि सधन - निर्धनांतील विषमतेची दरी सतत रुंदावत चालली आहे. थोडक्यात, अनिर्बंध स्पर्धेच्या आणि एकांगी भौतिक यशस्वितेच्या मागे धावण्यावर आधारित मानवी सभ्यता आत्मनाशाच्या टप्प्यावर उभी आहे. अशा परिस्थतीत खरे वैश्वीकरण किंवा मानवी हक्क वगैरेची भाषाच गैरलागू ठरते.

आधुनिक जगाला विकासाच्या या शृंगापत्तीतून बाहेर काढण्याचा एक समर्थ पर्याय गांधीवादाने पुढे ठेवला आहे. आजच्या मानवी जीवनाची गुंतागुंत सोडवण्याचा उपाय गुंत्यात अधिक भर घालून सापडणार नाही. तसेच बाह्य जगात उपाय शोधणे व्यर्थ आहे.आंतरिक विश्वातच ते शोधावे लागतील. आर्थिक आणि सामाजिक जीवनाचे नवे आकार व प्रकार तिथेच आपल्याला सापडतील अशी गांधीप्रणीत सर्वोदयाची भूमिका आहे. बौध्दिक अन्वेषणापेक्षा भावनिक-आत्मिक अंतर्मुखतेचा मार्ग त्यात सुचवला आहे. स्पर्धा व लोभ या विद्यमान व्यवस्थेच्या आधारांवरच बरोबर करण्याचा तो मार्ग आहे.

ग्रामीण पुनर्रचनेचा केवळ तंत्रज्ञानात्मक-आर्थिक आराखडा असे सर्वोदयाचे स्वरुप नाही. सत्य व स्वराज्य, या दोन मूलतत्त्वांचा शोध स्वतःच्या सर्व मर्यादांसह माणसांना घेता येईल अशी ती नवीन समाजरचना आहे. सर्वोदय हा सर्वार्थांनी नवा पर्याय आहे. त्याची उद्दिष्टांची व्याख्या नवी आहे. ज्या मूल्यप्रमाणांवर सर्वोदयाची संकल्पना उभी आहे ती मूलतः निराळी आहे. सर्वोदयाची विश्वदृष्टीच आजच्या 'आधुनिक' जगात प्रचलित विश्वदृष्टीपेक्षा निराळी आहे.

मानवी विश्वातील संघर्ष आणि शांतता यासंबंधी गांधीवादी विचारप्रवाहाने केलेले चिंतन अनेक दृष्टींनी अभिनव आहे. सामान्यतः असे मानले जाते, की हितसंबंधांतील अंतर्विरोध म्हणजे संघर्ष आणि त्यामुळे सत्तास्पर्धेत जो जिंकतो त्याच्या बाजूने संघर्षाचा निकाल लागतो किंवा दोन्ही प्रतिस्पर्धकांत तडजोड होऊन तो संपतो. गांधीवादी दृष्टिकोन मात्र अगदीच निराळा आहे. त्याच्या मते, संघर्षाचे मूळच आभासात असते. याचा अर्थ संघर्ष आभासमय नसतात, ते खरेच असतात. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात वांशिक दृष्टिकोनातून जो लढा उभा राहिला, त्याचे मूळ युरोपियानांनी भारतीयांना मूलतः कमी प्रतीचे मानण्यात होते. ब्रिटनचा भारताविषयीचा दृष्टिकोनही मानव प्राण्यांबद्दलच्या सदोष आकलनावर आधारित होता. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी छळाच्या व जुलुमाच्या विरुध्द उभ्या राहिलेल्या लढ्याचे स्वरुप सत्य जगापुढे ठेवण्याचे होते. ज्या भ्रमापायी जुलूम घडत होता त्या भ्रमाची पटले दूर सारणे हे त्या लढ्याचे प्रयोजन होते. गांधींनी सत्याग्रह अशी अन्वर्थक संज्ञा या लढ्यासाठी वापरात आणली होती.

जे आभास किंवा भ्रम जुलमी वर्चस्वाच्या मुळाशी होते, त्यांना स्वार्थी हितसंबंधांची जोड नव्हती असे गांधी म्हणत नव्हते. त्यांचे म्हणणे होते, की ते स्वार्थही मायामूलकच होते. त्यांच्या मते, संपूर्ण

जीवमात्राचे ऐक्य ही जीवनाची वस्तुस्थिती असते. तेच जगातील सर्वश्रेष्ठ सत्य असते. त्या सत्याचा शोध हे गांधींनी स्वतःच्या जीवनाचे प्रयोजन मानले होते. त्यामुळेच ज्या कोणत्याही लढ्यात त्यांनी भाग घेतला तेथे संघर्षाच्या मुळाशी असलेले भ्रम किंवा भ्रमाची पटले दूर करुन त्यांच्याआड लपलेले ते सार्वभौम सत्य प्रकट करण्याचाच सदैव त्यांचा प्रयत्न होता.[१६]

संघर्षनिवारणाचा गांधीप्रणीत प्रयत्न दुहेरी स्वरुपाचा होता. एका बाजूने प्रतिपक्षाने लादलेल्या भ्रमांचा प्रतिकार करणे आणि त्याच वेळी प्रतिपक्षाला सदैव आपले सहयोगी समजणे. सामान्यतः या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साधणे अशक्य वाटते; पण गांधींनी स्वतः मात्र त्या शक्य करुन दाखवल्या होत्या. ब्रिटिश साम्राज्यशाहीशी प्रखर लढा देत असतानाच आपण भारतीयांनी ब्रिटिशांना देशाचे वैरी मानता कामा नये यावर गांधींचा कटाक्ष होता. त्यांच्या मते, आपण धोरणांवर व राज्यव्यवस्थेवर हल्ला करावा; पण माणसांवर करु नये, आपण स्वतः अपूर्णच आहोत, इतरांशी आपले वर्तन सहृदयतेचे असावे. कोणावरही आपण हे आरोप करु नये. त्यामुळे प्रतिस्पर्धकावर बळजोरी करण्याऐवजी त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करणे, सुसंस्कृत प्रतिसाद देण्याची संधी विरोधकांना सतत देणे असाच प्रयत्न सत्याग्रहींनी करावा. पण जेव्हा अर्जविनंती, युक्तिवाद, चर्चा या कशाचाच उपयोग होत नसेल तेव्हाच प्रत्यक्ष कृतीचा कार्यक्रम हाती घ्यावा. त्या प्रत्यक्ष कृतीचे स्वरुप बहिष्काराचे, असहाकाराचे किंवा सनदी आज्ञाभंगाचे असावे. त्यामागेही हेतू मतपरिवर्तनाचाच असावा, बळजोरीचा असू नये. गांधींनी या मार्गांचा प्रभावी अवलंब स्वतः केला होता. उपोषणाचा हेतू आत्मक्लेशातून विवेक जागा करण्याचा व समजूतदारपणा वाढवण्याचाच होता असे दिसते.

हिंसेचा अहिंसेने, अविवेकाचा विवेकाने, अन्यायाचा न्यायाने आणि अमानुषतेचा माणुसकीने प्रतिवाद करणे हा गांधीप्रणीत संघर्षनिवारणाचा आणि शांतता प्रस्थापनेच्या तंत्राचा गाभा होता असे म्हणता येईल. लढ्याची साध्ये प्रत्यक्ष लढ्यातूनच दिसावीत यावर त्यामुळेच ते भर देतात. हिंसेने कदाचित साध्ये जवळ आल्यासारखी दिसतील; पण गांधींच्या मते ते काही खरे नसते. वाईट साधनांचे फलित वाईटच असते. अल्पकालीन यश देणारी हिंसा प्रतिपक्षाला अधिकच दूर करते आणि संवाद अशक्य करुन सोडते. याच्या अगदी उलट अहिंसेचा परिणाम होतो. सत्याग्रही व्यक्तीने सतत कठोर आत्मपरीक्षण व आत्मविश्लेषण केले पाहिजे यावरही गांधींचा कटाक्ष होता. आपण स्वतः संताप, दुष्टबुध्दी व तत्सम मानवी दौर्बल्यापासून दूर आहोत ना हे सत्याग्रह्याने सतत तपासले पाहिजे आणि त्यांना बळी पडतो असे आढळल्यास प्रायश्चित्तही घेतले पाहिजे.

### २.३.७ सर्वोदय :

'सर्वोदय' हे गांधींच्या विचारसरणीचेच एक अपत्य आहे. आचार्य समंतभद्र या जैन मुनींच्या लेखनातून गांधींनी 'सर्वोदय' शब्द उचलला होता आणि आपल्या आत्मकथेत त्यांनी त्याचा प्रथम उल्लेख केला होता.[१७] त्यानंतर त्यांनीच रस्किनच्या 'अन टु धिस लास्ट ' नामक ग्रंथाचा जो गुजराथी अनुवाद केला त्याचे शीर्षक म्हणून 'सर्वोदय ' शब्दाचाच वापर केला होता. तेव्हा सर्वोदयाचे मूळ आपल्याला गांधींच्या विचारसरणीतच शोधावे लागेल. एका परीने असेही म्हणता येईल, की आधुनिक समाजासमोरील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी गांधी विचारसरणीचा

अवलंब करणे म्हणजेच सर्वोदय होय.[१८] समाजाला उपलब्ध असलेल्या भौतिक, आर्थिक व आध्यामिक साधनांचा सार्वजनिक कल्याणाच्या दृष्टीने अधिकाधिक उपयोग करुन घेण्याचे सर्वोदय हे एक शास्त्र आहे.'अधिकाधिकांचे आधिकाधिक सुख' या उपयुक्ततावाद्यांच्या मूलसूत्रापेक्षा सर्वोदयाचे उद्दिष्ट अधिक व्यापक आहे. समाजातील प्रत्येकाचे व सर्वांचे कल्याण त्याला अपेक्षित आहे. समाजवादाच्या कोणत्याही प्रकारापेक्षा सर्वोदयाचे तत्त्वज्ञान अधिक समावेशक आणि सर्वस्पर्शी आहे. कारण समाजवादाच्या सर्वच प्रकारांमध्ये फक्त श्रमिकांच्याच अभ्युदयाचा विचार केला जातो. धनिकांबद्दल एकप्रकारचा अनुदार दृष्टिकोन त्यात गृहीत धरला जातो. प्रत्येक व्यक्तीचे हित आणि सार्वजनिक हित यांच्यात अद्वैत सर्वोदयाने गृहीत धरले आहे. उच्च आणि नीच, समर्थ आणि असमर्थ, बुध्दिमान आणि मंदबुध्दी या सर्वांचाच अभ्युदय सर्वोदयात समाविष्ट आहे. 'जगा आणि जगू द्या' यापेक्षाही उच्चतर असा आदर्श सर्वोदयाने स्वीकारला आहे आणि तो म्हणजे 'इतरांकरिता जगा' या वेदान्त तत्त्वज्ञानाचा अशा प्रकारे व्यवहारात अवलंब सर्वोदयाने अपेक्षिलेला आहे.

माणूस हा मूलतः व स्वभावतः निःस्वार्थी व सदाचरणी आहे; सहकारी, परोपकारी व शांतताप्रेमी आहे अशी सर्वोदयाची गृहीत प्रेरणा आहे. मानवाच्या या सद्‌गुणांचा आविष्कार पुसट होण्यास वर्तमान समाजव्यवस्था आणि परिस्थिती कारणीभूत आहे. तीत आवश्यक ते फेरफार घडवून आणल्यास वरील मानवी गुणांना उजाळा देता येईल असा विश्वास सर्वोदयाच्या तत्वज्ञानाच्या मुळाशी आहे. सत्य, अहिंसा, स्वार्थत्याग, आत्म-संयमन इत्यादींचे संस्कार ग्रहण करण्याची क्षमता मानवमात्रात आहे. तपस्या आणि आवाहने यांच्या माध्यमांतून हे संस्कार घडविले जाऊ शकतात.

राज्यसंस्था, कायदे, वर्तमान लोकशाही शासनप्रकार आणि तद्नुषंगिक निवडणुका, राजकीय पक्ष इत्यादी संस्थांबद्दलचा अविश्वास सर्वोदयात व्यक्त झाला आहे. या संस्था आज कितीही लोकमान्य झाल्या असल्या व भारतीय समाजजीवनात रुढ झाल्यासारख्या दिसत असल्या तरी त्या भारताचे सर्व तऱ्हांचे प्रश्न समाधानकारकपणे सोडवू शकतील असे सर्वोदयाच्या प्रवर्तकांना वाटत नाही. उलटपक्षी समाजातील अनिष्टांना दृढमूल करण्यातच त्या कारणीभूत ठरतील अशी भीती ते व्यक्त करतात.

अतिकेंद्रित राज्यव्यवस्था, प्रचंड प्रमाणावर औद्योगिकीकरण व यांत्रिकीकरण, राष्ट्रीय नियोजनाला प्राधान्य, अतिसंघटित पक्षरचना इत्यादींवर अत्यंत प्रखर टीका सर्वोदयवाद्यांनी केली आहे. याचे एक प्रमुख कारण असे, की ग्रामीण जीवन आणि त्या जीवनाच्या गरजा यांची उपेक्षाच वरील गोष्टींमुळे घडते. सर्वोदयाच्या विचारसरणीनुसार ग्रामजीवन हा भारताचा आत्मा असल्यामुळे या देशाचा कोणताही सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार खेडे हा केंद्रबिंदू मानूनच झाला पाहिजे. खेड्यांचे राष्ट्रकुल असे स्वतंत्र भारताबद्दलचे चित्र गांधींनी रेखाटले होते. या व्यवस्थेत प्रत्येक खेडे हे आपल्या प्रशासनासाठी व गरजांच्या पूर्तीसाठी एक स्वायत्त एकक असेल असे गृहीत धरण्यात आले होते.

अशा प्रकारे जेव्हा प्रत्येक खेडे आपापला कारभार कार्यक्षमपणे व स्वावलंबनपूर्वक पार पाडू शकेल तेव्हा केंद्रवर्ती शासनाची आवश्यकताच राहणार नाही असा अराज्यवादी दृष्टिकोन गांधींनी मांडला होता. समाजात विषमता राहणार नाही, धनिक लोक आपल्या मालमत्तेकडे विश्वस्ताच्या भूमिकेतून पाहतील, सर्वांच्या किमान गरजा भागलेल्या असतील, भवितव्याची चिंता कुणालाच असणार नाही. अशा परिस्थितीत संघर्षाचे बीजच राहणार नाही. त्यामुळे पाशवी दंडशक्तीच्या बळाची गरज त्या समाजाला राहणार नाही. केंद्रीय राज्ययंत्रणा अशा प्रकारे अनावश्यक ठरली, की राजकीय पक्षांनाही वाव

उरणार नाही व परिणामी पक्षपध्दतीतून उद्‌भवणारी अनिष्टेही अस्तंगत होतील, असे सर्वोदयाचे तर्कशास्त्र आहे.

गांधींच्या हयातीत त्यांचे हे स्वप्न साकार होऊ शकले नाही. त्यांचे हे अपूर्ण कार्य त्यांच्या निधनानंतर त्यांचे मानसपुत्र आचार्य विनोबा यांनी हाती घेतले. गांधींचे कार्य हे अत्यंत क्रांतिगर्भ आहे अशा जाणिवेतून विनोबांनी त्यास हात घातला आणि आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी त्या कार्यासाठी वाहून घेतले. पुढे जयप्रकाश नारायण या जीवनदायी कार्यकर्त्यांनेही या यज्ञात उडी घेतली आणि आपल्या बुध्दिमत्तेच्या बळावर सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानात मोलाची भर घातली आहे.

### २.३.८ समालोचन :

गांधीवादाचे वेगळेपण आणि जमेच्या बाजू विवेचनात आलेल्याच आहेत. गांधीवादातील काही त्रुटींची नोंद समालोचनात संक्षेपाने घेता येईल. या विचारप्रवाहाचा जो प्रत्यक्ष प्रभाव आज पाहायला मिळतो त्यातील ठळक वैगुण्यांचा संबंध त्या विचारातील त्रुटींशी आहे किंवा अन्य कारणांशी आहे ? याचा शोध घेणे उपयुक्त ठरु शकेल.

गांधीवादाचा भर विचारप्रक्रियेपेक्षा भावनेवर अधिक राहिल्यामुळे विचारस्वातंत्र्य-प्रचारस्वातंत्र्य यांचे सैध्दांतिक विवेचन गांधीवादात आढळत नाही. स्वतः गांधी बुध्दिवादापेक्षा आतल्या आवाजालाच प्राधान्य देत असत.[१९] त्यामुळे गांधीवादी परंपरेत वैचारिक स्पष्टतेपेक्षा ‘आतल्या अवाजा’चे परस्परविरोधी पडसादच अधिक ठळकपणे व्यक्त होत राहिले आणि ती चळवळ निष्प्रभ ठरली. गांधीविचार अमलात आणण्याचे बहुतेक प्रयत्न प्रायोगिक, संकीर्ण व अपूर्ण स्वरुपाचेच ठरले.

ग्रामस्वराज्य व विकेंद्रीकरण या संकल्पनांचे प्रत्यक्ष आविष्कार गांधीप्रणीत आदर्शांपासून दूर व निष्प्राण सांगाडावजा असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गांधींच्या सत्याग्रह नामक लढ्यातंत्राचा वापर प्रचंड प्रमाणावर होत असला तरी सत्याग्रहीच्या नैतिक तयारीबद्दलचे त्यांचे विचार मात्र पूर्ण विस्मृतीत जमा झाले आहेत. राजकारणातील विशुध्दतेचा गांधीवादी विचारही मागे पडला आहे. सत्याग्रही व्यक्तीने करावयाच्या गांधीप्रणीत पूर्वतयारीमध्ये बौध्दिक मशागतीचा भाग मुळातच फार थोडा होता. परिवर्तनाच्या देशीविदेशी सिध्दांतांचा किंवा इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास गांधीमार्गात अनावश्यक वाटतो. धार्मिक ग्रंथांचे जुजबी ज्ञान, एकादश व्रताचे पालन आणि आत्मक्लेशाची तयारी असली, की सत्याग्रह्यांचे भागत असे.

## २.४ अहिंसा :

महात्मा गांधीच्या विचारसरणीत सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांना महत्त्वाचे स्थान होते. राजकारणासह जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य व अहिंसा या दोन बाबी त्यांना महत्त्वाच्या वाटत होत्या. गांधींच्या मते, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अहिंसेच्या तत्त्वाचे पालन केले पाहिजे. गांधींच्या सत्याच्या प्रयोगामध्ये अहिंसेच्या तत्त्वास अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. सत्य हे साध्य व अहिंसा हे साधन असले तरी त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे ते म्हणत. कोणत्याही प्राण्याला विचार, उच्चार आणि आचार या तिन्ही दृष्टींनी न दुखावणे म्हणजे खरी अहिंसा होय अशी गांधींनी अहिंसेची व्याख्या केली आहे. हिंसेत बौध्दिक व नैतिक हिंसेचा समावेश गांधीजी करतात. गर्व , तिरस्कार, क्रोध, उतावळेपणा, अधीक्षेप, कुरकूर या भावनांप्रमाणे हत्या करणे, जखम करणे, धाक दाखवणे, लुबाडणे, फसविणे ,

विषप्रयोग, भुलविणे, एखाद्याचे चरित्र हेतुपुरस्सर कलंकित करणे इ. कृत्यांचाही हिंसेत समावेश होतो. अहिंसा ही केवळ स्वप्नवत भावना नाही, तर मनुष्याच्या अंत:करणात आणि नैतिक प्रवृत्तीत असलेला तो एक कार्यप्रवण गुण आहे. त्या गुणाने उत्साह शून्य व्यक्तीच्या ठिकाणीसुध्दा उदात्त ध्येयाची स्फूर्ती होते अशी गांधींची धारणा होती. हिंसेला अत्यंत प्रवर्तक असे प्रसंग येतील त्या वेळी विचार, उच्चार आणि आचार यात अहिंसावृत्ती टिकवणे हीच अहिंसावादाची खरी कसोटी आहे असे गांधीजी म्हणत.

पृथ्वीवरील कोणत्याही वस्तुमात्राला व प्राणिमात्राला विचाराने, शब्दाने व कृत्याने संभवणारी , दुखापत टाळणे, अशी अहिंसेची व्याख्या गांधींनी ‘हरिजन’ मधील एका लेखात केली आहे. अहिंसेला ते आत्मिक शक्ती म्हणतात. पाशवी शक्तीचा प्रतिकार करणे हे कार्य ते या आत्मिक शक्तीवर सोपवतात; पण अहिंसेचे कार्य केवळ नकारात्मक नाही तर सकारात्मक आहे. अहिंसेच्या तत्त्वावर आधारलेल्या प्रेमरज्जूनी बांधलेल्या व परस्पर सौहार्दानेच नियंत्रित होणाऱ्या समाजजीवनाची उभारणी हे ते सकारात्मक वा रचनात्मक कार्य आहे, असा समाज हा एखादा प्रचंड कुटुंबासारखा असून त्यातील व्यक्तींचे परस्परसंबंध कुटुंबवतच असतील अशी गांधींची कल्पना होती. काँग्रेसने केवळ सत्तेला चिकटून हिंसेची कास धरण्यापेक्षा रचनात्मक कार्य करण्याऱ्या कार्यकर्त्यांचा ‘लोकसेवक संघ’ या स्वरुपात कार्य करावे. काँग्रेसने सत्ता हे स्वयमेव साध्य मानून चालू नये, तर अहिंसात्मक समाजाची उभारणी हे साध्य मानून राजकीय सत्ता हे त्याचे साधन मानावे, असे त्यांनी सुचवले होते.

परिपूर्ण अहिंसा ही केवळ ईश्वरालाच साध्य होऊ शकते. मनुष्यमात्र हा संपूर्णपणे अहिंसक होऊच शकत नाही, असे गांधीं जेंव्हा म्हणतात, तेव्हा मनुष्याच्या उपरेपणाची त्यांची जाणीव जशी व्यक्त होते त्याप्रमाणे शेवटी मानवसमाजात होणाऱ्या हिंसाचाराची एक घटक या नात्याने प्रत्येक व्यक्तीवर

नैतिक जबाबदारी असतेच अशी धारणाही व्यक्त होते. मानवी अपरिपूर्णतेमुळे काही ठिकाणी हिंसा अनिवार्य ठरते. गांधीप्रणीत आदर्श राज्यात जरी बळाला जागा नसली, तरी प्रत्यक्ष व्यवहारातून बलप्रयोग पूर्णपणे वगळता येत नाही. समाजाच्या अस्तित्वातच अंगभूत असलेली हिंसा, व्यक्ती जोवर समाजाचा घटक आहे तोवर तिला टाळता येणे शक्य नाही. राज्यसंस्था ही तर बोलून चालून हिंसेचीच आमूर्त आविष्कृती, तेव्हा तिच्यातून हिंसा बाद होणे अशक्यच आहे, हे गांधींना ठाऊक होते; म्हणूनच अहिंसात्मक राज्य म्हणजे त्यांच्या मते राज्यविहीन समाज होता.

### २.४.१ खालील प्रकारची हिंसा ही हिंसा नाही असे गांधीजी म्हणत.

१. शेतकऱ्यांनी वानरे, पक्षी, किडे , टोळ यांची हत्या करण्यात काही गैर नाही.

२. असाध्य रोगाने पीडित रोगी, ज्यास जगण्याचीच इच्छा नाही त्याची हत्या करणे पाप नाही उलट त्याचा मृत्यू ही दयाच आहे. प्राणांतिक वेदनांनी तळमळणाऱ्या माणसाच्या बाबतीतही हाच नियम लागू करण्याची त्यांची तयारी होती.

३. मानवाने स्वतःच्या संरक्षणासाठी केलेली हत्या ही क्षम्य आहे.

४. समाजातील स्त्रियांवर अत्याचार करणे, त्यांचे खून करणे, असे कृत्य करणाऱ्या व्यक्तींची हत्या करावयास हरकत नाही.

अन्यायाचा प्रतिकार अहिंसात्मक मार्गाने करणे शक्य नसेल तर त्यासाठी शस्त्रांचा अवलंब केला तरी चालेल; पण भ्याडपणे स्वस्थ बसणे हे मानवी प्रतिष्ठेला धरुन नाही, असे गांधींनी म्हटले होते.

माणसाच्या श्वासातून किंवा चालण्याबोलण्यातून हजारो जीवजंतूंचा नाश होतो. म्हणून जैन साधू नाकाला फडके बांधतात, तसे करणे गांधींना पसंत नव्हते.

### २.४.२ अहिंसेसंबंधी गांधींनी सांगितली तत्वे :

१. मानवजातीच्या उध्दाराचा अहिंसा हा एकमेव मार्ग आहे.

२. अहिंसेवर श्रध्दा ठेवणे म्हणजे मूर्तिमंत परमेश्वरावर श्रध्दा ठेवणे होय.

३. अहिंसा शब्दांने शिकवता येणे शक्य नाही. मनापासून केलेल्या प्रार्थनेचे अंतःस्थ परमेश्वराने दिलेले उत्तर म्हणजे अहिंसा

४. अहिंसा हे बलिष्टांचे आणि धैर्यमेरुंचे हत्यार आहे.

५. अहिंसा आणि सत्य अविभाज्य आहेत आणि एकातच दुसरे गृहीत धरलेले आहे.

६. अहिंसा म्हणजे आत्मविश्वास, अहिंसा म्हणजे केवळ परमेश्वरावर विश्वास, अशी अहिंसा अंगी बाळगण्यास आपल्या ठिकाणी नम्रता असणे जरुरी आहे.

७. हिंसेने केलेल्या विध्वंसाचे निराकरण अहिंसाच करु शकेल. प्रतिकार, डावपेच, सूड, उघड युध्द किंवा गुप्तपणे खूण यांना अहिंसेत स्थान नाही.

८. हिंसेची भारतात परंपरा नाही, तर अहिंसेची आहे. वेद, इतिहास, स्मृती याप्रमाणेच महाभारतात जैन, बौध्द आदी धर्मपंथ यांतही अहिंसेचे श्रेष्ठत्व जागोजागी वर्णन केले आहे.

९. अहिंसा शिकवून येत नाही तर ती आचरणाने येते. हिंसा मात्र शिकवता येते.

१०. हिंसा - अहिंसेच्या संघर्षात नेहमीच अहिंसेचा विजय झाला आहे. राजकीय उद्देशाच्या प्राप्तीसाठी अहिंसेचे व्यापक शिक्षण देण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केला गेला पाहिजे. जर अहिंसेने स्वातंत्र्य मिळवता येते तर अहिंसेने स्वातंत्र्य टिकवताही आले पाहिजे.

११. हिंसेचा वापर हा कोणत्याही प्रमाणात आणि कोणत्याही परिस्थितीत अयोग्य होय. हिंसा तेवढी सर्व वाईट म्हणून तिचा निषेधच केला पाहिजे असे गांधीं म्हणत.

१२ जमीन सुधारणा कार्यक्रमाची अमंलबजावणी अहिंसात्मक मार्गाने झाली पाहिजे. जमीनदार व भूमिहीन यांच्यात परस्परांविषयी आदर व विश्वास यांचे वातावरण प्रस्थापित झाले पाहिजे जमीनदारी पध्दती अहिंसात्मक मार्गाने नष्ट झाली पाहिजे.

केवळ गरज म्हणून गांधींनी अहिंसेचा पुरस्कार केला होता असे नव्हे तर ती त्यांच्या मनाची प्रामाणिक श्रध्दा होती. त्यांना अभिप्रेत असलेली अहिंसा दुबळ्या माणसाची पलायनवादी अहिंसा नव्हती तर आत्मिक, आध्यात्मिक सामर्थ्याची यथार्थ जाणीव झालेल्या शूरवीरांची ती अहिंसा होती.

### २.४.३ अहिंसेसंबधी पाच साधी सिध्दांतसूत्रे

१. अहिंसेत मनुष्यामात्राला शक्य असेल इतकी पूर्ण आत्मशुध्दी गृहीत आहे.

२. व्यक्ती- व्यक्तीनुसार अहिंसक मनुष्यात हिंसा करण्याचे जितक्या प्रमाणात सामर्थ्य असेल तितक्याच प्रमाणात त्यांच्यात अहिंसेची शक्ती असते.

३. अहिंसा ही निरपवादपणे हिंसेहून श्रेष्ठ आहे.

४. अहिंसेत पराभव अशी वस्तूच नाही. हिंसेचे पर्यवसान निश्चितपणे पराजयात होते.

५.	अहिंसेचे अंतिम फल निःसंशय विजय हेच असते.

अहिंसेचे तत्त्व नैतिक तसेच व्यावहारिक पातळीवरदेखील खूप महत्त्वाचे असून या तत्त्वाचे पालन केले तर व्यक्तीचे हृदयपरिवर्तन होणे शक्य आहे. समाजात एकूण जगातच शांतता नांदण्यासाठी अहिंसेचे तत्त्व उपयुक्त आहे असे गांधीं म्हणत. हिंसाचाराच्या मार्गाने सर्वच प्रश्नांची उकल होत नाही. हिंसाचाराच्या मार्गाने सर्व समाजाचे /व्यक्तीचे नुकसान होते असे स्पष्ट करुन गांधीं म्हणतात: अहिंसेच्या मार्गाने व्यक्ती स्वतःच्या हक्कांची जपवणूक करु शकते. गांधीं ब्रिटिश वसाहतवादाला विरोध करताना अहिंसेचा मार्ग श्रेष्ठ मानला. हिंसा या तत्त्वापेक्षा अहिंसेत अधिक जास्त शक्ती आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अहिंसेच्या तत्त्वाचा अंगीकार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे गांधीं म्हणत. अहिंसा ही मानव जातीला उपयुक्त शक्ती आहे. तिचा उपयोग व्यक्तीपुरता मर्यादित नाही, तर तिचा उपयोग जनसमुदायालाही करता येईल. शस्त्रास्त्रांच्या खणखणाटाने भारताचाच नाही तर जगाचा उध्दार होइल हे खोटे आहे, असे स्पष्ट करुन हिंसेच्या साहाय्याने देशाला मिळालेले स्वातंत्र्य आपण नाकारु असेही त्यांनी म्हटले आहे. अत्यंत दुर्बल असलेले राष्ट्रसुध्दा जर हिंसेची विद्या शिकले तर बाहेरच्या हल्ल्यापासून स्वतःला निर्भय राखू शकेल; परंतु एखादे लहानसे राष्ट्र कितीही शस्त्रसंभाराने शक्तिसंपन्न झालेले असो, शस्त्रसज्ज अशां राष्ट्रांच्या बलवान जुटीपुढे ते टिकू शकणार नाही. त्याला त्या राष्ट्रगटापैकी कोणत्याही एका गटात सामील होऊन जावे लागेल किंवा त्यांच्या संरक्षणाखाली राहावे लागेल. जनतेपैकी बहुसंख्य लोक जर अहिंसक बनतील, तर अहिंसेच्या पायावर सरकारचा कारभार हाकता येईल. हिंदुस्थान हाच एकटा असा देश आहे, की जेथे अशा प्रकारचे राज्य स्थापन होण्याचा संभव

आहे, असा गांधींचा विश्वास होता. वैयक्तिक स्वातंत्र्याचा विकास करण्याची संधी केवळ विशुध्द अहिंसेवर आधारलेल्या शासनातच मिळू शकेल अशीही गांधींची श्रध्दा होती. जगाला शांतीचा संदेश देण्याचा अधिकार हिंदुस्थानचाच आहे. हिंदुस्थान अहिंसाभूमी आहे. हिंदुस्थानकडे विधात्याने अहिंसेची साधना सोपविली व त्या साधनेला अनुकूल अशी नैसर्गिक परिस्थतीही पुरविली. अहिंसा हा हिंदुस्थानचा स्वधर्म आहे व अहिंसेच्याच मार्गाने आपले पूर्ण स्वराज्याचे ध्येय गाठावयाचे आहे, असे गांधींनी आग्रहाने सांगितले .

सामाजिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात/ व्यवहारात गांधींनी अहिंसेची गरज सांगितली तशीच ती व्यक्तीव्यक्तींमधील खासगी व्यवहारातही सांगितली. अहिंसेचे पालन हा केवळ एक सार्वजनिक उपक्रम न राहाता, तो नित्याची वृत्ती बनून राहिला पाहिजे. अहिंसेच्या साह्याने भारताने संपूर्ण जगाच्या वतीने शांतिदूताचे काम केलेले मला अतिशय आवडेल, अशी इच्छा गांधी व्यक्त करतात. विधायक कार्यक्रम आणि अहिंसा यांचा संबंध स्पष्ट करताना गांधी म्हणतात, “हिंदू-मुसलमान ऐक्य, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण या गोष्टी हिंसेवाचून अशक्य आहेत हे अगदी स्पष्ट आहे.” अहिंसा हे एखाद्या विशिष्ट पक्ष किंवा वर्ग यांच्या बाबतीतच आचरावयाचे तत्त्व किंवा सद्‌गुण आहे असे नव्हे, तर अहिंसा ही आपल्या जीवनाचे अविभाज्य अंग बनली पाहिजे. अहिंसा हे अत्यंत उदात्त असे क्रियात्मक तत्त्व आहे. अहिंसा ही अमोघ शक्ती व्हायची असेल तर तिचा उगम मनात झाला पाहिजे. जो मनुष्य मृत्यूला भितो व ज्याच्यात प्रतिकाराची शक्ती नाही, अशाला अहिंसा शिकवता येत नाही. महात्मा गांधी अहिंसेचे महत्त्व पटवून देताना सांगतात: “अहिंसा हे सर्वश्रेष्ठ बल आहे. ते आत्मबल किंवा आत्म्यातील ईश्वरी बल आहे. अपूर्ण माणूस तिचे पूर्ण आकलन करु शकत नाही. तिचे प्रखर तेज त्याला सहन करता

येणार नाही; परंतु तिचा अत्यल्प अंशसुध्दा आपल्यात जेव्हा जागृत होतो तेव्हा चमत्कार घडून येऊ शकतो. एखाद्या माणसात जर अहंभाव आणि अहंमन्यता असेल तर तेथे अहिंसा राहू शकत नाही. विनम्रतेखेरीज अहिंसा अशक्य आहे.

१९३८ मध्ये गांधींनी शांतिदलाची योजना आखली व देशाला अहिंसेचे शिक्षण देण्याचा उपक्रम जाहीर केला. शांतिदलाची मुख्य कल्पना अशी आहे, की त्या दलाचा प्रत्येक सभासद दंग्यात, विशेषतः जातीय दंग्यात आपल्या प्राणावर उदार होऊन शांततेसाठी झटत राहील. शांतिदलातील प्रत्येक सैनिकांची अहिंसेवर श्रध्दा पाहिजे. या शांतिदूतास सर्व धर्मीयांबद्दल सारखाच आदर वाटला पाहिजे, त्याचे चरित्र संशयातीत पाहिजे. तो अत्यंत काटेकोर व निःपक्षपाती पाहिजे. तो शांतिदलातील सैनिक आहे हे ओळखण्यासाठी त्याने विशिष्ट पोशाख घातला पाहिजे, अशा गांधींच्या अटी/सूचना होत्या. शांतिदलाकडून सर्व प्रकारचे गुन्हे निवारण करावयाचे नाहीत. पोलिसांचे नेहमीचे काम करण्यासाठी शांतिदल उभारावयाचे नाही. प्रामुख्याने जातीय दंग्याच्या वेळी शांतिदलाने पुढे आले पाहिजे, मोठमोठी शांतिदले उभारणे कठीण आहे, या शांतिसेना लहान असतील. जागोजागी, खेडोपाडी, गल्ली व मोहल्ल्यात असतील. या शांतिसैनिकांनी कोणतेही हत्यार बाळगू नये, त्यांच्याजवळ प्रथमोपचाराचे साहित्य असावे व त्याचे शिक्षणही असावे, त्यांनी रामनामाचा जप करावा असे गांधीजी म्हणतात.

उद्याच्या जगात अहिंसेवर आधारलेली समाजरचनाच असली पाहिजे याबद्दल मला मुळीच शंका नाही, असे गांधींनी म्हटले होते. गांधींची ग्रामराज्य किंवा ग्रामस्वराज्याची कल्पना ही अहिंसेवर आधारलेली आहे. अहिंसा ही एक प्रबळ शक्ती आहे. ती शक्ती माणसाला माणूस बनविते व माणसे एकमेकांची शोषक न होता पोषक बनतात.[२०]

### २.४.४ अहिंसेसंबधी गाधींचे तत्त्वविचार :

अहिंसा म्हणजे आत्म्याचे सामर्थ्य आणि आत्मा हा अविनाशी, नित्य आणि अपरिवर्तनीय असतो. ॲटम बॉम्ब म्हणजे भौतिक सामर्थ्याचा कळस असल्यामुळे तो अशाश्वती, नाश आणि मृत्यूच्या सर्व भौतिक विश्वावर अंमल गाजविणाऱ्या नियमांच्या आहारी जाणारा आहे. आपले आत्मबळ जेव्हा आपल्या अंतर्यामी संपूर्णपणे जागृत होते, तेव्हा तें अनिवार्य होते. आमची शास्त्रे याची ग्वाही देतील; परंतु त्यांच्या पूर्ण जागृतीची अवस्था कसोटीला लावण्यासाठी ती आमच्या शरीराच्या रंघ्रारंध्रातून पाझरली पाहिजेत अणि श्वास घेताना आमच्या प्रत्येक उच्छवासातून प्रकटली पाहिजे.

अहिंसेचे रोपटे हळूहळू वाढीस लागते. त्याची वाढ दिसत नसली तरी ती खात्रीपूर्वक होत जाते. सत्य आणि अहिंसेचा मार्ग वस्तऱ्याच्या धारेसारखा तीक्ष्ण असतो. अहिंसेचे आचरण दैनंदिन आहारापेक्षा अधिक महत्त्वाचे असते. यथोचित आहाराने शरीराचे पोषण होत असते. अहिंसेच्या यथोचित आचाराणे आत्म्याचे सामर्थ्य वाढते. शरीराचा आहार फक्त मोजक्या मात्रेत ठराविक वेळीच घेणे शक्य असते. अहिंसा आत्म्याचा आहार असल्यामुळे तिचे आपण नित्य सेवन केले पाहिजे. त्या बाबतीत कधीही तृप्ती होऊच शकत नाही .

सत्याची वाट जितकी निरुंद तितकीच सरळ असते. अहिंसेची वाट देखील तशीच असते. एक प्रकारे तलवारीच्या धारेवरुन तोल सांभाळत चालण्याप्रमाणे ते आहे. चित्त एकाग्र करुन डोंबारी दोरावरुन चालत जाऊ शकतो, परंतु सत्य - अहिंसेच्या वाटेवरुन चालत जाण्यास कितीतरी श्रेष्ठ एकाग्रतेच्या साधनेची गरज असते. इवल्याशा चित्त - चांचल्यामुळे देखील जमिनीवर कोसळण्याचे भय असते. केवळ अविश्रांत खडतर प्रवासामुळेच सत्य, अहिंसेची साधना होऊ शकते.

अहिंसा म्हणजे काही यांत्रिक प्रयोग नव्हे, ती हृदयाचा अत्यंत उत्कृष्ट गुण असून, तो शिकून आत्मसात करता येणे शक्य आहे.

अहिंसेची विवक्षित मानसिक अवस्था प्राप्त करुन घेण्यासाठी बराचसा जबरदस्त ताण पडणारा अभ्यासक्रम आचरावा लागतो. दैनंदिन जीवनात, एखाद्या सैनिकाच्या आयुष्याप्रमाणे स्वतःला आवडत नसले तरी एखाद्याला आचरणात शिस्त पाळावी लागते; परंतु मला मान्य आहे, की अंतःकरणपूर्वक मानसिक सहकार्य जर मिळाले नाही, तर केवळ बाह्य आचरण हा निव्वळ मुखवटा ठरेल आणि तसे झाले तर ते त्या व्यक्तीला आणि इतरांना हानिकारक ठरणारे होईल. काया, वाचा आणि मन यांचा योग्य समन्वय जर होऊ शकला तरच केवळ एखाद्याला पूर्णावस्थेप्रत पोहचता येइल; परंतु ती नेहमीच तीव्र मानसिक संघर्षाची बाब असते.

अहिंसा आणि सत्य यांची इतकी परस्पर गुंतागुंत झालेली असते की त्यांचा गुंता उकलून त्यांना वेगळे करणे व्यवहारात अशक्य असते. एका नाण्याच्या किंवा धातूच्या गुळगुळीत ठसा नसलेल्या चकतीच्या दोन बाजूंप्रमाणे ती आहेत. त्यात कोणती उलट व कोणती सुलट, हे आपण सांगू शकतो का? तरीदेखील अहिंसा हे साधन आहे, सत्य हे साध्य आहे. साधने ही साधने होण्याच्या दृष्टीने नेहमी आमच्या आवाक्यात असणे जरुर असते आणि म्हणूनच अहिंसा हे आमचे सर्वोच्च कर्तव्य आहे. आपण जर साधनांच्या विषयी दक्षता बाळगली तर कधी ना कधीतरी आपण साध्याकडे जाऊन पोचणार हे ठरलेलेच. आपण एकदा का हा मुद्दा समजून घेतला, की मग अंतिम विजय संदेहातीत आहे. आपण कितीही संकटाशी सामना दिला, आपण कितीही प्रत्यक्ष माघारी घेतल्या, तरी पण आपण सत्याचा शोध करण्याचे सोडता नये; कारण तेच फक्त परमेश्वराचे स्वयंरुप आहे.

अहिंसा म्हणजे केवळ गिरिकंद ऋषीमुनींना आचरता येण्याजोगा सीमित धर्म नव्हे. तिची लायकी लक्षावधी लोकांना आचरता येण्याजोगी आहे. कारण तिच्या गुंतागुंतीच्या विषयी जरी आम्हा मानवांना विशेष ज्ञान नसले, तरी ती आमच्या जातीचा विशेष मनोधर्म आहे. तिच्यामुळेच पशू आणि मानव यांच्यामधील पशुत्वाचे संपूर्ण विसर्जन केलेले नाही. तसे करण्याविषयी त्याने खडतर साधना केली पाहिजे. अहिंसेचे आचरण करताना त्याने ही साधना करावी. अहिंसेवर नुसती श्रध्दा ठेवून भागणार नाही. एकतर मी अहिंसेवर विश्वास ठेवीन नाही, तर ठेवणार नाही. माझा जर अहिंसेवर विश्वास असेल तर मी शूरपणाणे खडतर तप आचरुन तिचे पालन केले पाहिजे. अहिंसा हे शुरांचे लक्षण आहे भूषन आहे. अग्नी आणि पाणी यांच्याप्रमाणेच अहिंसा आणि भेकडपणा एकत्र नांदू शकत नाहीत.

अहिंसा म्हणजे भित्रेपणाचा आडपडदा नव्हे, तो शूराचा सर्वश्रेष्ठ सद्‌गुण असतो. तिचा उपयोग करताना तलवारबहादुरीपेक्षा कितीतरी अधिक पराक्रमाची गरज असते. तलवारबहादुरीचे रुपांतर अहिंसेत होण्याची शक्यता असते आणि कधी कधी तर तिचा प्रयोग अगदीच सुलभ असतो. म्हणूनच अहिंसेत आघात करण्याचे सामर्थ्य गृहीत धरलेले असते. एखाद्याच्या सूड घेण्याच्या इच्छेवर त्याने स्वतःच स्वेच्छेने घातलेले नियंत्रण म्हणजे अहिंसा; परंतू निष्क्रिय, नामर्द व असहाय शरणागतीपेक्षा सूड हा केव्हाही श्रेष्ठ. क्षमा त्यापेक्षाही अधिक श्रेष्ठ. ठाम श्रध्देविना अत्यंत पापभिरुपणाने शुध्द आचरण करणाऱ्या व्यक्तीपेक्षा अजाणता सहस्त्र प्रमाद करणारा अधिक चांगला. त्याचे शुध्दाचरण म्हणजे प्रेतावरले शुभ्र कफन. आपण स्वतःशीच इमान पाळले पाहिजे. अहिंसेविषयी दांभिकपणा असू नये. अहिंसा म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणे अंगावर घालावयाचा आणि ठेवण्याचा एखादा डगला नव्हे, तिचे

स्थान हृदयात असते. आणि ती आमच्या अस्तित्वाचा अभिन्न अंश असायला हवी. अहिंसा म्हणजे क्षमेचे अंतिम क्षितिज; परंतु क्षमा ही शूराची गुणवत्ता आहे. निर्भयपणाविना अहिंसा अशक्यप्राय असते.

अहिंसेची विरोधक असत नाही आणि यदाकदाचित ती तशी असलीच तर तिला दया हे नाव देता येणार नाही. आपल्या शरीरात मुरलेली अहिंसा म्हणजे दया. वीतरागी दयाहीन असूच शकत नाही. उलट तो तर दयेची प्रत्यक्ष मूर्ती असतो आणि जेव्हा लधावधी माणसांवर दया करण्याचा प्रश्न असतो, त्या वेळी तीत आसक्ती नाही, असे म्हणणे होय किंवा त्या शब्दाला एक नवाच अर्थ चिकटविणे होय .

प्राणिहत्येमुळे काही हिंसेचे पाप घडत नसते. एखाद्याने आपल्या नश्वर देहासाठी दुसऱ्याचा जीव घेतल्यास ते घडते. खाणेपिणे वगैरेमुळे होणारा जीवनाश स्वार्थासाठी होतो, म्हणून त्याची जमा हिंसेत होते; परंतु मनुष्य ती अनिवार्य मानतो आणि तिच्याशी जुळवून घेतो; मात्र यातनात्रस्त जीवाच्या देहाचा त्यानाच शांती मिळावी म्हणून करण्यात आलेला नाश काही हिंसा मानण्यात येऊ शकणार नाही, तसेच आपल्या आश्रिताचे संरक्षण करण्याच्या हेतूने करण्यात आलेला न टाळता येण्याजोगा केलेला विनाश म्हणजे काही हिंसा म्हणता येणार नाही.

दैववादाला काही मर्यादा नसतात. आपले सर्व उपाय थकले म्हणजे आपण दैवावर हवाला ठेवतो. यातनांच्यामुळे रंजीस आलेल्या बालकाला त्या यातनांतून मुक्त करण्याचा शेवटचा उपाय म्हणजे त्याचा जीव घेणे होय. कोणताही मनुष्य उध्दार होऊ न शकण्याइतका वाईट नाही. दुसऱ्या मनुष्याला चुकीने पूर्णपणे दुष्ट मानून, त्याचा घात करण्याइतका कोणताही मनुष्यप्राणी पूर्णत्व पावलेला नाही.

उष्णतेच्या पुरेशा धगीने अत्यंत कठीण धातूदेखील वितळतो, त्याचप्रमाणे अहिंसेच्या पुरेशा उष्णतेने अत्यंत कठीण हृदयदेखील द्रवलेच पाहिजे, अहिंसेची उष्णता निर्माण करण्याची शक्ती अपार

आहे. अहिंसेचे तत्त्व सर्वव्यापक असते. आपण हिंसेच्या वणव्याने वेढले अगतिक मर्त्य मानव आहोत. निष्क्रिय सहनशीलतेला अहिंसक प्रतिकार समजणे हा त्या नावाचा दुरुपयोग आहे. हिंसात्मक प्रतिकारापेक्षादेखील अहिंसात्मक प्रतिकार अधिक कार्यक्षम असतो. अहिंसेचा संदेश २५०० वर्षांइतका प्राचीन आहे; परंतु खऱ्या अर्थाने तिचे पालन करण्यात येत नाही. तसे पाहिले तर २५०० वर्षे म्हणजे या कालचक्रावर पडलेला चिमुकला डाग अहिंसा - पुष्प आता तरी, जरी कोमेजून गेलेले दिसत असले तरी, खरे पाहिल्यास ते अजून पूर्णपणे विकसितच झाले नाही. अहिंसेचे तत्त्व भूमितीसारखे आहे. तिचे शास्त्र अनुभव आणि श्रध्दा यांच्यावर उभारले आहे. युक्तिवादावर नव्हे. अहिंसा आपल्या करणात्मक स्वरुपात सर्वश्रेष्ठ दया आणि सर्वात अधिक विशाल प्रीती असते. सगळ्या दुष्टपणाविरुध्द खरा सामना देण्यापासून परावृत्त होणे म्हणजे अहिंसा नव्हे, याच्या उलट माझ्या धारणेतली अहिंसा दुष्टपणाच्या अधिक क्रियाशील आणि खरी झुंजार बनते असे गांधी म्हणतात. जीवन हे तडजोडींनी घडलेले असते. अहिंसा ही निर्मळ, निःस्वार्थ प्रीती असल्यामुळे तिला अशा तडजोडीची वारंवार गरज भासते; मात्र अटी अगदी हुकमी असाव्यात. तडजोडीत कुणाचा स्वार्थ नसावा. कुणाची भीती नसावी, कसलेही असत्य नसावे आणि तिच्यामुळे अहिंसेची प्रगती होत जावी. तडजोड ही स्वयंमान्य आणि स्वाभाविक असावी. बाहेरुन दडपण आणल्यामुळे ती करण्यात येऊ नये.

आत्मशुध्दीचे मानसिक शस्त्र जरी स्पर्शातीत असले तरी एखाद्याच्या भोवतालच्या परिस्थितीत क्रांतिकारक बदल करण्याचे आणि त्याच्या बाह्य बंधन-मुक्तीचे ते एक अत्यंत पराक्रमी साधन आहे. त्याचे कार्य अत्यंत गूढ आणि अगोचरपणाने होत असते. त्याची कार्यपध्दती जरी दीर्घसूत्री अणि कंटाळवाणी वाटत असली, तरी ती एक पराकष्टाची पध्दती असून मुक्तीचा अत्यंत साधा, अगदी

खात्रीचा आणि अति जलद मार्ग म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी कोणतीही साधना फार मोठी वाटणार नाही. त्याची प्राप्ती होण्यासाठी श्रध्देची - अगदी अचल पर्वतासारख्या, कधीही कशाहीमुळे डळमळीत न होऊ शकणाऱ्या श्रध्देची गरज असते. प्रत्येक कृती म्हणजे विपरीत गुणधर्माच्या शक्तीच्यादेखील समुच्चयाचा परिणाम असतो, असे आपण यंत्रशास्त्राच्या पुस्तकावरुन शिकतो. आपण जितक्या श्रध्देने अहिंसेवर विश्वास ठेवतो, तितक्याच श्रध्देने परमेश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे. श्रध्देचा विकास होऊ शकतो; मात्र तिचा विकास होऊ शकण्याचा मार्ग आणि तिची कार्यपध्दती हिंसेच्या बाबतीपेक्षा वेगळी आहे. प्रार्थनेच्या व्दारा तुम्ही हिंसेचा विकास करु शकत नाही, याच्या उलट श्रध्देचा विकास करण्यासाठी प्रार्थनेच्या व्यतिरिक्त दुसरा मार्गच असू शकत नाही. परमेश्वराच्या ठायी तुमची जिवंत श्रध्दा असली तरच अहिंसेला यश मिळू शकते.

युरोपात अहिंसेचा प्रचार होण्याच्या फार फार आधी या सिध्दांताचा परिचय हिंदुस्थानला झाला होता आणि तेथे सर्वसामान्यतः अहिंसेचे आचरणदेखील सुरु होते. शरीराबळापेक्षा आत्मिक बळ निर्विवाद अपार श्रेष्ठ आहे, हे सहज समजून येते. माझ्या समजुतीप्रमाणे जगातली सर्वश्रेष्ठ क्रियाशील शक्ती अहिंसा हीच आहे. म्हणूनच भौतिकवाद असो की अन्य काही असो, त्याच्या विरुध्द जर अहिंसा रामबाण उपाय ठरत नसेल, तर ती माझ्या कल्पनेतली अमोघ क्रियाशील शक्ती ठरणार नाही, असे गांधीं म्हणतात.

### २.४.५ गांधींच्या अहिंसेची पाच प्रत्यक्ष प्रमाणे सांगता येतील

१. मानवी प्रयत्नाच्या आटोक्यात असलेली आत्मशुध्दी अहिंसेत अंतर्भूत असते.

२. माणसामाणसांमधील व्यवहाराच्या दृष्टीने विचार केला तर अहिंसेचे सामर्थ्य, त्या अहिंसावादी व्यक्तीच्या अंगात जे शरीरबळ असते त्याच्या बरोबरीचे असते.

३. अहिंसा ही हिंसेपेक्षा निरपवाद श्रेष्ठ असते.

४. अहिंसेत पराभवाला स्थान नसते.

५. विजयानेच अहिंसेचा गोड शेवट होतो.

अहिंसेच्या महान प्रयोगात गृहीत प्रश्नांना क्वचित वाव असतो.

मी अखंडपणे माझ्या आयुष्याच्या प्रत्येक दालनात कौटुंबिक, आर्थिक, संस्थाविषयक आणि राजकीय व्यवहारात सतत ५० वर्षे अगदी शास्त्रीय काटेकोरपणाने अहिंसा आणि तिच्या संभवनीयतांचे पालन करीत आहे. त्यात एखाद्या प्रसंगी मला अपयश आले नाही जेथे काही अपयश मिळाल्यासारखे दिसत होते, त्याचा दोष मी माझ्या अपूर्णतेला लावला. मी सत्याचा शोध लावण्याची जिद्द धरली आहे. सत्याचेच दुसरे नाव ईश्वर. त्या शोधाच्या मार्गातच मला अहिंसेचा शोध लागला. आपण जर भौतिक विज्ञानात क्रांती करु शकतो, तर मग आत्म्याच्या विज्ञानात तरी मागे का राहावे ?[२१] असे गांधींचे मत होते.

### २.४.६ शूरांची अहिंसा :

अहिंसा हा काही व्यक्तिगत सद्‌गुण नव्हे, माझ्या मते, तो सामाजिक सद्‌गुणदेखील आहे. इतर सदगुणप्रमाणे त्याचादेखिल संस्कार करण्यात आलेला आहे. समाजातील आपसांतल्या व्यवहारावर

अहिंसेच्या संकेताचे मोठे नियंत्रण असते, याची मला खात्री आहे, असे गांधींचे म्हणणे होते. अहिंसा हा भ्याडाचा किंवा नेभळटपणाचा मार्ग नव्हे, मृत्यूला सामोरे जाणाऱ्या शूरांचा तो मार्ग आहे. हाती शस्त्रे घेऊन जो मृत्यूमुखी पडतो, तो निःसंशय शूर आहे; परंतु जरादेखिल कच न खाता किंवा बोटदेखील न उचलता जो मृत्यूला सामोरे जातो, तो अधिक शूर म्हटला पाहिजे. मार खाण्याच्या भीतीने जो आपल्या घरातील स्त्रियांचा अपमान झाला तरी मूग गिळून बसतो, तो मर्द नव्हे. तुम्ही नामर्दपणावर अहिंसेचे अस्तर चढविण्यापेक्षा, तुमच्या मनात जर खरोखर हिंसा धगधगत असेल तर हिंसेचे आचरण करणे हे अधिक चांगले, असे मी बिनदिक्कत सांगेन. नामर्दपणापेक्षा हिंसा केव्हाही श्रेयस्कर. हिंसावादी निदान पुढे मागे अहिंसावादी होऊ शकेल अशी आशा करायला जागा असते; पण नामर्दपणाबद्दल तशी कधी अपेक्षाच करता येणार नाही. भेकडपणा आणि हिंसा यांच्या मधून निवड करायची झाल्यास मी खात्रीने हिंसेचा आदेश देईन; म्हणूनच हिंसामार्गावर ज्यांचा विश्वास आहे त्यांना शस्त्र चालविण्याची कला शिकवण्यात यावी, असे मी नेहमी प्रतिपादन करीत आलोय असे महात्मा गांधींचे म्हणणे होते.

**२.४.७ संकल्पित अहिंसादलाच्या सभासदाला कोणती पात्रता आवश्यक, ते आपण पाहू :**

१. त्याची किंवा तिची अहिंसेवर जिवंत श्रध्दा असली पाहिजे; मात्र परमेश्वराच्य ठायी श्रध्दा असल्याशिवाय ते अशक्य आहे.

२. या दलसभासदाला जगातील सर्व प्रमुख धर्मांविषयी समान आदर असावा.

३. सामान्यतः हे शांतिकार्य त्या त्या विभागात स्थानिक माणसाच्या कडूनच होणे शक्य आहे.

४. हे कार्य एकेकट्याने किंवा सामुदायिकपणे कोणीतरी यावे, म्हणून त्याने तिष्ठत राहू नये.

५. वैयक्तिक सेवाभावामुळे स्थानिक जनतेमध्ये संपर्क साधता येईल आणि त्यामुळे शांततेचा प्रचार करता येईल.

हिंसेने भारावून गेलेल्या वातावरणात अहिंसेवर श्रध्दा असणारांचे कार्य बिकटप्राय बनते, परंतु हिंसेच्या मार्गापेक्षा ख-या अहिंसेच्या मार्गासाठी अधिक धैर्य असावे लागते.

'हरिने मारग छे शूरानो, नही कायरनु काम जोने'

सत्य मार्ग तर शूरासाठी. भ्याडासाठी नाही आणि सत्याचा मार्ग म्हणजेच अहिंसेचा मार्ग. आत्मसंरक्षणासाठी (दुसऱ्याला) ठार मारण्याची शक्ती असण्याची गरज नाही. त्याच्यासाठी एखाद्याच्या अंगी मरायला सिध्द असण्याची शक्ती हवी असते. जेव्हा एखादी व्यक्ती संपूर्णपणे मरायला सिध्द असते, तेव्हा तिच्या मनात हिंसेचा उपयोग करण्याची इच्छादेखिल होणार नाही.

माझ्यात शूराची अहिंसा आहे का? माझा मृत्यूच ती दाखवून देईल. मला जर कुणी ठार केले आणि जर मरताना माझ्या ओठावर माझ्या मारेकऱ्यासाठी मी परमेश्वराजवळ भाकलेली करुणा आणि परमेश्वराचे नामस्मरण असेल व तसेच माझ्या हृदयात राउळात परमेश्वराचा प्रत्यक्ष वास असल्याची मला जाणीव असेल, तर माझ्यात शूराची अहिंसा होती असे म्हणता येईल. अशा प्रकारे वरील विविध विचारांतून गांधींनी शूराच्या अहिंसेविषयी आपली मते प्रतिपादन केली.[२२]

## २.५ सत्याग्रह :

सत्याग्रह संकल्पना ही गांधींची विश्वविचाराला दिलेली देणगी आहे. सत्याग्रहाला गांधींच्या विचारसरणीत व स्वातंत्र्यआंदोलनाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. गांधींच्या मते, सत्याग्रह हा

प्रत्यक्ष कृतीचा सर्वांत प्रभावी मार्ग आहे. इतर मार्ग संपल्यावर या मार्गाचा अवलंब करावा. दुराचाराचाही मुकाबला सदाचाराने करावा हे गांधींच्या विचाराचे अंतःसूत्र आहे. जगातील अनेक राष्ट्रीत भिन्न समस्या सोडवण्यासाठी व अन्याय निवारण्यासाठी सत्याग्रहाचा अवलंब केला आहे. गांधींच्या नेत्वृत्वाखाली चाललेल्या या सत्याग्रह चळवळीला धर्माचे अधिष्ठान होते. आपली चळवळ ही खऱ्या अर्थाने धार्मिक आहे. सत्याग्रह हे केवळ एक आध्यात्मिक हत्यार आहे, असे त्यांनी म्हटले आहे. गांधीनी सत्याग्रहाचे वर्णन अनेकदा शांततामय बंड असे केले आहे. प्रस्थापित कायद्याचा उघडपणे किंवा सामुदायिकरीत्या भंग करणे हे त्यांच्या कार्यक्रमाचे प्रमुख अंग होते. गांधीप्रणीत सत्याग्रहाची चळवळ ही सनदशीर चळवळीलाच जवळ आहे. सत्य अणि अहिंसेच्या साह्याने दुष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह या शब्दाचा अर्थ सत्यासाठी आग्रह धरणे. सत्याग्रहाच्या या प्रयोगात प्रतिपक्षावर हिंसेचा प्रयोग करता येत नाहीत. सत्याग्रहात प्रतिपक्षाचे मन, अंतःकरण बदलण्यावर भर दयावा लागतो. राजकीय क्षेत्रात सतत होणारे अन्याय, जुलूम व शौषण याविरुध्द लढा देण्यासाठी सत्याग्रह हे एक प्रभावी साधन आहे असे गांधीजी म्हणत.[२३]

सत्य म्हणजे काय ? पृथ्वी ही सत्याच्या बळावर टिकलेली आहे. असत - असत्य - म्हणजे 'नाही' सत - सत्य - म्हणजे 'आहे.' असत्ला जेथे अस्तित्वच नाही तेथ् त्याचा जय कसा असणार? आणि आहे त्याचा नाश कोण करु शकणार ? एवढ्यात सत्याग्रहाचे सर्व शास्त्र आले.

सत्य ही इतकी पुरातन आणि बहुमोल वस्तू आहे, की जसजसा त्याचा विचार करीत जावे तसतसे वाटू लागते, की सत्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर देहाविषयीचा अनुराग अगदी नाहीसा झाला पाहिजे. मोक्षासाठी मनाची तगमग झाली पाहिजे. मोक्षाची किंमत या विचाराने वाटत गेली पाहिजे.

ती सर्वांत बहुमोल वस्तू आहे. अर्थात या देहात ती अप्राप्यच समजली पाहिजे. जोपर्यंत देहरुपी कवाडे उघडलेली नाहीत तोपर्यंत मोक्षाचा सुगंध यावयाचा नाही. ही गोष्ट कोणाला कदाचित भयंकर वाटेल, पण सिध्दांत मात्र हाच आहे. गांधींच्या मते, "माझ्या मनाने सत्य हे सर्वश्रेष्ठ आहे अणि त्याच्यात अगणित गोष्टींचा समावेश होतो. हे सत्य म्हणजे स्थूल - वाचेचे - सत्यच नव्हे. ते वाचेचे तसेच विचारांचेंही सत्य समजावे. हे सत्य म्हणजे आपल्या कल्पनेत असलेलेच सत्य नव्हे; तर स्वातंत्र्य, चिरस्थायी सत्य म्हणजे परमेश्वरचं." गांधीं म्हणत, "मी सत्यरुपी परमेश्वराचा पूजक आहे. तोच एक सत्य आहे. बाकी सर्व मिथ्थ्या आहे. ते सत्य मला सापडलेले नाही; पण मी त्याचा शोधक आहे. ते शोधण्याकरिता मला अत्यंत प्रिय असलेल्या वस्तूचा त्याग करण्याला ही मी तयार आहे आणि या शोधरुपी यज्ञात या शरीराची ही आहुती देण्याची माझी तयारी आहे. तशी माझी शक्ती आहे असा मला विश्वास आहे, पण त्या सत्याचा मला साक्षात्कार होत नाही, तोपर्यंत माझा अंतरात्मा जे सत्य मानतो त्या कल्पनेतील सत्यालाच माझा आधार मानून माझा दीपस्तंभ समजून, त्याच्या आश्रयाने माझे जीवन मी व्यतीत करीत आहे. सत्याचा मार्ग जरी तलवारीच्या धारेवर चालण्यासारखा असला तरी मला तो अत्यंत सोपा वाटला आहे. त्या मार्गाने जात असताना झालेल्या भयंकर चुकाही मला क्षुल्लक वाटल्या आहेत. कारण त्या चुका करीत असतानासुध्दा मी त्यातून वाचलो आहे आणि माझ्या समजुतीप्रमाणे, पुढे गेलो आहे. अगदी दुरुन विशुध्द सत्याचे - ईश्वराचे - पुसट का होईना दर्शन मला लाभत आहे. सत्य हेच एक आहे, त्याशिवाय दुसरे काहीच या जगात नाही, हा माझा विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे. आणखी मला असेही जास्त जास्त वाटत चालले आहे, की जेवढे करणे मला शक्य आहे तेवढे एखाद्या लहान मुलालासुध्दा शक्य आहे आणि असे वाटण्याला मजजवळ कारणे आहेत. सत्याच्या शोधाची साधणं जितकी कठीण तितकीच

सोपी आहेत. ती अभिमानी माणसाला अशक्यशी वाटतील. सत्याच्या शोधकाला रजःकणाहूनही तुच्छ व्हावे लागते. सगळे जग धुळीच्या कणाला तुडविते; पण तो कणसुध्दा सत्याचा पूजक अल्प बनला नाही, तोवर त्याला निर्विकल्प सत्याचे अल्पही दर्शन दुर्लभ आहे. सत्याच्या मार्गावरचा मी एक केवळ वाटसरु आहे. तो मार्ग मला पटला आहे. आणि त्याचा शोध करण्याचा मी सतत प्रयत्न करीत आहे, एवढाच माझा दावा आहे; पण ते सत्य मला अजून सापडलेले नाही, हे मी कबूल करतो. पूर्ण सत्य सापडणे म्हणजे आत्मसाक्षात्कार होणे आणि आपल्या जीवनाचे मूळ कारण हाती येणे म्हणजेच पूर्णावस्थेला पोचणे. माझ्या उणिवांची मला दुःखद जाणीव आहे आणि त्या जाणिवेतच माझे सगळे बळ साठवले आहे, कारण स्वतःची अपूर्णता आणि स्वतःच्या उणिव लक्षात येणे ही या जागात दुर्लभ गोष्ट आहे.

लहानपणापासून मी सत्याचा उपासक आहे. माझ्या बाबतीत ही अत्यंत सहज अशी गोष्ट होती. भक्तियुक्त अंतःकरणाने केलेल्या शोधाअंती 'ईश्वर सत्य आहे' या पाचलित सूत्राऐवजी 'सत्य हेच ईश्वर आहे' हे वस्तुस्थितीचे मर्म प्रकट करणारे सूत्र मला लाभते, असे गांधीजी म्हणतात. सत्याची व्याख्या सर्वांच्या अंतःकरणातच आहे. तुम्ही या क्षणी जे खरे मानीत असाल ते तुमचे सत्य आणि तोच तुमचा परमेश्वर. या स्वकल्पित सत्याची आराधना करताना मनुष्य अंतिम शुध्द सत्याकडे जाऊन पोचणारच आणि तोच परमात्मा आहे. माझे जीवन एकमेकापासून अलग अशा अनेक विभागांत मी वाटू शकत नाही. ते अखंड आहे. माझ्या एकूण एक प्रवृत्तीचे मूळ एकच आढळून येईल. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ते लहान असो की मोठे असो, सत्य-अहिंसेची उपासना करणे हे माझे ध्येय आहे. अहिंसेच्या स्वरुपातील सत्याचे दर्शन ही शुध्दा निरासक्त असलेल्या मनुष्यालाच लाभणे शक्य आहे. क्रोध, लोभ, अहंकार, भय अशा गोष्टींनी सत्यशोधकाच्या डोळ्यावर पडदा येत असतो. कोणत्याही गोष्टीला

सत्यावाचून शोभा नाही. म्हणून आपण आहो तसे स्वतःला जगापुढे दाखवू, असा सर्वांनी निश्चय करावा. जसे आहोत तसे दाखवण्यात जो आनंद आहे, तो शृंगार करण्यात, चेहरा सजविण्यात नाही. वाकडी टोपी घालणे, अमुक पध्दतीने साडी नेसणे, भांग पाडणे यात असत्य आहे. जो मनुष्य अनेक वेश करुन आपण नाही तसा दिसू इच्छितो तो खोट्याचा धडा शिकू लागतो. खऱ्याच्या आधारावर आपल्याला मोठी इमारत उभी करता येइल असे गांधीं म्हणत.[२४]

### २.५.१ सत्याचा आग्रह :

संपूर्ण सत्य जर आपल्यालाच दिसले असते तर मग सत्याचा आग्रह कशाला? मग तर आपण परमेश्वरच झालो. कारण सत्य हेच परमेश्वर अशी आपली भावना आहे. पूर्ण सत्य आपण ओळखत नाही. म्हणून त्याचा आग्रह ठेवतो, त्यामुळेच पुरुषार्थाला वाव आहे. यात आपली अपूर्णता आपण कबूलच करतो.

सत्य सदैव स्वयंसिध्द असते आणि काही झाले तरी ते न सोडणे हेच सर्वांचे कर्तव्य आहे. सत्याग्रह करणाऱ्यांनी आधी आपले हृदय- संशोधन करावे. आपण खरोखर सत्याचाच शोध करीत आहोत का ? हे त्यांनी स्वतःला विचारावे. तसे नसेल तर तो तुमचा आग्रह म्हणजे सत्याची विटंबना होइल. जी वस्तू आपली स्वतःची नाही, ती मिळवायला जेव्हा मनुष्य प्रवृत्त होतो तेव्हा ती त्याला ते अहिंसेने मिळणे कठीण असते आणि अहिंसेशिवाय तर सत्यप्राप्ती नाही.

सत्याची आणि अहिंसेची तुलना काय करायची? पण करावीच लागली तर मी म्हणेण-सत्य हे अहिंसेहूनही श्रेष्ठ आहे. कारण असत्य हीसुध्दा हिंसा आहे. ज्याला सत्यप्रिय आहे तो अहिंसेप्रत केव्हाना

केव्हा जाणारच. त्रिकालाबाधित सत्य म्हणून मी सत्य आणि अहिंसा याखेरीज एकही गोष्ट मांडलेली नाही. नव्हे, पुढे जाऊन मी म्हणेन, की त्रिकालाबाधित वस्तू एक सत्य आहे. कारण जरी अहिंसा आणि सत्य एकच आहेत तरी, दोहोमध्ये निवड करण्याची पाळी आली तर अहिंसेच्या ठिकऱ्या करुन सत्याची स्थापना करण्याला मी करणार नाही. सत्य हेच माझ्या मताने सर्वश्रेष्ठ आहे असे गांधीं म्हणतात

सत्य आणि अहिंसा ही समाजावादात साकार झाली पाहिजे. तसे होणे शक्य व्हावे याकरिता सत्य, अहिंसेच्या उपासकाची ईश्वरावर जिवंत श्रध्दा पाहिजे. सत्य-अहिंसेचे केवळ यंत्रवत पालन करण्याने ती ऐन वेळी मोडून पाडण्याचा संभव आहे. म्हणूनच मी सत्य हे ईश्वर आहे असे म्हटले. हा ईश्वर म्हणजे चिच्छक्ती आहे. आमचे जीवन त्या शक्तींचे बनलेले आहे. ती शक्ती देहांत राहते; पण देह म्हणजे ती नव्हे. त्या महान शक्तीचे अस्तित्व जो नाकारतो त्याला ती अक्षय्य शक्ती लाभत नाही आणि त्यामुळे तो पौरुषहीन राहतो. ही अहिंसारुपी शक्ती आणि तिचे संभाव्य परिणाम जाणून घेणे हे अत्यंत प्रयासयुक्त संशोधनाचे काम आहे. या अखंड संशोधनातूनच मला सत्याग्रह सापडला असा माझा दावा आहे. अर्थात सत्याग्रहाचा सगळा आचारधर्म आखला गेला आहे किंवा उमगला आहे असे माझे म्हणणे नाही. एवढे मात्र मी नि:संशय व निश्चितपणे सांगतो, की सत्याग्रहाचा अवलंब करुन कोणतेही रास्त उद्दिष्ट साधता येते. सत्याग्रह हा अत्यंत उच्चप्रतीचा व अचूक असा उपाय आहे. ती अत्यंत महान अशी शक्ती आहे. सत्याग्रहाने समाजातील राजकीय, आर्थिक आणि नैतिक अशा सर्व अनिष्ट प्रवृत्ती नाहीशा करता येतील.

आपल्याला सत्य कितपत प्रिय आहे आणि ते आपण विचारात, उच्चारात, आचारात कितपत पाळतो हे स्वत:ला विचारले पाहिजे. जो मनुष्य सत्यनिष्ठ नाही तो अहिंसेपासून फार दूर आहे. असत्य म्हणजेच हिंसा.[२५]

## २.५.२ सत्याग्रहाचे शस्त्र आणि शास्त्र :

'सत्याग्रह' या शब्दाचा अर्थ सत्याला चिकटून राहणे असा आहे. यावरुन सत्य-बळ असा अर्थ निघाला. मी त्याला प्रेमबळ किंवा आत्मबळ असे म्हटले आहे. अगदी प्रारंभीच्या अवस्थेतच मला असे दिसून आले, की आपल्या विरोधकावर हिंसेचा प्रयोग करण्याला सत्य-साधनेत स्थान नाही. त्याला धीराने आणि सहानुभूतीने त्याच्या चुकीपासून परावृत्त केले पाहिजे. कारण एकाला जे सत्य भासते ते दुसऱ्याला चूक वाटण्याचा संभव आहे. धीर धरणे म्हणजे आत्मक्लेश सहन करणे. तेव्हा या सिध्दांताचा अर्थ, सत्याची प्रस्थापना . विरोधकाला क्लेश देऊन नव्हे तर स्वत: क्लेश सोसून करणे, असा झाला.

हजारो काय, लाखो माणसे प्रेमाला वश राहून आपले जीवन घालवितात, कोट्यावधी कुटुंबांतील तंटे आपसातील प्रेमभावनेत विरुन जातात. शेकडो समाज गुण्यागोविंदाने राहत आले आहेत. याची नोंद इतिहास ठेवीत नाही. तो ठेवूही शकणार नाही. जेव्हा हा दयेचा, प्रेमाचा किंवा सत्याचा प्रवाह अडतो, त्यात भंग पडतो तेंव्हाच त्याची नोंद इतिहासात होते. जी गोष्ट कुटुंबाच्या, जमातीच्या संघाच्या बाबतीत तीच राष्ट्राच्याही बाबतीत लागू समजावी. कुटुंबात एक कायदा आणि राष्ट्राराष्ट्रांत दुसरा असे माणण्याचे बिलकूल कारण नाही. इतिहास हा अस्वाभाविक घटनांची नोंद घेत असतो. सत्याग्रह हा स्वाभाविक असल्यामुळे त्याची नोंद घेण्याचे कारणच राहत नाही.

सत्याग्रह हा सरकारच्या विरुध्दच फक्त करता येतो असे नाही. तो कुटुंबांविरुध्द आणि समाजाविरुध्दही करता येतो. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात आणि कसल्याही प्रकारच्या कोणत्याही क्षेत्रात? आणि कसल्याही प्रकारच्या गाऱ्हाण्याचे निवारण करण्याकरिता या हत्याराचा उपयोग आपल्याला करता येईल. हे हत्यार उपयोगात आणणाऱ्याची तसेच ज्याच्या विरुध्द ते उपयोगात आणले जाईल त्याचीही ते शुध्दी करते. या हत्याराचा सदुपयोग  कधीही वाया जात नाही. सत्याग्रहाला दुराग्रहाचे रुप आले आणि त्यामुळे जर  कुपरिणाम  निपजले तर त्याचा दोष सत्याग्रहाला लावता येणार नाही.

सत्याग्रहाचा उपयोग केवळ धार्मिक क्षेत्रातच करावा असे कित्येकांचे मत आहे. माझ्या व्यापक अनुभवातून माझे मत उलट झाले आहे. इतरही क्षेत्रात त्याचा आपल्याला उपयोग करता येतो आणि त्या क्षेत्रांना आध्यात्मिक स्वरुप देता येते; असे करण्याने यश लवकर पदरात पडते व पुष्कळ चुकीच्या गोष्टी करण्यापासून आपण बचावतो. माझे असे निश्चित मत आहे, की सत्याग्रहात अर्थशास्त्राच्या संशयातीत नियमांचे पालन येते आणि म्हणून सत्याग्रह ही व्यावहारिक गोष्ट आहे. असे मी मानतो. वर मी सांगितल्याप्रमाणे  सत्याग्रह हे अगदी नवीन हत्यार असल्यामुळे ते समजून यायला आणि लोकांनी ते ग्रहण करण्याला काळ लागण्याचा संभव आहे आणि  ज्या गोष्टीतून अतिमहान आणि चांगले परिणाम निपजतात अशा गोष्टी व्हायला काळ हा लागतोच, परंतु जेव्हा तो साऱ्या देशभर पसरेल तेव्हा ज्या राजकीय व सामाजिक सुधारण्या घडून यावयाला आज फार काळ लागत आहे, त्या मानाने कमी वेळात पदरात पडतील, राज्यकर्ते व प्रजा यांच्यात पडलेला अंतराळ साधला जाईल आणि अविश्वास व दुजाभाव यांच्या जागी विश्वास व प्रेमभाव येईल. जर सारे राष्ट्र, सत्याग्रह हेच आपले कायमचे शस्त्र, असे ठरवतील तर आमच्या सर्व हालचालींना निराळेच रुप येईल. सत्याग्रहात जेवढी राष्ट्राची सामाजिक,

आर्थिक आणि राजकीय प्रगती मला दिसते तेवढी दुसऱ्या कशातही दिसत नाही, असे गांधीजी म्हणतात. सत्याग्रहाच्या पध्दतीत नेहमी सत्याला चिकटून राहाणे येते. कोणत्याही कारणाकरिता अगदी आपल्या देशाकरितासुध्दा सत्य कधीही सोडून देता येणार नाही. सत्याग्रहाच्या या अलौकिक पध्दतीत सत्याचा अंती विजय नेहमी गृहीत धरलेला असतो. सत्याची तलवार जर हाती असेल तर उपासकाला पोलादी तलवारीची किंवा दारुगोळ्याची काही गरज नाही. शत्रूला तो आत्मबलाने म्हणजेच प्रेमाने जिंकतो. प्रेमाची कसोटी मित्रा-मित्रांत होत नसते. मित्राने मित्रावर प्रेम करणे यात नवलही नाही, गुणही नाही किंवा त्यात कष्टही नाहीत. त्याची खरी कसोटी शत्रू म्हटलेल्यावर जेव्हा आपण त्याचा प्रयोग करु तेव्हाच होते. ते एक पुरुषार्थाचे आणि खऱ्या शौर्याचे कृत्य होते. योग्य किंवा न्याय्य काय ते पटवून देण्याची व मनुष्यप्राण्यात असलेल्या बुध्दीला आणि सहसंवेदनावृत्तीला आवाहन करुन मन पालटविण्याची सत्याग्रह ही एक पध्दती आहे. मानवात जो अंतिम संदेश आहे त्यावर सत्याग्रहाची भिस्त असते. सत्याग्रही या नात्याने माझा नियमच आहे, की कोणाही विरुध्द काही करायचे झाले तर अगोदर त्या माणसाचा दृष्टिबिंदू त्याच्याकडूनच समजावून घ्यायचा आणि जेथपर्यंत त्याच्याशी अनुकूल होता येत असेल तेथपर्यंत त्याला अनुकूल व्हायचे. सत्याग्रह्याने एकदा आपली कमीत कमी मागणी काय ते ठरवून टाकल्यानंतर त्यापासून माघार घेऊ नये. अशा रीतीने नमून साऱ्या जगाला जिंकता येईल.

सत्याग्रह ही प्रत्यक्ष प्रतिकाराच्या अत्यंत प्रभावशाली पध्दतींपैकी एक पध्दती असल्यामुळे सत्याग्रही हा इतर सर्व साधने अगोदर आजमावून पाहून संपवितो आणि शेवटी सत्याग्रहाचा अवलंब करतो. म्हणून तो प्रस्थापित सत्ताधिकाऱ्यांच्याकडे वरचेवर आणि सतत जाईल, लोकमनाला आवाहन करील व ते शिक्षित करील, जो कोणी त्याची बाजू ऐकून घेण्याची इच्छा धरील त्या प्रत्येकापुढे ती तो

शांतपणे आणि निर्विकारपणे मांडील आणि हे सर्व मार्ग आजमावल्यानंतरच तो सत्याग्रहाचा अवलंब करील; पण मग एकदा का त्याला त्याच्या अंतरातून प्रेरणा देणारी हाक आली आणि तो सत्याग्रह करायला निघाला, की मग त्याला मागचे दोर कापावेच लागतात; मग मागे पाऊल घेणे उरतच नाही.

सत्याग्रह सहजगत्या प्राप्त होतो, त्याला शोधीत जावे लागत नाही. हीच सत्याग्रहाची खुबी आहे. हा मूळ त्या तत्त्वातील अंगभूत गुण आहे. सत्याग्रही म्हणविणारांनी आपली इच्छा जर इतरांवर लादली तर तो जुलूम नोकरशाहीच्या जुलूमापेक्षाही अधिक वाईट होईल. म्हणून सत्याग्रह्यांनी आपल्या लढ्यातून कोणत्याही स्वरुपातील जबरदस्ती काढून टाकली पाहिजे. असहकारितेचा सिध्दांत स्वेच्छेने मानणारे जर मूठभर लोक असतील तर दुसऱ्यांना आपल्या मताचे करुन घेण्याच्या प्रयत्नात त्यांना कदाचित आपला जीव द्यावा लागेल; पण त्यायोगेच त्यांनी आपल्या कार्याचे इतरांना योग्य दर्शन करुन दिले व त्याचे समर्थन केले असे होईल.[२६]

**२.५.३ सत्याग्रही व्यक्तीच्या अंगी पुढील गुण असावेत, असा गांधींचा आग्रह होता :-**

१. सत्याग्रही व्यक्ती निःस्वार्थी असावी, तिचे चारित्र्य निष्कलंक असावे.

२. सत्याग्रही व्यक्तीने ब्रम्हाचर्याचे पालन करावे.

३. सत्याग्रही व्यक्तीने स्वदेशी वस्तूंचाच वापर करावा.

४. सत्य व अहिंसा या दोन्हींवर सत्याग्रहींची श्रध्दा असावी.

५. सत्याग्रही व्यक्तीने शिस्तीचे पालन करावे. सत्याग्रहीने कायद्याचे व तुरुंगातील नियमांचे पालन करावे.

६. समाजातील सर्व व्यक्तींकडे समानतेच्या भावनेतून सत्याग्रहीने पाहावे.

७. सत्याग्रही व्यक्तीत त्यागाची भावना हवी, तिने त्रास सहन करण्याची तयारी ठेवावी. शुध्द जीवनाच्या मार्गाने ती जात असली पाहिजे.

८. सत्याग्रहीची ईश्वरावर निष्ठा असावी.कारण या आत्मबलानेच तो ईश्वरावर मात करु शकतो.

९. सत्याग्रहीने विरोधकावर किंवा प्रतिस्पर्धी व्यक्तीबद्दल विश्वास व प्रेम ठेवावे, त्याच्या मताबद्दल आदर ठेवावा. त्याचा राग-द्वेष करु नये.

१०. सत्याग्रहीने आपला संयम ढळू देता कामा नये. अंगीकृत कार्यावरील श्रध्दा कधीही नष्ट होऊ देऊ नये.

११. सत्याग्रही व्यक्तीने कधीही निराश होऊ नये. एक प्रकारचा कमालीचा आशावाद सत्याग्रहीच्या अंगी असावा. सत्याग्रही व्यक्ती अखंड उत्साही असावी.

१२. सत्याग्रही व्यक्ती खादीधारी व सूत कातणारी असली पाहिजे.

१३. सत्याग्रहीस दारु वा इतर मादक पदार्थाचे व्यसन असू नये.

१४. सत्याग्रही जवळ संपत्ती असू शकेल; पण पैसा हाच त्याचा परमेश्वर किंवा जीवनाचे अंतिम ध्येय असू शकणार नाही.

१५. सत्याग्रह्याला कुटुंबाची माया सोडावी लागते. ही अवघड बाब आहे.

१६. जो धर्माविषयी खरी आस्था बाळगतो तोच खरा सत्याग्रही होऊ शकतो.

१७. सत्याग्रही हा नेहमीच साधुत्वाने- असाधुत्वाला, प्रेमाने -क्रोधाला, सत्याने- असत्याला, अहिंसेने -हिंसेला जिंकण्याचा प्रयत्न करील

१८. प्रत्येक सत्याग्रहीने स्वत:स घेरणारी भये टाकून मृत्यूचे स्वागत करण्यास सिध्द असले पाहिजे. व्यक्ती, समाज, सरकार, दारिद्र्य व मृत्यू यांविषयी सत्याग्रह्याला भय वाटू नये.

**२.५.४ सत्याग्रहासंबंधीचे नियम :**

१. सत्याग्रहीने अगोदर सर्व सनदशीर मार्गांचा अवलंब करावा व सर्व उपाय हरल्यानंतर सत्याग्रहाकडे वळावे.

२. सत्याग्रहीने कोणतीही कृती उघडपणे करावी. त्यात गुप्तता असू नये.

३. शत्रू संकटात असेल त्यावेळी सत्याग्रह करु नये.

४. सत्याग्रहीच्या मागण्या स्वस्वार्थावर आधारलेल्या नसाव्यात. सत्याग्रह समाजहितासाठीच करावयाचा असतो.

५. सत्याग्रहीने तडजोड जरुर करावी; पण ती लाचारीची तडजोड असू नये.

६. सत्याग्रहात वैयक्तिक आणि संकुचित अशा प्रकारच्या बाबींनाही महत्त्व असू नये.

७. सत्याग्रह करण्यापूर्वी प्रार्थनेचा मार्ग अवलंबावा. प्रार्थनेच्या मार्गाने समस्या सुटू शकली नाही, तर सत्याग्रहाचा मार्ग उचित ठरतो.

८. जनमताचा पाठिंबा सत्याग्रहासाठी आवश्यक आहे. जनमताच्या पाठिंबाअभावी सत्याग्रह कधीही यशस्वी होणार नाही.

९. सत्याग्रहामध्ये नेत्याच्या आज्ञेचे पालन जरुर केले पाहिजे.

१०. सत्याग्रह हा पक्षांच्या व वर्ग आणि संप्रदाय अशा भेदांच्या अतीत आहे.

११. ज्यांना अन्याय सोसावा लागतो, त्यांनीच सत्याग्रह करावा. अन्याय करण्याकरिता सत्याग्रह होऊच शकत नाही.

१२. विरोधकांमध्ये जे सर्वोत्कृष्ट आहेत त्यांचा शोध घ्यावा .

१३. कोणी अधिकारी सत्याग्रह्याला जेव्हा पकडू पाहील तेव्हा सत्याग्रही आपणहून पकडून घेईल. सत्याग्रह्याने त्याची मालमत्ता जप्त होताना विरोध करु नये.

१४. सत्याग्रह्याने प्रतिपक्षाचा अपमान करु नये. तुरुंग अधिकाऱ्यांशी सौजन्याने वागावे.

१५. सत्याग्रही जाणूनबूजून जातीय झगड्यास कारणीभूत होणार नाही.

गांधींच्या मते, सत्याग्रह ही अत्यंत खडतर व कठीण साधना आहे. त्यासाठी शरीराची व मनाची फार मोठी उडी सत्याग्रहीला गाठावी लागते. शरीरापेक्षा आत्मा व मन श्रेष्ठ आहे ही जाणीव सत्याग्रहीला सतत ठेवावी लागते. सत्याग्रह हा अनेकविध गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्याचा मार्ग आहे. अहिंसेवर, प्रेमावर जी भूमिगत चळवळ करण्यात आली होती ती गांधींच्या सत्याग्रहाच्या व्याख्येत बसत नाही, हे गांधीनी स्वतःच स्पष्ट केले होते. तसेच १९४२ च्या आंदोलनात जी समांतर सरकारे महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व बिहारमध्ये स्थापन झाली होती ती ही गांधींच्या सत्याग्रहाच्या व्याख्येत बसत नाहीत.[२७]

### २.५.५ सत्याग्रहाची साधने/ अहिंसात्मक आंदोलनाची तंत्रे पध्दती :

सत्याग्रहासाठी विविध मार्गांचा अवलंब करावा लागतो. गांधींनी अहिंसात्मक आंदोलनाच्या मार्गासाठी ज्या पध्दतीचा; तंत्राचा अवलंब केला ती तंत्रे /साधने /मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

## १) असहकार :

असहकाराच्या मार्गाचा अवलंब  करुन शासनाच्या विरोधी काम करता येते व शासनाचे मन वळवता येते. अशी गांधींची धारणा होती. असहकाराच्या मार्गाचे गांधींनी व्यथित असा 'प्रेमाचा आविष्कार' या शब्दांत वर्णन केले आहे. जनतेच्या सहकार्यावरच शासन चालत असते.जनतेचे सहकार्य नसेल तर कोणतेही शासन चालत नाही. म्हणून जनतेने भारतातील ब्रिटिश शासनास कोणतेही सहकार्य करु नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. असहकार या तंत्रामागे सरकारला त्याच्या चुकांची जाणीव करुन देता येईल. असहकाराचा हा मार्ग अत्यंत प्रभावी असून राजकीय क्षेत्रातच नव्हे तर जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात असहकाराच्या मार्गाचा अवलंब करावा, असे गांधीं म्हणत शासनाने केलेला अन्याय, शोषण, जुलूम नष्ट करण्यासाठी असहकार हे अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. असहकाराचा मार्ग अवलंबिला तर सरकारला राज्यकारभारच करणे कठीण आहे. दडपशाही व अन्यायातून मुक्ती हवी असेल तर असहकाराचा मार्ग प्रभावी आहे, असे मत गांधींनी मांडले होते. राज्य ही एक सामाजिक संस्था आहे. प्रजेने इच्छेने किंवा अनिच्छेने दिलेल्या सहकार्यावरच तिची उभारणी व अस्तित्व असते. प्रजेचे सहकार्य नसेल तर शासन कोसळते; असे ते म्हणत. असहकार म्हणजे स्वतःच्या अटीवर सहकार्य करण्याची जनतेने शासनास दिलेली समज होय. अशा अटी घालणे हा प्रत्येक राष्ट्रातील लोकांचा मूलभूत हक्क आहे. त्या अटी मान्य करणे हे शासनाचे कर्तव्य आहे, असा गांधींचा युक्तिवाद होता.

गांधींनी म्हटले होते, असहकार हे केवळ निषेधपर तत्त्व आहे असे म्हणणे योग्य नाही. भारत व इग्लंड यांमध्ये एखादी अभेद्य भिंत उभी करणे हा असहकाराच्या चळवळीचा उद्देश नाही. आमचा विरोध सक्तीच्या सहकार्याला आहे. भारताची इग्लंडशी घातली गेलेली सांगड खुशीची नाही. लष्करी सत्तेच्या

जोरावर इंग्रज भारतात उभे आहेत. सामान्य लोकांचे शोषण करण्यासाठी येथे सत्तेचा वापर केला जात आहे.

१९२० च्या असहकार चळवळीत गांधींनी विदेशी वस्तूंवर बहिष्कार, न्यायालयावर बहिष्कार , सरकारने दिलेली पदे, पदव्या यांचा त्याग करणे, स्थानिक स्वराज्य संस्था व कायदेमंडळावर बहिष्कार, ब्रिटिशप्रणीत शाळा - कॉलेजावर बहिष्कार इ. कार्यक्रम जनतेपुढे ठेवला होता. त्यास देशपातळीवर प्रतिसादही मिळाला होता. शिक्षण संस्थांवर बहिष्कार टाकला गेला; पण प्रत्यक्ष व्यवहारात राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची संख्या फारच अपुरी होती. असहकार चळवळीच्या माध्यमातून गांधींनी भडकलेल्या भावनांना शांततामय पध्दतीने आविष्कार करण्याची संधी मिळवून दिली व संघटित शक्तीचे प्रदर्शन देशपातळीवर करण्यात यश मिळविले यात शंका नाही. गांधीं म्हणत असहकार ही काही निष्क्रिय अवस्था नाही. ती शारीरिक प्रतिकारापेक्षा जास्त क्रियाशील आहे. असहकाराचा लढा हा अहिंसक लढा आहे. म्हणून त्यात नम्रता गृहीत आहे. तो सत्याला धरुन असलेला लढा आहे. तेंव्हा त्यात सत्य आहे. असहंकारवादी जर नम्र नसेल तर तो असहकारवादीच नव्हे. असहकार ही शुध्दीची प्रक्रिया आहे आणि त्यामुळेच माणसाच्या मतप्रणालीत क्रांती घडून येते. अहिंसा हा असहकाराचा एक महत्त्वाचा असा भाग आहे. असहकार हे त्यागाचे व शिस्तबध्दतेचे पाऊल आहे. त्यात विरुध्द मताविषयी सहनशीलता व आदर असला पाहिजे. असहकार पुकारताना इंग्रज लोकांबद्दल असलेली मैत्रीची भावना गांधीजींनी वारंवार व्यक्त केली होती. असहकार म्हणजे स्वतःच्या अटीवर सहकार्य करण्याची जनतेने शासनाला दिलेली समज होय. अशा अटी घालणे हा प्रत्येक राष्ट्रातील लोकांचा मूलभूत हक्क आहे. त्या अटी मान्य करणे शासनाचे कर्तव्य आहे, असा गांधींचा युक्तिवाद होता.

## २) सविनय कायदेभंग :

सरकार जर अन्यायी व जुलमी कायदे पास करीत असेल तर त्या कायद्याचे पालन लोकांनी करु नये असे गांधीं म्हणत. अन्यायी कायदे मोडण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. एवढेच नव्हे तर ते त्याचे नैतिक कर्तव्य आहे. अन्यायाचे निराकरण करण्याचे इतर मार्ग निष्फळ ठरले असतील तर वैयक्तिक कायदेभंग करण्यास हरकत नाही. सामुदायिक कायदेभंगात मात्र हिंसेचा उद्रेक होण्याचा धोका असतो. सविनय कायदेभंगाची लोकांना सवय नसल्याने प्रारंभीच्या काळात त्यांच्या हातून हिंसक कृत्ये घडण्याचा धोका असतो; परंतु कायदेभंगाचे शस्त्र यशस्वीपणे हाताळण्याचा विश्वास निर्माण झाल्यास हिंसेवर मात्र आपोआप नियंत्रण बसेल, असे गांधीं म्हणत. सविनय कायदेभंग करणारा कधी शस्त्रास्त्रांचा वापर करत नाही. सभ्यता, संयम, विवेक, अहिंसा हे गुण नसलेला कायदेभंग म्हणजे निश्चित नाश होय. प्रेमयुक्त कायदेभंग हा साक्षात् जीवनाचा सुधारसच होय असे गांधींनी म्हटले होते. गांधींची सविनय कायदेभंगाची तुलना सशस्त्र बंडाशी केली आहे. संपूर्ण सविनय कायदेभंग म्हणजे शांततापूर्वक केलेले बंड होय. सविनय कायदेभंग म्हणजे अराजक नव्हे. सविनय कायदेभंगामधून हिंसाचाराला उत्तेजन मिळता कामा नये असे गांधीं म्हणत . सामान्य लोकांच्या हक्कावर ज्यामुळे अक्षम्य अतिक्रमण होते असेच कायदे मोडण्यावर १९३० मध्ये गांधींचा भर होता. म्हणूनच त्यांनी सविनय कायदेभंगाची सुरुवात मिठाच्या कायद्यांपासून केली होती. चोर, गुन्हेगार, खुनी हे कायद्याचा भंग करीत असले तरी ते गुन्हेगार असतात. समाजाचे शत्रू मानले जातात. सामूहिक कायदेभंगाच्या कृतीमागे संपूर्ण समाजाच्या एखाद्या घटकाचे हित दडलेले असते. रस्ता रोखणे, घेराओ घालणे, हे मार्ग गांधींना पसंत नव्हते. भूमिगत चळवळीसही त्यांचा आक्षेप होता. राजकीय लढ्यातील गुप्ततेला गांधींचा मुळातच विरोध होता. सविनय

कायदेभंग म्हणजे घटनात्मकरीतीने पास केलेला; पण नीतीशी संबंध नसलेल्या कायद्याचा भंग होय. वैयक्तिक किंवा सामुदायिक सविनय कायदेभंग हा विधायक कार्याला साहाय्यक असतो आणि सशस्त्र बंडाची जागा तो पूर्णत: घेऊ शकतो.

**३) हरताळ :**

हरताळाचा अर्थ कामकाजावर बहिष्कार असा होतो. व्यापारी, कामगार, शिक्षक यांनी त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द या तंत्राचा वापर करावा, असा गांधींनी सल्ला दिला होता. हरताळात हिंसा घडत नाही तर प्रतिपक्षावर दडपण मात्र येते. हरताळ हे नैतिक शस्त्र आहे. त्याचा नेहमीच वापर झाला तर त्याची परिणामकारकता कमी होते. हरताळ याचा अर्थ व्यवहार बंद ठेवणे, वारंवार हरताळ झाले तर त्यामुळे जनजीवन विस्कळीत होते. हरताळात प्रत्येक व्यक्तीने स्वेच्छेने व्यवहार बंद ठेवावेत. त्याबाबत सक्ती झाली तर हरताळ यशस्वी होत नाही. हरताळाच्या या तंत्राचा अत्यंत योजनाबध्द व विचारपूर्वक वापर व्हावा असे गांधीं सुचवतात.

**४) उपोषणे :**

सत्याग्रहाचे अनेक प्रकार आहेत. त्यांपैकी उपवास हा एक प्रकार होऊ शकेल किंवा होऊ शकणार नाही. हे त्या - त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. एखाद्या माणसाने दुसऱ्याकडे थकत असलेली आपली बाकी वसूल करण्याकरिता उपवास केला तर तो सत्याग्रह होऊ शकणार नाही. स्वत:च्या व्यक्तिगत लाभासाठी सत्याग्रहाचा अवलंब करता येणार नाही. इतरांच्या भल्याकरिताच तो

करता येईल. आत्मक्लेश किंवा द्रव्यहानी सोसण्याला सत्याग्रह्याने नेहमीच तयार असले पाहिजे. उपवासाच्या स्वरुपाचा सत्याग्रह विरोधकाला विरोध करण्याकरिता म्हणून करता येणार नाही. आपल्या प्रियजनांच्या आणि आप्तस्वकीयांच्या बाबतीतच आणि तोही त्यांच्या केवळ भल्याच्या दृष्टीनेच, उपवासाचा अवलंब करता येईल.

असहकार व सविनय कायदेभंग याप्रमाणेच उपोषण या साधनाचा वापर राजकीय उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी गांधींनी वारंवार केला होता. हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती वगैरे धर्मामध्ये प्राचीन काळापासून उपोषण हे आत्मशुध्दीचे एक प्रभावी साधन मानले आहे. उपोषण हे अन्याय व अनीती याविरुध्द निषेध नोंदविण्याचे एक प्रभावी व परिणामकारक साधन आहे अशी त्यांची धारणा होती. कोणत्याही कारणासाठी दीर्घमुदतीचा उपवास करण्यापासून गांधींनी कार्यकर्त्यांना परावृत्त कले होते. बेमुदत उपोषणामध्ये नेत्याची शारिरिक ताकद कमी होऊ लागली, की त्याचे अनुयायी अस्वस्थ होतात व ते हिंसेकडे वळतात. याची गांधींना जाणीव असल्याने त्यांनी व्यापक जनअंदोलनाच्या तंत्रामध्ये उपवासाचा समावेश केला नाही. गांधींच्या मते, उपवास हे एक जाज्वल्य शस्त्र आहे. त्यांचे स्वतःचे एक शस्त्र आहे माझ्या माहितीप्रमाणे कोणालाही त्याचे पूर्ण ज्ञान झाले नाही. अंतिम आश्रय म्हणून सत्याग्रहीने उपवासाचा अवलंब करावा. उपवास ही एक आध्यात्मिक उपाययोजना असते अणि म्हणून ती ईश्वराभिमुख असते. उपवासमुळे अन्याय करणाऱ्या व्यक्तीमधील संख्या व संघटना सत्ताधारी यांच्यातील सद्वृत्तीला आवाहन केले जाते. उपोषणाच्या साधनाच्या काही मार्यादा गांधींनी स्पष्ट केल्या होत्या, त्यांत

१) उपोषण वारंवार करु नये . त्यामुळे त्याची परिणामकारकता कमी होते.

२) फळाची आपेक्षा न करता उपोषण चालू ठेवावे.

३)	स्वार्थी हेतूसाठी व्यक्तीगत पातळीवर उपोषण करु नये . उदा. पगारवाढ, इतरांच्या भल्यासाठी उपोषण करावे.

४)	उपोषणाचा दुरुपयोग कधीही होता कामा नये.

५)	श्रध्दा, शांतता व निःस्वार्थबुध्दी यांनीच उपोषण प्रेरित असले पाहिजे.

६)	अंतिम आश्रय म्हणूनच सत्याग्रहीने उपोषण करावे.

७)	उपवास करणाऱ्यात स्वार्थ, रोष, अविश्वास, उतावीळपणा यांचा प्रवेश होता कामा नये.

८)	उपवास करताना अलोट धैर्य, दृढनिश्चय, निष्ठा, पूर्ण मनःशांती व अक्रोध इ. गोष्टी आवश्यक आहेत.

स्वतः गांधींनी दीर्घकाळ उपोषण करण्याचे तंत्र आत्मसात केले होते. स्वतः गांधीजी म्हणतात. मी पहिले जाहीर उपोषण दक्षिण आफ्रिकेत केले होते. उपोषणाचा मार्ग फसल्याचा एकही प्रसंग मला आठवत नाही. उपोषण निष्फळ झाल्याचे मला आठवत नाही. इतकेच नव्हे तर अमूल्य चित्तशांती आणि अमर्याद आनंद याचाच अनुभव या उपोषण प्रसंगी मी घेत आलो आहे; मात्र माझे असे निश्चित अनुमान आहे, की परमेश्वराच्या आदेशावाचून उपोषण करणे ही निरर्थक उपासमार असते, हे खास असे गांधींचे मत होते.

गांधींनी केलेल्या उपवासांपैकी अहमदाबादच्या गिरणी मजुरांच्या संघाच्या बाबतीत १९१८ (ऑक्टोबर) मध्ये केलेला उपवास हा त्यांनी हिंदुस्थानात केलेला पहिला उपवास होय. ६ एप्रिल रोजी रौलेट ॲक्ट (काळा कायदा) विरुध्द त्यांनीही उपवास केला होता. चौरीचौरा प्रकरणी त्यांनी प्रायश्चित्त म्हणून अंतःशुध्दसाठी पाच दिवस व १९२४ साली हिंदू - मुस्लिम ऐक्यासाठी २१ दिवस उपवास केला

होता. १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा घोषित झाला तेव्हा त्यास विरोध करण्यासाठी गांधींनी प्राणांतिक उपोषण केले होते. या उपोषणामुळे सर्वच पक्षांतील पुढारी जागे झाले. १९३३ च्या मेमध्ये २१ दिवस केलेला उपवास कोणत्याही विशिष्ट कारणासाठी नव्हता तर तो केवळ आत्मशुध्दीसाठी आणि सहकाऱ्यांनी विशेष दक्षता बाळगावी यासाठी केला. अंतःकरणापासून केलेली प्रार्थना असे गांधीजींनी राजकोटच्या संस्थानिकाला वठणीवर आणण्यासाठी ही उपवास केला होता. १९४६ मध्ये कोलकत्ता येथे जातीय दंगे शमविण्यासाठी त्यांनी उपोषण केले .

**५) बहिष्कार - निदर्शने :**

जे लोक असहकारात भाग घेत नाहीत त्यांच्याविरुध्द हे शस्त्र वापरावे. असहकारात भाग न घेणाऱ्यांना धाक दाखवू नये. त्यांच्याविरुध्द अर्वाच्य शब्द वापरु नयेत असे सूचीत करुनही अशांविरुध्द सामाजिक बहिष्कार टाकावा असे ते सुचवतात. त्याचा परिणाम म्हणून समाजातील दुष्ट प्रवृत्ती नष्ट होऊन संबंधित व्यक्तीला गैरवर्तनाची जाणीव होईल, अशी त्यांना खात्री होती. अर्थात बहिष्कारामुळे एखाद्या व्यक्तीवर अपमानकारक स्थिती येणार नाही याचीही काळजी घ्यावी, असे ते सुचवतात. गांधींच्या आदेशानुसार १९२० व १९३० मध्ये भारतीय जनतेने शासकीय कचेऱ्या, शाळा, महाविद्यालये, न्यायालये, शासकीय कार्यक्रम, कायदेमंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, विदेशी वस्त्र इ. वर बहिष्कार टाकला होता. कापड किंवा दारु दुकानापुढे निदर्शने करताना काही नियम पाळले जावेत असे गांधींनी म्हटले होते. उदा. दुकानदाराशी उर्मट वर्तन न करणे, रहदारीला अडथळा न होऊ देणे, हाय हाय अशा लज्जा उत्पन्न करणाऱ्या घोषणा न देणे, संख्याबळाचा धाक न दाखवणे वगैरे . गांधीजींच्या मते निरोधन

हा कायदेशीर हक्क आहे. तो नेतिक हक्क आहे. निरोधन असो वा संप असो मालक किंवा मध्यस्थ व्यक्ती यांच्यावर अत्याचार करणे किंवा हिंसा करणे वा गोष्टीपासून आपण पूर्णपणे अलिप्त राहिले पाहिजे. विलायती मालावरील बहिष्कार दृढ स्वावलंबन व स्वयंपूर्णत्वाचे ध्येय गाठण्याचा आर्थिक मार्ग आहे, असे गांधीं म्हणत.

### ६) **हिजरत :**

हिजरत म्हणजे देश त्याग (स्थलांतर) होय. एखादी व्यक्ती, व्यक्तिसमूहावर सतत जेव्हा अन्याय होतो, अहिंसात्मक मार्गाने किंवा हिंसात्मक मार्गानेही प्रतिकार करणे अशक्य होते तेव्हा गांधीं त्या व्यक्तीला / व्यक्तीसमूहाला हिजरतचा सल्ला देतात. अशा वेळी तो प्रदेश / देश सोडून स्थलांतर करावे, असे ते म्हणतात. गुजरातमधील बार्डोली येथील जनता, कोठा येथील हरिजन यांना गांधींना हाच सल्ला दिला होता.

### **२.५.६ सत्याग्रहाचा प्रयोग कोठे कोठे करता येईल?**

१. सामाजिक सुधारणेकरिता सत्याग्रहाचा उपयोग करता येईल. आमच्या सामाजिक संस्थांत जे अनेक दोष आहेत ते आपल्याला सत्याग्रहाने काढून टाकता येतील.

२. हिंदु-मुस्लिमांचा प्रश्न सत्याग्रहाच्या मार्गाने सोडवता येईल.

३. श्रीमंतांना गरिबाविषयीचे कर्तव्य ओळखायला लावण्याच्या कामीही सत्याग्रहाचा उपयोग होईल.

४. धार्मिक अंधश्रध्दा दूर करण्यासाठीही सत्याग्रह करता येइल. धार्मिक सत्याग्रह ही आत्मशुध्दीची एक प्रक्रिया आहे.

५. देशरक्षणाच्या कामी सत्याग्रहाचा उपयोग करता येईल.

६. वांशिक भेदभाव दूर करण्यासाठी सत्याग्रहाचा वापर करता येईल.

सारांश, सत्याग्रहाचा अर्थ व सत्याग्रहासाठी विविध मार्गांचा करावा लागणारा अवलंब याची गांधींनी विस्तृतपणे चर्चा केली होती. सत्याग्रह हे केवळ शारीरिक बळ नसून ते वास्तविक नैतिक आणि आत्मिक बल आहे. हे बल मूलतः क्रियाप्रवण, आक्रमक आणि चैतन्यदायक आहे, असे गांधींनी म्हटले होते. गांधीं म्हणतात, "जर सारे राष्ट्र सत्याग्रह हेच आमचे कायमचे शस्त्र असे ठरवेल तर आमच्या सर्व हालचालींना निराळेच रुप येईल. सत्याग्रहात जेवढी राष्ट्राची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रगती मला दिसते तेवढी दुसरी कशानेही दिसत नाही."[२८]

## २.६ गांधींचे आर्थिक विचार :

### २.६.१ सर्वोदय -

महात्मा गांधींनी रस्किनच्या 'Unto this last' पुस्तकाचा जो गुजराथी भाषेत अनुवाद केला होता, त्यास त्यांनी 'सर्वोदय' हे नाव दिले होते. उच्चनीच सर्वांचे मानवी अधिकार समान आहेत, हे तत्त्वे त्यात सांगितले आहे. त्यालाच गांधींनी सर्वोदयाचा विचार, असे म्हटले आहे. गांधींच्या विचाराचा प्रचार करणारे जे मासिक निघाले होते. त्याचेदेखील 'सर्वोदय' नाव ठेवले होते.

- **सर्वोदयात महात्मा गांधींनी नेहमी तीन गोष्टी आधारभूत मानल्या आहेत.**

१. सर्वांच्या कल्याणात माझे कल्याण समाविष्ट आहे.

२. न्हावी आणि वकील याच्या कामाची किंमत सारखीच असावी.

३. शेतकरी, श्रमिक, कारागिरांचे साधे-सरळ जीवन सर्वोत्कृष्ट आहे.

सर्वांत खालच्या श्रेणीत असलेल्यांचा उदय सर्वोदयात गृहीत आहे. रस्किनच्या 'Unto this last' या ग्रंथाचा अर्थ पहिल्याइतकाच शेवटाची चिंता असा आहे. सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय. एकाचा उदय आणि दुस-याचा अस्त असा नव्हे. लहान-मोठी, दुर्बल-सबल, जड-बुध्दिवादी इ. सर्वांचा उदय, असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता.

गांधींच्या मृत्यूनंतर त्यांच्या निकटच्या अनुयायांनी सर्वोदय समाज स्थापन केला होता.

गांधींजी म्हणत, विणकर, शेतकरी व शिक्षकांच्या मुलात कधी भेद नसावा. सर्व समान आहेत. राजा-प्रजा, मालक-मजूर, गरीबब-श्रीमंत या सर्वांचा स्तर एकच असला पाहिजे. सर्वोदयाचा उद्देश असा समाज निर्माण करणे होय, की ज्यात समता असेल. शोषण नसेल व प्रत्येकाचा सर्वांगीण विकास होईल.

"जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख" हा उपयुक्ततावाद्यांचा सिध्दांत सर्वोदयाच्या मुळाशी आहे.

१८ जानेवारी १९४८ च्या 'हरिजन' च्या अंकात महात्मा गांधींनी सर्वोदयाची रुपरेषा स्पष्ट करुन सांगितली आहे. गांधीजी म्हणतात, की ख-या भारताचे लोकशाहीचे स्वप्न जर साकार व्हायचे असेल तर ख-या भारतातल्या सामान्यातल्या सामान्य माणसाला आपण भारताचे शासक आहोत असे वाटले पाहिजे. केवळ मूठभर बड्या लोकांना आपण शासनकर्ते आहोत असे वाटता कामा नये. गांधींच्या

सर्वोदयात सामान्य श्रमिक, मजूर आणि धनिक, उद्योगपती हे दोन्ही समसमान मानले पाहिजेत. प्रत्येकाने घाम गाळून आपली उपजीविका करावी. प्रत्येकाला आपली न्यायपूर्ण मजुरी मिळाली पाहिजे. स्पर्धायुक्त अर्थशास्त्र गांधींना मंजूर नव्हते. खरे अर्थशास्त्र म्हणजे न्यायाचे अर्थशास्त्र होय जे अर्थशास्त्र दुर्बलांचे शोषण करुन पिळवणूक करुन संपत्ती निर्माण करावयास शिकविते ते अर्थशास्त्र गांधींना मान्य नव्हते.

**सर्वोदयाची मूलतत्त्वे :**

१. सर्वोदयाचा भर सर्व व्यक्तीच्या उन्नतीवर आहे. सर्वोदयाचे ध्येय काही व्यक्तींचे, अनेक व्यक्तींचे किंवा अधिकतम व्यक्तीचे कल्याण साधणे हे नाही. तर समाजातील प्रत्येक व्यक्तीचे कल्याण साधणे हे आहे.

२. सर्वोदयात साम्यवादाप्रमाणे विशिष्ट वर्गाच्या उत्कर्षावर भर नसून, संपूर्ण समाजाच्या उत्कर्षावर भर दिला आहे.

३. सर्वोदयाचा भर व्यक्तीव्यक्तीतील स्वत्वाची भावना नष्ट करुन समाजहिताची भावना जागृत करण्यावर आहे.

४. सर्वोदयाची कल्पना ही एका देशापुरती सीमित नाही तर विश्वव्यापी आहे.

५. सर्वोदयाचा भर साधनांच्या शुचितेवर आहे.

६. सर्वोदय वंश, जात, धर्म, संपत्ती, राष्ट्र, राज्य इत्यादी भेदांवर विश्वास ठेवत नाही.

७. सर्वोदय आर्थिक व राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणावर भर देतो. उत्पन्नाच्या सर्व साधनांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. कोणाही एका व्यक्तीच्या हातात उत्पन्नाच्या साधनांचे केंद्रीकरण

त्यांना मान्य नव्हते. सहकार, अपक्ष, लोकशाही , मागासवर्गीय व ग्रामीण लोकांचे हितसंवर्धन व सत्तेचे विकेंद्रीकरण यांना सर्वोदयात महत्वाचे स्थान आहे.

८. सर्वोदय समाजात स्वातंत्र्य असले तरी पक्षपध्दती असणार नाही.

९. सर्वोदयात सर्वांना विचारस्वातंत्र्य आहे.

१०. समाजातील उच्च-नीच, समर्थ -असमर्थ, मंदबुध्दी अशा सर्वांचाच अभ्युदय सर्वोदयामध्ये अभिप्रेत आहे. जगा व जगू द्या या विचारांपेक्षाही इतरांसाठी जगा या उच्च विचाराचा व्यवहारात अवलंब करणे सर्वोदयाला अपेक्षित आहे.

गांधीजींनी सर्वोदयाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आखला होता. गांधींनी सर्वोदय कल्पनेतून १३ कलमी कार्यक्रम सांगितला आहे. या कार्यक्रमाद्वारे भारतीय समाजातील समस्यांचे निवारण होईल आणि सर्वांचे कल्याण साध्य होऊ शकेल, असा त्यांचा ठाम विश्वास होता. गांधींनी या कार्यक्रमाचा सतत पाठपुरावा केला आणि त्यासाठी विधायक कार्य करणाऱ्या अनेक संस्था स्थापन केल्या. हा १३ कलमी कार्यक्रम पुढीलप्रमाणे होता.

### १. अस्पृश्यता निवारण :

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास गांधींनी त्यांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान दिले होते. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला स्पर्श करण्यासही अपात्र ठरवावे हा अमानुषपणा आहे. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे. तो रोग दूर झाला पाहिजे असे गांधीं वारंवार म्हणत. अस्पृश्य या तुच्छतादर्शक शब्दाऐवजी त्यांनी 'हरिजन' हा शब्द रुढ केला. अस्पृश्यतेच्या रुढीला धर्मशास्त्राचा पाठिंबा असण्याची

शक्यताच नाही, असेच त्यांचे मत होते. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नाही, त्यांना शिक्षणाचा आधार नाही. हिंदूशी त्यांना मोकळेपणाने मिसळता येत नाही, काही व्यवसाय त्यांना कायमचे बंद आहेत इ. गोष्टींमुळे त्यांचा सांस्कृतिक विकास झाला नाही, असे गांधींना वाटत होते. सवर्ण हिंदूंएवढेच अस्पृश्यांना सार्वजनिक जीवनात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक हक्क मिळाले पाहिजेत, असे ते म्हणत.

१९३३ मध्ये त्यांनी हरिजन या नावाने इंग्रजी साप्ताहिक सुरु केले. हरिजनांच्या उध्दारासाठी त्यांनी 'अखिल भारतीय हरिजन सेवक संघ' काढला होता. सार्वजनिक शाळा, मंदिरे, पाणवठे अस्पृश्यांसाठी खुले करणे व त्यांच्या शाळा काढणे, सवर्ण व हरिजन यांच्यातील विवाहास व आंतरजातीय भोजनास उत्तेजन देणे हे कार्यक्रम त्या संघाच्या वतीने हाती घेण्यात आले होते. मला पुनर्जन्म नको आहे; पण तो मला येणारच असेल तर तो अस्पृश्याचा यावा, त्यायोगे त्यांच्या वाट्याला येणारी दु:खे मला खऱ्या अर्थाने कळतील असे त्यांनी म्हटले होते. गांधींनी दलितांच्या विभक्त मतदारसंघाच्या मागणीला विरोध केला. याचा अर्थ ते दलितविरोधी होते असा होत नाही. मुस्लिम, शीख हे ज्या अर्थाने अल्पसंख्य आहेत त्या अर्थाने दलित अल्पसंख्य नाहीत. अस्पृश्य हे धर्माच्या व संस्कृतीच्या धाग्यांनी सर्व हिंदू समाजाशी जोडलेले आहेत, असे ते म्हणत. अस्पृश्यांना इतर हिंदूंच्या बरोबरीने राजकीय अधिकार मिळतील. त्यांना न्यायालय संपूर्ण संरक्षण देईल. विभक्त मतदारसंघ हे दलितांच्या हिताचे नाहीत, अशी भूमिका त्यांनी घेतली होती. अस्पृश्यता निवारण्यासाठी सवर्ण हिंदूची मते तयार करण्याचे काम त्यांनी केले. "गांधीजींच्या कार्यातून शूद्रातिशूद्रांची परंपरागत बेड्यांतून मुक्तता होण्याची पार्श्वभूमी तयार झाली," असा निष्कर्ष नलिनी पंडित यांनी 'गांधी' ग्रंथात काढला आहे. हरिजन उत्थानाच्या कार्यासाठी जनजागृती व्हावी म्हणून गांधींनी १९३२-३३ या वर्षात मुंबई, पंजाब, बिहार,

ओरिसा, संयुक्त प्रांत इ. अनेक प्रांतांचा दौरा केला होता. खेडोपाडी पदयात्रा करुन जनसामान्यांत अस्पृश्यता निर्मूलनाचा संदेश पोहोचविण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला. हरिजन उध्दारासाठी त्यांनी मोठा निधीही जमा केला होता; परंतु त्यांच्या या कार्यामुळे कट्टर पुराणमतवादी संतप्त झाले होते.

**२. धार्मिक व जातीय ऐक्य :**

महात्मा गांधींनी भारतीय समाजाचे बहुजिनसी स्वरुप ओळखून सर्वधर्म समभावाचा पुरस्कार केला. धर्म विभिन्न असले तरी सर्व धर्मांत नैतिक तत्त्वे सारखीच आहेत. प्रत्येक धर्मात सत्य, प्रेम, अहिंसा आणि करुणा यांची मांडणी केली आहे. शांती आणि न्याय हे सर्वांचे लक्ष आहे. राम-रहीम, कृष्ण-करीम नावे वेगळी असली तरी परमेश्वर एकच आहे, वेद, कुराण, बायबल हे ग्रंथ वेगळे असले तरी परमेश्वर एकच आहे. ईश्वरी प्रार्थना एकच आहे.

**३. दारुबंदी :**

गांधींनी दारुबंदीसाठी सातत्याने प्रयत्न केले. कारण मद्यपान हे मुळातच वाईट आहे. त्यामुळे शरीरसंपत्तीची हानी होते. आर्थिकदृष्ट्या संपत्तीचा ऱ्हास होतो. व्यक्ती आणि कौटुंबिक जीवनाचा ऱ्हास होतो. सुखाचा ऱ्हास होतो. व्यसनाधीन मनुष्य असत्याचे आचरण करतो. तो आपल्या मनावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवू शकत नाही. म्हणून गांधींनी मद्यनिषेधाच्या कार्यक्रमाला महत्त्व दिले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा देताना गांधींनी ज्या सामाजिक चळवळींचे नेतृत्व केले. त्यांपैकी दारुबंदी ही एक चळवळ होय. दारुबंदीचा त्यांनी जाहीर सभांतून पुरस्कार केला. २६ जून १९३१ व ३१ जुलै

१९३७ च्या 'यंग इंडिया' तील लेखात त्यांनी म्हटले, मला जर कोणी एका तासासाठी अखिल भारताचा हुकूमशहा नेमले तर मी नुकसानभरपाई न देता दारुचे सर्व गुत्ते बंद करीन. दारुच्या दुकानांपुढे स्त्रियांनी निदर्शने करावीत, असे त्यांनी म्हटले होते. दारु घेणारा माणूस आपले मन, शरीर, भौतिक संपत्ती, आत्मा या सर्वांना धक्का लावतो, असे ते म्हणत. मद्यपानास प्रतिष्ठा लाभत असल्याबद्दल त्यांना चिंता आहे.

## ४. खादी :

स्वदेशीचा समावेश श्रम, प्रतिष्ठा म्हणून खादी प्रसाराने लोकांना काम मिळेल. बेकारीचा प्रश्न दूर होईल. लोकांना काम मिळेल, पैसे मिळतील. त्यांच्या गरजा भागविल्या जातील. त्यांना अन्न-वस्त्रही मिळेल. यासाठी खादी वापर आवश्यक केला होता. कमी भांडवल गुंतवणूक, फुरसतीच्या वेळेतील कमाई, परदेशांत आपला पैसा न जाणे, रोजगार निर्मिती, देशप्रेमात वाढ हे गांधींच्या मते, खादीच्या उत्पादनाचे फायदे आहेत.

## ५. ग्रामोद्योग :

ब्रिटिशांनी यंत्राधिष्ठित नवे उद्योग सुरु केले होते. त्या उद्योगातून मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन होऊ लागले. त्या वस्तूंचे विक्रीमूल्य कमी होऊ लागले. त्यामुळे भारतीय उद्योगांची पीछेहाट झाली. त्या वेळी गांधींनी लक्षात घेतले, की ग्रामोद्योगाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी त्यांनी स्वदेशीचा आग्रह धरला. श्रमाची प्रतिष्ठा पटवून दिली. खादी, तेल उद्योग, चांभारकाम, सुतारकाम असे गृहउद्योग

चालविले जाऊ लागले. अशामुळे लोकांना काम मिळाले आणि बेकारी आणि गरिबीचा प्रश्न सुटला. तसेच ग्रामोद्यागामुळे मालक- कामगार असे वर्ग राहणार नाहीत असे गांधींनी पटवून सांगितले.

गांधींच्या मते, सर्वोदयी व्यवस्थेत राष्ट्रीय नियोजनाऐवजी ग्रामनियोजनास प्राधान्य असते व त्यास आवश्यक ती मदत देणे एवढेच केंद्रीय सत्तेचे कार्य राहील. मोठमोठ्या उद्योगधंद्यामुळे व्यवसायाचे आणि संपत्तीचे केंद्रीकरण होते. गांधींच्या कल्पनेतील ग्रामीण अर्थरचनेत आर्थिक शोषणास अजिबात स्थान नाही.

**६. ग्रामसफाई :**

ग्रामीण भागात घाणीचे साम्राज्य निर्माण होऊ नये, ज्यामुळे लोकांचे आरोग्य ही व्यवस्थित राहील. यासाठी ग्रामसफाई मोहीम गांधींनी राबवली होती. या मोहिमेद्वारे रस्त्यावरील सांडपाणी वाहून नेणारी गटारे बांधणे, शोषखड्डे, कचरा टाकण्यासाठी कंपोस्ट खड्यांचा वापर, पिण्याचे स्वच्छ पाणी असे कार्यक्रम राबविले आणि त्यात सर्व जनतेस सहभागी करुन घेतले.

**७. नई तालीम :**

गांधीजींना वर्गातील बंदिस्त शिक्षण नको होते. तसेच पाठ्यपुस्तकात एकवटलेले शिक्षणही नको होते. त्यासाठी त्यांनी ‘नई तालीम’ शिक्षणपध्दतीला सुरुवात केली होती. यात शिक्षण व उद्योग यांचा समन्वय साधलेला आहे. उद्योग करताना शिक्षण पाहिजे. सूतकताई करताना गणित, शेतीशास्त्र आणि अर्थशास्त्र सहज शिकता येईल असे त्यांचे म्हणणे होते. गांध्धींना वाटे, शिक्षणाने शरीर, बुध्दी व हृदय

यांचा समतोल विकास झाला पाहिजे. शिक्षण हे साध्य, साधन आहे. त्यातून वर्गहीन, शोषणहीन शिक्षणाद्वारे चरित्रसंवर्धन झाले पाहिजे. मनोपयोगी शिक्षण मानसिक परिवर्तनाचे साधन आहे.

नई तालीमम शिक्षण प्रणालीतून आळस, गरिबी, बेकारी, व्यसनीपणा, अज्ञान या समस्या संपतील व स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, ज्ञानार्जन, उद्योग, निरीक्षण हे साध्य होईल. तसेच निसर्ग- संगीत, उद्योग यांचेज्ञान होईल यासाठीच महात्मा गांधींनी नई तालीम शिक्षणप्रणाली अवलंबविली होती.

## ८. प्रौढ शिक्षण :

ग्रामीण भागात शिक्षणाची सोय नसल्यामुळे बराच समाज शिक्षणापासून वंचित राहत होता. आणि त्यामुळे त्यांना सावकाराच्या, व्यापाऱ्याच्या, विविध जाचक प्रवृत्तींना बळी पडावे लागत होते. त्यासाठी प्रौढ शिक्षणाद्वारे जीवनशिक्षण देऊन त्यांना सभोवतालच्या जगाचा परिचय असला पाहिजे. लोकांची जाणीवजागृती झाली पाहिजे. प्रौढ शिक्षण मिळाले पाहिजे, असा गांधीजींनी आग्रह धरला होता.

## ९. स्त्रीसुधारणा :

भारताध्ये प्राचीन काळी स्त्रियांना मानाचा दर्जा होता; परंतु मध्ययुगात त्यांच्यावर विविध बंधने आली. तेव्हापासून स्त्रियांवर सारखा अन्याय होतच गेला आहे. महात्मा गांधींना स्त्रीविषयी अपार सहानुभूती होती. ते नेहमी स्त्री-पुरुष समान आहेत असे मानत होते. दोघांच्या भूमिका एकमेकांना पूरक आहेत, असे त्यांना वाटे. एकाशिवाय दुसऱ्याचे जीवन अपुरे आहे, स्त्रियांना व्यावहारिक शिक्षण दिले पाहिजे, त्यांना स्वतंत्र रीतीने विचार करता आला पाहिजे, असे त्यांचे मत होते.

तसेच त्यांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केला होता. वेश्यावृत्तीस स्त्रियांपेक्षा पुरुषालाच त्यांनी जबाबदार धरले आहे. स्त्रियांमध्ये स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मीयता जागृत करण्याचे कार्य गांधींनी केले आहे.

### १०. आरोग्यसुधारणा :

आरोग्य ही यशाची गुरुकिल्ली आहे. त्याशिवाय जीवन संपन्न होऊ शकत नाही. आरोग्याअभावी रोगराई वाढते. अनेक विकार निर्माण होतात. व्यक्तीच्या जीवनात उद्दिष्टात बाधा निर्माण होते. तसेच गांधींनी आरोग्याबाबत आहार, विहार, व्यायाम, निसर्गोपचार यावर चिंतन केले आहे. ग्रामसफाईवर देखील भर दिला आहे. साफसफाई, कंपोस्ट खड्डे, पिण्याचे शुध्द पाणी, चांगला सूर्यप्रकाश व हवा येणारी घरे असायला पाहिजे. त्यामुळे चांगले आरोग्य वाट्यास येते असे गांधींना वाटत असे.

### ११. राष्ट्रभाषा प्रचार :

महात्मा गांधींना असे वाटायचे, की उगीच इंग्रजीचे अवडंबर माजवू नये. शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे. मातृभाषेबरोबर गांधींनी राष्ट्रभाषेचा पुरस्कार केला. यासाठी देशातील सर्वांना एक भाषा अवगत असली पाहिजे. म्हणून त्यांनी हिंदीला राष्ट्रभाषा म्हटले आहे.

### १२. मातृभाषेचा विकास :

वर्तमानकालीन शिक्षणापासून जे दोष निर्माण झाले आहेत, त्यासाठी इंग्रजी माध्यम हे एक कारण आहे. इंग्रजी माध्यमातून न समजता आपण शिकतो आणि परीक्षेनंतर विसरुन जातो. ज्यामुळे आम्ही

विचार चिंतनास पारखे होतो, असे गांधींना वाटे. त्यासाठी मातृभाषेतून शिक्षण द्यावे, असे गांधी म्हणत असत.

**१३. आर्थिक समानता :**

महात्मा गांधींना सामाजिक, आर्थिक, धार्मिक म्हणजे कोणत्याही क्षेत्रातील विषमता मान्य नव्हती. सर्वोदय म्हणजे सर्वांचा विकास असे त्यांचे ध्येय होते. सर्वोदयी समाजातील सर्वांचे सर्व कल्याण हे तत्त्व आर्थिक समतेशिवाय साध्य होणार नाही, हे समजून त्यांनी विश्वस्ताची संकल्पना मांडली. सर्वांनी उपजीविकेसाठी श्रम करावे, श्रमप्रतिष्ठा लक्षात घ्यावी. वकील आणि न्हावी यांच्या कामाची प्रतिष्ठा सारखी राहील असेही त्यांनी म्हटले आहे.

**२.६.२ सर्वोदय व साम्यवाद यांतील फरक :**

१) सर्वोदय नैतिकतेवर आधारलेला आहे तर साम्यवाद भौतिक सिध्दांतावर आधारलेला आहे.

२) सर्वोदय हा नैतिक क्रांतीवर भर देतो, तर साम्यवाद रक्तरंजित क्रांतीवर भर देतो.

३) सर्वोदयीवादी मानवी मन सुधारु इच्छितात, तर साम्यवादी मानवी आर्थिक स्थिती सुधारु इच्छितात.

४) सर्वोदय वर्गावर्गात परस्परप्रेम व सहकार्याची भावना निर्माण करतो तर साम्यवाद वर्गावर्गात द्वेशभाव निर्माण करतो.

५) सर्वोदयात आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण, आर्थिक स्थितीत सुधारणा यावर भर दिला जातो. तर साम्यवादात समाजातील आर्थिक शोषण नष्ट करण्यासाठी केंद्रीय सत्तेचा पुरस्कार केला जातो. सर्वोदयाचे ध्येय साध्य करण्यासाठी साधनशुचिता आवश्यकच आहे. सर्वोदयाचे ध्येय साध्य होण्यासाठी प्रत्येकाने आपल्या अधिकाराऐवजी आपल्या कर्तव्याचा आग्रह धरता पाहिजे. प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले तर सुनियंत्रित राज्य निर्माण होईल. सर्वांनी नैतिक कायद्याचे पालन केलेच पाहिजे. अहिंसेचे पालन प्रत्येक व्यक्तीने नव्हे तर समाजानेही केले पाहिजे. सर्वोदय समाज निर्माण होण्यासाठी व्यक्तीच्या अंगी खालील गुण निर्माण झाले पाहिजेत.

१) ब्रम्हचर्य, २) अभय, ३) अस्तेय, ४) अपरिग्रह, ५) खाण्यापिण्यातील संयम, ६) वैराग्य ७) शरिरश्रम, ८) स्वदेशी व सर्वधर्म समभाव.

'सर्वोदय' ही एक समाजरचना असल्याने त्यात सर्व मानवी संस्थांच्या भावनांचा विचार करण्यात येतो. अर्थरचना, राज्यरचना, शिक्षण, कुटुंबव्यवस्था, उद्योग, व्यवसाय इ. सर्वच विषय त्यात येतात.

महात्मा गांधींच्या सर्वोदय कल्पनेचा विस्तार विनोबा भावे यांनी केला.[२१]

### २.६.३ गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना :

भारतातील खेडी, खेड्यातील लोक, त्यांना द्यावयाचे शिक्षण, वळण व असे वळण लावणारे लोकसेवक यासंबंधी गांधींनी आपले विचार वेळोवेळी व्यक्त केले. गांधींची ग्रामस्वराज्याची कल्पना ही गांधींनी विविध विषयांसंबंधी जे विचार मांडले, चिंतन केले त्यात महत्त्वाची आहे. गांधींनी जे विचार

मांडले तेच प्रमाण मानावेत, अंतिम सत्य मानावे, असा गांधींचाही आग्रह नव्हता. स्वत: गांधींनी म्हटले होते, "मी 'महात्मा' म्हटला गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. 'महात्मा' कोण हे आपल्याला माहीत नाही. म्हणून चांगला मार्ग हा, महात्म्याचे वचन देखील बुध्दीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा."

**हिंदुस्थान खेड्यांचा देश :**

गांधींच्या मते, हिंदुस्थान हा काही थोड्या शहरांत आढळणार नाही तर तो ७ लाख खेड्यांत आढळेल. खरी भारतीय संस्कृती ही हिंदुस्थानच्या खेड्यांत आहे. हिंदुस्थानचा गाभा जर तुम्हास पाहायचा असेल तर मोठमोठ्यां शहरांकडे दुर्लक्ष करा.खेडयातच सुसंस्कृतपणा आढळेल; कलेचा आविष्कार आढळेल, असे गांधीजी म्हणत. आमच्या खेडयांजवळ जगाला शिकवण देण्याजोगे खूप आहे, अशी गांधींची पक्की धारणा होती. जर खेडे नष्ट झाले तर हिंदुस्थान नष्ट होईल. खेड्यांचे शोषण, लुबाडणूक थांबली नाही तर त्यांचे पुनरुज्जीवन शक्य नाही. ग्रामीण संस्कृती ही तशीच चालू ठेवायची; पण तिच्यातील सर्वांना मान्य असणारे दोष मात्र काढायचे, या मताचे गांधी होते.

**हिंदुस्थानातील खेड्यांसंबंधी गांधीजींचे निरीक्षण :**

हिंदुस्थानातील खेड्यांसंबधी गांधींचे निरीक्षण अत्यंत सूक्ष्म व वस्तुनिष्ठ होते. ते त्यांनी पुढीलप्रमाणे मांडले.

१. खेड्यातील लोक वाटेल तेथे शौचास बसतात.

२. खेड्यातील रस्ते स्वच्छ ठेवण्यात येत नाहीत.

३. पाण्याच्या तलावातच भांडी घासणे, गुरांना पाणी पाजणे, गुरे, इ. प्रकार होतात.

४. घरे बांधताना कोणतेही नियम पाळले जात नाहीत.

५. खेड्यातील लोकांत एकमेकांशी सहकार्य करण्याची वृत्ती नसते.

६. रिकामपणाच्या वेळेचा सदुपयोग खेड्यातील लोक करत नाहीत.

७. आरोग्यविषयक अज्ञान खेड्यातच आहे. रोग निवारणासाठी मंत्रतंत्राचा -वैदूचा वापर करतात.

८. शेतजमिनीच्या तुकडीकरणामुळे शेती लाभदायी नाही.

९. दारुबाजी व अस्पृश्यता हे खेड्यात अगदी खोलवर जडलेले रोग आहेत.

१०. खेड्यांची उपेक्षा केल्यामुळेच भारताचे सरासरी आयुर्मान कमी आहे.

११. खेड्यातील लोकांची प्राप्ती वर्षातून चार महिने शून्य असते.

१२. खेड्यातील लोकांना परदेशी सरकारने लुबाडले आहे, तसेच शहरवासी देशबांधव लुबाडीत आहेत. अन्न, दूध उत्पादन करणारे खेड्यातील लोक अन्नाविना, दुधाविना आहेत.

**खेड्यांची पुनर्रचना कशी करावी ? :**

ग्राम किंवा खेडेगावाच्या पुनर्रचनेसंबंधी गांधीजींचे विचार अत्यंत मौलिक स्वरुपाचे आहेत. गांधींच्या आदर्श ग्रामरचनेत गावात एक सार्वजनकि सभागृह; सार्वजनिक कुरण, सहकारी दूधपुरवठा केंद्र, प्राथमिक व दुय्यम शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गावपंचायत, सार्वजनिक विहिरी इ. बाबी असतील. हिंदुस्थानच्या खेड्यांची पुनर्रचना अशी करावी, खेडयातील लोकांनाही शहराप्रमाणेच सुखकर

राहता आले पाहिजे. खेडी जर पूर्ण विकास पावली तर खेड्यात श्रेष्ठ दर्जाच्या कसबी व कलावंत माणसाची वाण पडणार नाही, असे गांधींना वाटे.

## १) गावांचे आरोग्य :

गावच्या आरोग्याकडे लक्ष पुरवण्यावर गांधीजी भर देतात. घरांची, रस्त्यांची स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची स्वच्छता, मोफत दवाखाना इत्यादींवर त्यांनी भर दिला होता. निसर्ग हाच उत्तम वैद्य होय, असे गांधीजी म्हणत. खेडेगावातील लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी शाळा मास्तर, ग्रामसेवक, यांची मदत घ्यावी, असे सांगून गांधीं निसर्गोपचारावर भर देतात. खेड्यातीतल तळी व विहिरी साफ करुन त्या नेहमी स्वच्छ ठेवल्या पाहिजेत, गल्ली, रस्ते, केरकरचरा काढून स्वच्छ करावेत इ. गोष्टींचा गांधीं आग्रह धरतात.

## २) गुरांची व गायींची जोपासना :

ग्रामीण पुनर्रचनेच्या कल्पनेत गुरांच्या व गायींच्या जोपासनेसंबंधीही त्यांनी विचार मांडले होते. वैयक्तिक रीतीने गुरे पाळण्यापेक्षा सामूहिक रीतीने गुरे पाळण्यावर गांधींनी भर दिला व त्याचे फायदेही त्यांनी सांगितले. म्हैस हा आर्थिकदृष्ट्या परवडण्याजोगा प्राणी नाही. हे त्यांनी स्पष्ट केले होते. गाय नष्ट झाली तर तिच्याबरोबर आपणही नष्ट होऊ, असे गांधीं म्हटले होते. दुधाच्या शास्त्राचा जर अभ्यास केला तर हिंदुस्थानात तरी गायींची सेवा करण्यावाचून दुसरा पर्याय नाही. गाय आणि तिची नर-संतती जर त्याच्या हातून गेली तर शेतकऱ्यांच्या पुढे मोठे संकट उभे राहील, अशी भीती गांधींनी व्यक्त केली होती.

खेड्यात जो उत्कृष्ट गाय व बैल ठेवतो त्यास बक्षिसे दिली पाहिजेत. आदर्श गुरे नसतील तर आदर्श गाव आपल्याला बनविता येणार नाही असे ही गांधींनी म्हटले होते. गांधीं त्यांच्या आदर्श खेड्यासंबधी लिहितात, "माझ्या आदर्श खेड्यात बुध्दिमान माणसे असतील. ती जनावराप्रमाणे घाणीत किंवा अंधारात राहणार नाहीत. स्त्रिया व पुरुष स्वतंत्र असतील. या खेड्यात प्लेग, कॉलरा, देवी असणार नाही. कोणी आळशी राहणार नाही. चैनीत लोळत पडणार नाही. प्रत्येकाला आपला श्रमाचा वाटा घ्यावा लागेल. असे असतानाही रेल्वे, पोस्ट, तार यांसारख्या सोयीचा विचार करणे शक्य आहे.

खेडे स्वयंपूर्ण व्हावे, खेड्यांनी स्वतःच्या उपयोगासाठी लागणाऱ्या वस्तू तयार कराव्यात, यंत्रशक्ती उपयोगात आणण्यापूर्वी मानवी श्रमशक्ती जेवढी उपलब्ध आहे तिचा उपयोग केला पाहिजे, असे गांधींनी म्हटले होते. 'आधारभूत उद्योग' हे केंद्र सरकारकडे असावेत; परंतु जे उद्योग खेड्यांना हाती घेण्याजोगे असतील, उदा. खादी ग्रामोद्योग ते खेड्यातच ठेवून त्यांचा विकास करावा लागेल. आपले धान्य, भाजी, फळे व खादी ते खेडे स्वतःच निर्माण करील.

## ३) खादी :

गांधीजी म्हणत, "खादी हा मध्यवर्ती सूर्य असून, तिच्याभोवती इतर ग्रामोद्योग अनेक ग्रहांप्रमाणे फिरतात. त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. परदेशी किंवा स्वदेशी शहरातील कारखान्यात तयार झालेल्या वस्तूंऐवजी खेड्यांतील ग्रामोद्योगांच्या वस्तू वापरुन त्या उद्योगांचे पुनरुज्जीवन केले नाही तर खेड्यांना आपण त्यांचे योग्य स्थान कधीच देणार नाही. खादी मेली तर खेडीही मरतील. खादी हा दारिद्र्यावर उपाय आहे, असे गांधीं म्हणत. सक्तीच्या आळसापासून मुक्ती देण्याचे चरखा हे एक साधन आहे, चरखा हा

आपल्या करोडो मरणोन्मुख देशबांधवांना सजीव करणारा अमृताचा घोट आहे असे गांधीजी म्हणत. परित्यक्ता स्त्रियांचा, विधवा स्त्रियां चरखा आधार आहे. चरख्याने हिंदु-मुसलमान या दोन्ही जमातींची सेवा केली आहे. चरखा खेड्यांना त्यांचे हक्क व स्वयंप्रतिष्ठा प्राप्त करुन देतो, पैसा मिळवून देतो, देशप्रेमाचा संदेश देतो, असे गांधीं म्हणत. प्रत्येक खेड्याने स्वतःला लागणारे कापड स्वतः विणावे व कातावे, सर्वांनी दररोज एक तास सुतकताई केली तर हिंदुस्थान आपल्याला लागणारा सर्व कपडा उत्पन्न करु शकेल, असे गांधींना वाटत होते. आपण श्रमप्रतिष्ठेचे तत्त्व मान्य करतो हे दाखवून देण्यासाठी प्रत्येक काँग्रेस कार्यकर्त्याने दिवसातून अर्धा तास तरी नेमाने सुतकताई करावी व खादीची वस्त्रे वापरावीत, असा गांधींनी दंडक घातला होता. खादीचे अर्थशास्त्र हे देशभक्ती, भावना व मानवता यावर आधारलेले आहे, ही बाब गांधींनी आग्रहाने मांडली होती. खादीचे अर्थशास्त्र हेच हिंदुस्थानचे एकमेव योग्य अर्थशास्त्र होय याबाबत त्यांना काडीमात्र संशय नव्हता.

### ४) ग्रामोद्योग :

खेड्यातील लोकांच्या गरजा खेड्यातच भागल्या पाहिजेत. सरकारने खेड्यातील लोकांना त्यांना लागणारी खादी स्वतःच तयार करा, असे सांगितले पाहिजे. बैलघाण्याचे तेल,पेंड, हातसडीचा तांदूळ, डाळी, मध, खेळणी, चरखा, साबण, हातकागद या वस्तू खेड्यात तयार होऊ शकतात. त्या तयार झाल्या तर जी खेडी मृतावस्थेत मरणोन्मुख आहेत त्यांच्यात चैतन्य येईल असे गांधींना वाटे. भारतात खेड्यात कातडी कमावण्याचा व्यवसाय सुधारलेल्या पध्दतीच्या आधारे करता येईल, ग्रामीण हस्तोद्योगांना मोठ्या यंत्राच्या स्पर्धेपासून वाचविले पाहिजे तसेच खेड्यातील ग्रामोद्योगातील वस्तूंचा स्वीकार शहरांनी केला

पाहिजे असे गांधींनी आग्रहाने सांगितले होते. रोजगारीच्या दृष्टीने भांडवलाधिष्ठित यंत्रोद्योगापेक्षा श्रमाधिष्ठित ग्रामोद्योगांची आपण कास धरली पाहिजे, असे गांधींनी वारंवार सांगितले. ग्रामोद्योगाचे मूळ स्वरुप कायम ठेवून त्यांच्या तंत्रात सुधारणा घडवून आणण्यास गांधींची हरकत नव्हती. कारागिरांनी स्वतः खेड्यात जी यंत्रे व उपकरणे बनवता येतील ती त्यांनी बनवावी. ग्रामोद्योगांनी हातयंत्रांऐवजी विजेवर चालणारी यंत्रे वापरावीत असे गांधींनी म्हटले होते. ग्रामोद्योगाचा लोप झाला तर ७ लाख खेड्यांचा सर्वनाश अटळ आहे, असे गांधींना वाटत होते.

**५) सहकाराधिष्ठित ग्रामराज्य :**

खेड्यातील लोकांचे अज्ञान, अंधश्रध्दा, आळस, दैववाद, आळस, सुंकुचितपणा नाहीसा करुन त्यांच्या जीवनात सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याची गांधींची इच्छा होती. खेड्यातील लोकांत सहकाराची वृत्ती दिसून येऊ लागली, खेडयातील सेवाभावी कार्यकर्त्याने सार्वजनिक साफसफाई व स्वच्छता, मलेरिया निर्मूलन, आपआपसांतील तंटे मिटवण्याची यंत्रणा, पशुसंवर्धन अशा कार्यक्रमांची आपल्या विधायक कार्याला जोड द्यावी असे गांधींजी म्हणत. जीवनाच्या प्राथमिक गरजांच्या बाबतीत खेड्यांना स्वतःच्या पायावर उभा राहणे शक्य आहे; पण शहरे मात्र स्वतःचे अन्न, कपड्यांसाठी कापूस व पशूंसाठी चारा तयार करु शकत नाहीत, दूध तयार करु शकत नाहीत ही वस्तुस्थिती त्यांनी मांडली.

समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली गेल्यानंतर गांधींनी आदर्श ग्रामस्वराज्याच्या कल्पनेत समाजवादाचा आशय ओतला. १९४२ मध्ये तर ते सामुदायिक शेतीचा विचार करु लागले. ते म्हणाले, “माझा असा दृढ विश्वास आहे, आपण सहकारी शेतीचा स्वीकार केल्याशिवाय आपल्याला शेतीचे

संपूर्ण फायदे मिळवता येणार नाहीत. खेड्यातील शंभर कुटुंबीयांनी जमिनीचे कसेतरी १०० तुकडे करण्यापेक्षा सर्वांनी एकत्रितपणे जमिनीची लागवड करुन तिच्यातील उत्पन्न वाटून घेणे हे अधिक श्रेयस्कर आहे. शेतीची नांगरण, मशागत, अवजारे, एकत्र झाली तर शेती जास्त पिकेल" असे गांधीं म्हणत. "माझ्या कल्पनेनुसार जर सहकारी शेती झाली तर देशाचा नूरच पालटून जाईल. दारिद्र्य आणि आळस यांची आपल्यातून हकालपट्टी होईल," असे गांधीं म्हणत. सहकार हा अहिंसेवर आधारलेला पाहिजे, असेही गांधींनी आग्रहाने सांगितले. गोरक्षण हा गांधींचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यासाठी त्यांनी सहकाराची आवश्यकता प्रतिपादन केली होती. ते म्हणतात, "सहकारी पध्दतीमध्ये कोणताही शेतकरी गुरे आपल्या घरात बांधणार नाही. गुरांच्या बरोबर एकाच घरात राहणे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक आहे. घरातील जागा बेताचीच असते. त्यामुळे गुरांची संख्या वाढली, घाणीने घरातील माणसांचे जीवन असह्य होते. सहकारी तत्त्वांवरील गोरक्षणामुळे रोग झालेल्या गुरांवर औषधोपचार करणे सोपे जाईल. गुरांसाठी कुरणे राखून ठेवता येतील आणि वळूंची चांगली निपज करता येईल." यावरुन गांधींवर समाजवादी संकल्पनेचाही प्रभाव पडला होता हे दिसून येते.

### ६) ग्रामीण शिक्षण :

खेड्यातील लोकांच्या गरजांना जास्तीत जास्त अनुकूल होण्याजोगे शिक्षण जर आपणास त्यांना द्यावयाचे असेल तर आपण विद्यापीठ खेड्यात नेले पाहिजे, असे गांधी म्हणत. खेड्यातील शाळेला उद्योगशाळेचे रुप आले पाहिजे. शिक्षणाचा केंद्रबिंदू म्हणून ग्रामीण हस्तोद्योगांचे शिक्षण आवश्यक व महत्त्वाचे मानले पाहिजे. हस्तोद्योग कमी प्रतीचे, ही कल्पना डोक्यातून काढून टाकली पाहिजे.खेड्यातील

मुलांना हस्तोद्योगाच्या मार्फत इतिहास, भूगोल, गणित, भाषा, चित्रकला, संगीत हे विषय शिकवावेत. शाळेत व कॉलेजात जी शेती शिकविली जाते ती आपल्या खेड्यांना निरुपयोगी आहे असे गांधीं म्हणत. शिक्षण साधेपणाच्या वातावरणात द्यावे. प्रत्यक्षात विद्यार्थी आपल्या शिक्षकाबरोबर शेतावर गेले व शेतातील कामे शिक्षकांनी स्वतः करुन दाखविली तर विद्यार्थी पुष्कळ काही शिकतील, मनाची व शरीराची स्वच्छता हे शिक्षणातील पहिले पाऊल आहे. खेड्यातील शिक्षणात हस्तोद्योग, कला, आरोग्य, आणि शिक्षण या सर्वांचा समन्वय गांधीजी त्यांच्या शिक्षण योजनेत करु इच्छीत होते. गांधींच्या 'नई तालीम'मध्ये या चारही गोष्टींचा सुंदर मेळ आहे. गांधीं म्हणत, शिक्षणाचा खर्च विद्यार्थ्यांनी हाताने काम केलेल्या वस्तूतून निघावा, प्राथमिक शिक्षणात सफाई, आरोग्यशिक्षण, शरीरपोषणची मूलतत्वे, घरी आईवडिलांच्या उपयोगी पडणे यांचा अंतर्भाव व्हावा, असेही गांधींचे मत होते. प्रत्येक खेड्यात पुस्तकालय असावे व त्या पुस्तकालयात खेड्यातील लोकांना समजतील अशी पुस्तके असावीत.

**७) ग्रामसंरक्षण :**

चोर-दरोडेखोर यांचा सामना करण्यासाठी सशस्त्र बचाव करणारी आपली संघटना प्रत्येक खेड्याने बांधावी अशी गांधीं सूचना करतात. सात लाख खेड्यांना पोलिसांचे संरक्षण मिळत नाही व ते त्यांना नको आहे, हे स्पष्ट करुन प्रत्येक हिंदी स्त्री-पुरुष स्वतःच स्वतःचा पोलिस बनला पाहिजे, अशी गांधीजी अपेक्षा करतात. चोर -दरोडेखोरांना एखादा धंदा शिकवून प्रामाणिकपणे उपजीविका करण्यासाठी साधन पुरवायचे व त्यातून त्यांच्या जीवनात बदल घडवून आणावा, अशी सूचनाही ते करतात. प्रत्येक खेड्यात अहिंसक स्वयंसेवक काढावेत, असेही ते म्हणतात.

## ८) ग्रामपंचायत :

ग्रामपंचयतीचे काम प्रामाणिकपणा व उद्यमशीलता यांचे पुनरुज्जीवन करणे हे आहे. ग्रामपंचायतीने गावातील लोकांना तंटे करु नयेत हे शिकवावे व पशुसंवर्धन, दूध उत्पादनातील वाढ, लोकांची स्वच्छता, अस्पृश्यता निवारण ही कामे करावीत. गावात सिनेमागृह ठेवू नये. ग्रामपंचायतीची सत्ता जितकी जास्त तितके लोकांना अधिक श्रेयस्कर. स्वतः गांधीं म्हणाले, "ग्रामस्वराज्याची माझी कल्पना अशी आहे, ते एक संपूर्ण लोकसत्ताक राज्य आहे. आपल्या अत्यंत महत्त्वाच्या गरजांच्या बाबतीत ते आपल्या शेजाऱ्यांवर अवलंबून असणार नाही. गाव आपले नाट्यगृह, शाळा व सभागृह बांधील. गावची पाणीपुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था असेल आणि त्यातून नेहमी स्वच्छ पाणी पुरवले जाईल. शिक्षण शेवटच्या मूलोद्योग अभ्यासक्रमापर्यंत सक्तीचे असेल. शक्यतो प्रत्येक काम सहकारी पायावर चालविले जाईल. आज जशा जाती पडलेल्या आहेत आणि त्यात उत्तरोत्तर अस्पृश्यतेचे प्रमाण वाढत गेले आहे. तशा जाती नसतील. अहिंसा आणि तिचे सत्याग्रहाचे असहकाराचे तंत्र ही ग्रामसमाजाची आपला अधिकार आणण्याची अंतिम शक्ती असेल. गावाचा पहारा सतत ठेवण्याचे काम सक्तीचे असेल. गावाचा कारभार ५ जणांच्या पंचायतीकडून चालविला जाईल. या पंचांना अवश्यक ते सर्व अधिकार आणि कायदेशीर सत्ता असेल. गांधीं म्हणत, "आज सत्तेची केंद्रे दिल्लीत, कोलकत्यात, मुंबई अशा मोठ्या शहरांत आहेत. ती सत्ता हिंदुस्थानच्या ७ लाख खेड्यात मला पसरुन द्यायची आहे. प्रत्येक खेडे लोकसत्ताक किंवा पूर्ण समताधिष्ठित पंचायत राज्य व्हावयाचे असेल तर त्यास स्वयंपूर्ण व्हावे लागेल. आपला कारभार संभाळायला समर्थ व्हावे लागेल, असे गांधींनी म्हटले होते.

## ९) ग्रामसेवा व ग्रामसेवक :

खऱ्या लोकशाहीचा व ग्रामजीवनाचा जो भक्त असेल त्याने एखादे खेडे दत्तक घ्यावे, तेच आपले जग आणि तेच आपले कार्य असे मानावे, असे गांधीजी म्हणत. ग्रामसेवा करणाऱ्या ग्रामसेवकाशी त्या गावातील प्रत्येक व्यक्तीची ओळख असली पाहिजे. तो लोकांना इतके आपलेसे करील, ते त्याचा सल्ला विचारात घेतील आणि त्याप्रमाणे वागतील. या ग्रामसेवकाने त्या खेड्याचा भंगी, कातणारा, रखवालदार, वैद्य व शाळा मास्तर इ. कामे करावीत. खेड्यात काम करणारा हा ग्रामसेवक राजकारणात पडणार नाही. त्याने निवडणूक मोहिमेत भाग घेऊ नये. त्या गावात जे तंटे असतील त्यांत पडू नये. त्याने कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. स्वच्छता व आरोग्य याकडे त्याने लक्ष द्यावे. हरिजनांच्या कल्याणाकडे त्याने लक्ष द्यावे असे गांधीं म्हणत.

खेडी हाच या देशाच्या पाठीचा कणा आहे, असे गांधीजी म्हणत. खेड्याकडे परत चला असे गांधींनी आग्रहाने सांगितले. ग्रामसेवा करण्यासाठी आलेल्या व्यक्तीने गावची स्वच्छता व आरोग्य याकडे लक्ष द्यावे. त्याने स्वतःचे राहण्याचे ठिकाण आणि त्याच्या आजूबाजूचा भाग स्वच्छतेचा आदर्श नमुना होईल हेही पहावे. आदर्श ग्रामसेवकास केवळ १० रुपये मानधन दरमहा मिळेल. त्यास पगारवाढ, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन मिळणार नाही. हा आदर्श सेवक त्यास कोणते अन्न मिळते याची चिंता करणार नाही. देशकार्यासाठी अशा आदर्श सेवकांची जरुरी आहे. खेडुतांचे आपण सेवक आहोत हे त्याने लक्षात ठेवावे. खेडुतांच्या सेवेचा मोबदला म्हणून काय मिळणार आहे, याचा आदर्श ग्रामसेवक मुळीच विचार करणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले होते.

गांधीं म्हणाले, "लोकतांत्रिक स्वराज्यात शेतकऱ्यांच्या हाती केवळ राजकीयच नव्हे तर सर्व प्रकारची सत्ता राहील. त्यांना त्यांचे योग्य स्थान मिळावे आणि त्यांच्या मताला अग्रमान द्यावा. खेड्यांनी निव्वळ जगण्याऐवजी त्यांनी शक्तिशाली आणि समृध्द व्हावे, असे आम्हास वाटत असेल तर आमची संपूर्ण विचारसरणी ग्रामाभिमुखच असावी लागेल."

खेड्यांना जखडून ठेवणाऱ्या ज्या तीन रोगांवर आम्हाला इलाज करावयाचा आहे, ते तीन रोग म्हणजे -

१. सार्वजनिक स्वच्छतेची कमतरता,

२. भरपूर सकस आहाराची कमतरता,

३. खेडुतांचे अज्ञान हे होत, असे गांधीजी म्हणत.

आपल्या ग्रामस्वराज्य योजनेत गांधींना हे रोग दूर करावयाचे होते. हिंदुस्थानचे स्वराज्य म्हणजे सर्व लोकांचे राज्य आणि न्यायांचे राज्य, अशी स्वराज्याची व्याख्या गांधीं करतात. लोकशाहीत शेतकरी राजा झला पाहिजे, आमच्या देशाचे अध्यक्ष व पंतप्रधान शेतकऱ्यांमधून घेतले पाहिजेत. अशी सूचनाही गांधींनी केली होती. आचार्य जावडेकर म्हणतात, गांधीप्रणीत ग्रामीण पुनर्रचना हा पाश्चात्यांच्या औद्योगिक समाजरचनेतील दोषांवर उतारा होता. सेवाग्राम (वर्धा) एक आदर्श खेडे करण्याची गांधींची महत्वाकांक्षा होती. जर मनुष्याला एक आदर्श खेडे निर्माण करणे शक्य झाले तर सबंध देशाकरिता नव्हे, तर कदाचित साऱ्या जगाकरिता एक नमुना त्याने तयार करुन दिला असे होईल, असे गांधीं म्हणत.[३०]

**२.६.४ महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना :**

गांधीं रुढ अर्थाने अर्थशास्त्रज्ञ नव्हते. अर्थशास्त्राच्या विचारांत व सिध्दांतात त्यांनी फार मोठी मौलिक भर घातली असे नव्हे; पण भारतीय परिस्थीतीच्या संदर्भात त्यांनी आपले आर्थिक विचार मांडले.

महात्मा गांधींना भारतीय संस्कृती व परंपराचां अभिमान होता. रामराज्यात ज्याप्रमाणे सर्वत्र सुबत्ता होती, त्याप्रमाणे आदर्श राज्य या युगातही शक्य आहे असे त्यांना वाटे. गांधींना त्यांच्या आदर्श राज्यात संपत्तीचे समान वाटप, बेकारीचे उच्चाटन, स्वातंत्र्य, समता, न्याय इ. गोष्टी अभिप्रेत होत्या. आदर्श राज्यासाठी गांधींनी खालील घटकांची आवश्यकता सांगितली.

१) सर्वोदय

२) विश्वस्त व्यवस्था

३) विकेंद्रीकरण

४) समता

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारातील विश्वस्त योजना ही एक बहूचर्चित कल्पना आहे. गांधींच्या या संकल्पनाने सबंधी त्यांचे सहकारी किशोरलाल मश्रूवाला, नरहरी पारेख व प्रो. प्यारेलाल यांनी एक मसुदा १९४२ मध्ये गांधीं स्थानबध्द असताना तयार केला. गांधीं त्यात थोडेफार बदल केले. गांधींनी त्यांच्या या योजनेत फेरफार केले व ती योजना प्रसिध्द केली. ती योजना 'विश्वस्त योजना' या नावाने ओळखली जाते. मानवी स्वभावात परिवर्तन घडून येणे मुळीच अशक्य नाही. अशा श्रध्देतून

विश्वस्तवृत्तीच्या संकल्पनेचा उगम झाला आहे. माणसाच्या चांगूलपणावर हा सिध्दांत आधारलेला आहे. विश्वस्त संकल्पनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते :

१) विश्वस्त वृत्ती हे भांडवलदारी समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणून समतावादी तत्त्वावर तिची पुनर्रचना करण्याचे एक साधन आहे. भांडवलदारीला तिच्यात मुळीच थारा नाही; परंतु सध्याच्या भांडवलदार वर्गास स्वतःची सुधारणा करण्याची तिच्यामार्फत संधी दिली जाणार आहे.

२) व्यक्तीला खासगी मालमत्तेचा हक्क राहील; पण व्यक्तीला अधिक खासगी मालमत्ता बाळगण्याचा अधिकार असणार नाही. जास्तीत जास्त किती संपत्ती असावी ही मर्यादा ठरविली पाहिजे.

३) संपत्तीची मालकी व वापर यांच्यावर कायदेशीर बंधने घातली जातील. कोणत्याही व्यक्तीला आपली संपत्ती केवळ आपल्या सुखासाठी किंवा समाजहिताची पर्वा न करता धारण करता येणार नाही, वापरता येणार नाही किंवा तिचा साठा करता येणार नाही.

४) समाजातील कोणत्याही व्यक्तीचे कमाल व किमान उत्पन्न किती असावे यावर मर्यादा घालणे आवश्यक आहे. कमाल व किमान उत्पन्नातील भेद वाजवी असावा, मर्यादित असावा. हळूहळू हा भेद नष्ट करणे हे उद्दिष्ट ठेवून त्यानुसार या मर्यादांमध्ये बदल करण्यात यावा.

५) गांधींच्या या योजनेनुसार उत्पादनाचे स्वरुप वैयक्तिक प्रेरणा, इच्छा किंवा लोभ याने न ठरवता सामाजिक गरजेनुसार उत्पादन क्रम ठरविला जाईल, तो व्यक्तीच्या व उत्पादकाच्या गरजेनुसार ठरविला जाणार नाही.

स्वत: गांधींनी विश्वस्त कल्पना साध्या सोप्या शब्दांत मांडली होती ते म्हणत, "तुम्ही करोडो रुपये खुशाल  मिळवा; पण बाकीचे सारे समाजासाठी वापरा" फेब्रुवारी १९१६ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्‌घाटन प्रसंगी गांधींनी केलेल्या भाषणात विश्वस्त संकल्पनेचा प्रथम उल्लेख होता. संस्थानिकांनी प्रजेच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून काम करावे. संपत्तीचा किंवा राज्याच्या उत्पन्नाचा विनियोग जनतेच्या कल्याणासाठी करण्याचा सल्ला संस्थानिकांना गांधींनी दिला होता. १९१७ मध्येही अहमदाबाद येथे गिरणी कामगारांच्या संपाच्या प्रसंगी मालक व मजूर हे अखेर एकाच कुटुंबाचे घटक आहेत, कामगारांनी कारखानदारास पित्याच्या जागी कल्पून त्यांच्याकडे सवलतीची मागणी करावी, कारखानदारांनी कामगारांच्या कल्याणाची काळजी घ्यावी व संपाचा मार्ग न चोखाळता दोघांनीही आपले तंटे सामंजस्याने व वाटाघाटीच्या मार्गाने सोडवावेत, असे गांधींनी म्हटले होते. विश्वस्त संकल्पनेबद्दल गांधीजी म्हणतात. जी काही संपत्ती आहे ती ईश्वराची आहे. ती मनुष्याला सर्वशक्तिमान ईश्वरापासून मिळालेली आहे, ती त्याची स्वतःची संपत्ती नव्हे, तर जगाच्या सेवेसाठी त्याच्याकडे सोपविलेली ती संपत्ती आहे. कोणाही व्यक्तीजवळ स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त मालमत्ता असेल तर त्याने ईश्वराच्या दीन - दुःखी संतानांच्या सेवेसाठी उपयोग करण्याकरिता त्या मालमत्तेचे विश्वस्त बनावे. ईश्वर सर्वशक्तिमान आहे. तो कोणत्याही वस्तूचा संग्रह करीत नाही. माणसानेही दररोज आपल्या गरजेप्रमाणे मिळवावे आणि कशाचाही संग्रह करु नये. हे सत्य जर आम्ही आत्मसात केले - तर कायद्याच्या दृष्टीने ते विश्वस्तपणच मानले जाईल, असे माझे मत आहे. विश्वस्तपण ही भारताने जगाला दिलेली देणगी ठरावी, अशी माझी इच्छा आहे. धनसंग्रह हा पिळवणुकीशिवाय होणेच शक्य नाही. धनसंचय ही वाईट मार्गाने मिळविलेली संपत्ती होय, असे गांधींचे मत होते.

उत्पादनसाधनावरील खासगी मालकी व आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणचे दुष्परिणाम नाहीसे करण्यासाठी गांधींनी विश्वस्त संकल्पना मांडली होती. त्यांच्या मते, शेती, उद्योग व व्यापार यांच्याव्दारे जर एखाद्याने मोठ्या प्रमाणात संपत्ती गोळा केली असेल तर ती सर्व संपत्ती त्या एकट्याच्या मालकीची नसते, तर ती संपूर्ण समाजाच्या मालकीची असते. अशा प्रकारे मिळविलेल्या संपत्तीचा काही भाग तो स्वत:साठी खर्च करु शकतो. इतर संपत्तीचा तो मालक नसतो, तर ईश्वर असतो. सारांश, गांधींच्या मते, श्रीमंत हे समाजाचे विश्वस्तआहेत. संपत्तीवर खासगी मालकी, पण संपत्तीचा सार्वजनिक उपयोग हे तत्व गृहीत धरुन गांधींनी विश्वस्ताची कल्पना मांडली आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष नाहीसे व्हावेत, ही कल्पना विश्वस्त कल्पेनेच्या मुळाशी आहे, भांडवलदार, कारखानदार, जमीनदार, सावकार, उद्योगपती, व्यापारी या सर्वांनीच विश्वस्त म्हणून काम करावे, असे आवाहन, आवाहान गांधींनी केले होते. या सर्वांनी एखाद्या व्यवस्थापकाप्रमाणे आपला पगार निश्चित करावा व तो नफ्यातून काढून घ्यावा, बाकी सर्व नफा लोककल्याणकारी योजनांत खर्च करावा असे आवाहन त्यांनी वरील सर्व मंडळींना केले होते. धनिकांची संपत्ती जुलमाने हरण करणे हे गांधींना मान्य नव्हते.

श्रमजीवी वर्गाचे शोषण थांबविण्यासाठी राष्ट्रीयीकरणास अहिंसक पर्याय म्हणून गांधींनी विश्वस्त संकल्पना मांडली होती. या कल्पनेची सर्व भिस्त ही भांडवलदार, कारखानदार व श्रीमंत लोकांच्या हृदयपरिवर्तनावर अवलंबून होती. ही विश्वस्त योजना अमान्य करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या मालावर बहिष्कार टाकण्याचे व त्यांना वठणीवर आणण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेचा उगम प्यरिटन धर्ममतामध्ये आहे. जगातील एकंदर सर्व वस्तूंवर शेवटी परमेश्वराची सत्ता आहे. माणसाला त्याने फक्त उपजीविकेचा आधार दिला आहे. स्वत:च्या

व्यवसायात माणसास जे यश मिळते ते परमेश्वराच्या त्याच्यावरील कृपेचे लक्षण आहे. या संपत्तीचा वापर स्वतःच्या सुखोपभोगासाठी करणे हे पाप आहे. स्वतःकडील पै न पैचा हिशेब परमेश्वराला देण्यासाठी झटावे लागते ही तत्त्वे प्यरिटन धर्मविचारातील मुख्य तत्त्वे आहेत. ही धर्मतत्त्वे गांधींच्या विश्वस्त कल्पनेचा आधार आहेत. श्रीमंतांनी आपली सर्व संपत्ती समाजाच्या मालकीची आहे, असे समजून स्वतःला त्या संपत्तीचे विश्वस्त समजून, स्वतःच्या किमान गरजा भागविण्याएवढे उत्पन्न स्वतःसाठी खर्च करुन बाकी सर्व संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याण्यासाठी करावा, असा विचार गांधींनी या कल्पनेत मांडला. हा विचार म्हणजे प्युरिटन धर्ममतास गांधींना जोडलेली एक पुष्टीच आहे.

गांधींच्या विश्वस्त संकल्पनेस डॉ. आंबेडकरांचा विरोध होता. विश्वस्त संकल्पना ही डॉ. आंबेडकरांना हास्यास्पद वाटत होती. ही संकल्पना जनताभिमुख व समतावादी असली तरी त्यात ऐतिहासिक दृष्टिकोनाचा व शास्त्रशुध्द विश्लेषणाचा अभाव होता. ही कल्पना निव्वळ स्वप्नाळू होती, मानवी स्वभावाविरुध्द होती, अशी टीका केली गेली.[३१]

## २.७ महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार :

२२, २३, २४, ऑक्टोबर १९३७ रोजी गांधींनी वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेतून आपले शिक्षणविषयक विचार मांडले. त्यांच्या शिक्षण पध्दतीला वर्धा योजना, मूलोद्योगी शिक्षण, नई तालीम, बुनियादी शिक्षण व जीवन शिक्षण इ. नावे दिली आहेत. रुढ अर्थाने गांधीजी शिक्षणतज्ज्ञ नव्हते. “मी शिक्षणक्षेत्रात अनाधिकारी व्यक्ती आहे व शिक्षणाचा जो रुढ व तांत्रिक अर्थ आहे त्यापासून मी अनभिज्ञ आहे.” असे गांधी म्हणत; पण हा त्यांचा विनय होता. कारण गांधींनी स्वतः म्हटले आहे, “मी

हिंदुस्थानला अनेक गोष्टी दिल्या. त्यात मी दिलेली वर्धा शिक्षण योजना व शिक्षणपध्दती ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे.'' वर्धा शिक्षण योजना ही त्यांच्या जीवनभर चालवलेल्या मंथनातील अमृत आहे.

म. गांधींच्या शैक्षणिक तत्वज्ञानात निसर्गवाद, आदर्शवाद, वास्तववाद व कार्यवाह या चारही पंथांचा सुरेख समन्वय झालेला दिसून येतो. शिक्षणाच्या प्रक्रियेत हाताचे सुयोग्य स्थान पहिल्यांदा गांधींनीच निर्धारित केले. हीच त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानातील शिक्षण क्षेत्रास मिळालेली देणगी होय. गांधींची योजना परिपूर्ण होती. हे त्यांनी समाज शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्रीशिक्षण, हरिजन शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण इ. सबंधी केलेल्या विवेचनावरुन दिसते. भारतातीलच नव्हे तर पाश्चात्त्य विचारवंतही त्या शिक्षण योजनेकडे आशेने पाहत होते.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. व्यक्ती व समाजजीवनास नवे वळण व दिशा देण्याचे शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे. हा विचार गांधींना पटला होता. गांधीं म्हणतात, ''शिक्षण हे काही साध्य नव्हे, ते एक साधन आहे. ज्या शिक्षणाने आपण चारित्रवान बनू तेच खरे शिक्षण मानता येईल.'' केवळ उपजीविका व संपत्ती हा शिक्षणाचा हेतू अत्यंत गौण आहे. शिक्षणास उपजीविकेचे साधन समजणे ही तुच्छ वृत्ती होय असे गांधी म्हणत. केवळ बुध्दीचा विलास दाखवणाऱ्या वाङ्‌मयीन वा पुस्तकी शिक्षणपध्दतीला गांधींचा विरोध होता. पुस्तकी शिक्षण, पदव्या व त्यामुळे मिळणारे सुख या गोष्टींना तिलांजली द्यायला गांधीजी सांगतात. शिक्षणामुळे शरीर, बुध्दी व हृदय या तिन्हींचा समतोल विकास साधला पाहिजे, असे त्यांचे मत होते.[३२]

### २.७.१ गांधीप्रणीत शिक्षणाची उद्दिष्टे :

**१) स्वावलंबन व स्वयंपूर्णता :**

गांधी व्यावहारवादी शिक्षणतज्ज्ञ होते. शिक्षणासाठी व्यक्तीला भावी जीवनात आधार मिळवून दिला पाहिजे. शिक्षणाने स्वतःची भाकरी मिळवून दिली पाहिजे असे गांधींचे मत होते. गांधींनी शिक्षण प्रक्रियेत श्रमास अधिक महत्त्व दिले आहे. शिक्षणामुळे बुध्दी, कृती व भावना यांचा समप्रमाणात विकास व्हावा, असे त्यांचे मत होते. शिक्षणाने जर स्वावलंबन व स्वयंपूर्णता शिकवली नाही तर ते खऱ्या अर्थाने शिक्षणच नव्हे, असे गांधी म्हणत. शिक्षणाला शुध्द चरित्र्याची बैठक नसेल तर त्या शिक्षणाची किंमत शून्य आहे.

**२ चरित्र संवर्धन :**

चरित्रसंवर्धन हे शिक्षणाचे एक उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यात नैतिक वृत्ती दृढ करणे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे, असे गांधी म्हणत.

३ शिक्षणाच्या माध्यमातून समता, सहिष्णुता व सहकार्य निर्मिती हे शिक्षणाचे एक उद्दिष्ट आहे.

४ संस्कृती हा शिक्षणाचा पाया आहे. धननिर्मितीसाठी विद्येचा उपयोग करु नये. [३३]

### २.७.२ शिक्षणाच्या माध्यमासंबंधी गांधींचे विचार :

गांधींना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून मिळाले. पुढील शिक्षण मात्र इंग्रजीतून मिळाले. त्यामुळे कित्येक गोष्टी नीटपणे समजत नसत, अशी कबुली स्वतः गांधींनी दिली आहे. इंग्रजी माध्यम असणारी

शिक्षणपध्दती चुकीची आहे असे गांधींचे मत होते. सर्व शिक्षण विद्यार्थ्यांना प्रादेशिक भाषेतून दिले जावे, असे गांधींना वाटे. कोणत्याही परिस्थितीत इंग्रजी ही राष्ट्रीय भाषा होऊ शकत नाही. भारतीय परंपरा, संस्कृती, साहित्य व कला यांपैकी कोणत्याही गोष्टीशी इंग्रजी भाषेचा मेळ बसत नाही, ही राष्ट्रभाषा नको, असे गांधींचे मत होते.

हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून गांधींना मान्य होती. राष्ट्रभाषेच्या गांधींनी काही कसोट्या सांगितल्या होत्या. राष्ट्रभाषा ही साधी, सरळ, सोपी असावी. ती भाषा अधिकारीवर्गास शिकण्यास सोपी असावी. भारतातील बहुसंख्य लोकांना ती समजेल अशी असली पाहिजे. राष्ट्रभाषेच्या माध्यमातून धार्मिक आर्थिक, राजकीय व्यवहार करता आले पाहिजेत. या सर्व कसोट्यांना हिंदी भाषा उतरु शकते. इंग्रजी भाषेत यांपैकी एकही कसोटी नाही, असे गांधींचे मत होते.

दाक्षिणात्यांनी हिंदी भाषा आत्मसात करण्यावर भर द्यावा असे त्यांना वाटे. मराठी, गुजराती, सिंधी, बंगाली लोकांना हिंदी भाषा फार सोपी आहे, असेही ते म्हणत. १९१८ मध्ये त्यांनी आपले पुत्र देवदास गांधी यांना हिंदी प्रचारासाठी मद्रासला पाठवले. हिंदीच्या प्रचारकार्यात गांधींना श्री. रुंजाजी सत्यमूर्ती, जमनालाल बजाज, दादा धर्माधिकारी, आचार्य कालेलकर आदी सहकारी लाभले होते.

मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे. प्रांतीय भाषेचा दर्जा व व्यवहारीक महत्त्व वाढविण्यासाठी कोर्टकचेऱ्याचे काम त्या त्या राज्यांच्या भाषेत चालावे, अशी गांधींची इच्छा होती.

इंग्रजी भाषा म्हणजे सर्व शिक्षण, इंग्रजी समजल्याशिवाय स्वराज्य मिळणे अशक्य आहे हे समजणे चूक आहे असे गांधींना वाटे. इंग्रजी ही आमच्या गुलामगिरीची व अधःपतनाची स्पष्ट निशाणी

आहे असे गांधींना वाटे. विज्ञान, व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यवहार या क्षेत्रातील इंग्रजीचे महत्त्व गांधींना मान्य होते, मात्र इंग्रजी भाषेची सक्ती असू नये, असे त्यांचे मत होते.

### २.७.३ शिक्षकासंबंधी गांधींची मते :

शिक्षकाचे कार्य केवळ ज्ञानदान नाही तर विद्यार्थ्यात सत्य, सहिष्णुता, व सहानुभूती निर्माण करणे हे शिक्षकाचे कार्य आहे, असे त्यांचे मत होते.

देशात उत्साही, कल्पक शिक्षकांची गरज आहे. विद्यार्थी हा पुस्तकांच्या पानातून शिकण्यापेक्षा शिक्षकाच्या जीवनातून जास्त शिकतो. शिक्षकच विद्यार्थ्यांचे खरेखुरे पाठ्यपुस्तक आहे, असे गांधींना वाटे. शिक्षक हा चरित्रसंपन्न व श्रध्दवान असला पाहिजे. स्वतःच्या विषयाचे त्याला पूर्ण ज्ञान असले पाहिजे. विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा देण्यास गांधींचा विरोध होता. शालेय शिक्षणात मुले - मुली शिस्त शिकू शकली नाहीत तर त्यांच्या शिक्षणावरचा खर्च, वेळ व्यर्थ होय असे गांधी म्हणत चरित्रहीन शिक्षक हा रुचीहीन मिठासारखा होय, असे गांधींना वाटे.

### २.७.४ प्रौढ शिक्षणासंबंधी गांधींची मते :

भारतातील निरक्षरता, अज्ञान, अंधश्रध्दा, व्यावहारिक ज्ञानाचा अभाव, आरोग्याची हेळसांड इ. गोष्टींच्या पार्श्वभूमीवर गांधींनी प्रौढ शिक्षणाचा आग्रह धरला होता. देशात अधिकांश लोक निरक्षर असणे हा देशावरचा कलंक आहे. प्रौढांना फक्त अक्षरज्ञान दिले म्हणजे त्यांचे शिक्षण संपले असे नव्हे,

तर खेडेगावचे गणित, खेडेगावचा भूगोल व इतिहास, आरोग्यशास्त्र, भाषाज्ञान, पत्र लिहिणे - वाचणे इ. गोष्टी त्यांना शिकवल्या पाहिजेत असे गांधींना वाटे.

स्वराज्याच्या मागणीसाठी लोकशिक्षण आवश्यक आहे, असे गांधींचे मत होते. लोकशिक्षणाच्या दृष्टीने योग्य, सुलभ व स्वस्त साहित्याची निर्मिती करुन त्याचा प्रचार केला जावा, असे गांधी म्हणत.

विद्यार्थीवर्गाने सुटीच्या काळात खेड्यात जाऊन लोकशिक्षणाचे कार्य करावे, ब्रिटिश शिक्षणपध्दतीमुळे भारतीय शरीर, मन व आत्मा यांचा विकास खुंटला आहे असे गांधींना वाटे. ब्रिटिश शिक्षणपध्दती चुकीची आहे. तिच्यामुळे आमची कल्पनाशक्ती व सर्जनशक्ती नष्ट झाली आहे. सर्वश्रेष्ठ वेळ परकीय भाषेचे उच्चार व वाक्प्रचार पाठ करण्यात खर्च होत आहे, असे गांधींचे मत होते. मेकॉलेने शिक्षणाचा जो पाया घालून दिला त्याने आम्हाला गुलाम बनवले आहे, असे गांधींचे मत होते. राष्ट्रीय सभेचे कामकाज इंग्रजीत चालणे हे त्यांना आवडत नव्हते. इंग्रजी शिक्षण घेऊन आपण राष्ट्रास गुलाम बनवले आहे, असे गांधींना वाटे.

### २.७.५ स्त्रीशिक्षणाबाबत गांधींचे विचार :

स्त्रीशिक्षणाबाबत गांधींजींचे विचार खूप महत्त्वपूर्ण आहेत. स्त्रियांना गृहव्यवस्था, बालसंगोपन, स्वच्छता, आहारशास्त्र हे शिक्षण दिले पाहिजे असे ते म्हणत. स्त्री व पुरुष यांचा दर्जा समान आहे. हे मूलभूत सत्य समोर ठेवून स्त्रीशिक्षणविषयक योजना आखल्या पाहिजेत, असे गांधी म्हणत. भारतात स्त्री निरक्षर राहिली याचे कारण रुढीने, अन्यायाने मारलेला हीनत्वाचा शिक्का होय. स्त्रियांच्या निरक्षरतेला

पुरुष तसेच त्यांच्यातील आळस जबाबदार आहे. स्त्रीला पुरुषांनी सहचारिणी, सखी मानण्याऐवजी आपली मोलकरीण, भोगदासी मानले आहे, असे गांधी म्हणत.

स्त्री ही पुरुषजीवनाची जडणघडण करणारी, त्यांची माता व नेताही आहे. यासाठी सर्व कुटुंब साक्षर करुन कुटुंबाचा दर्जा वाढविण्यासाठी स्त्रीला ज्ञानाची गरज आहे, ही गोष्ट गांधींना पटली होती. स्त्रियांच्या पुनरुज्जीवनाचे शिक्षण हे सर्वांत प्रभावी साधन आहे, असा गांधींचा निष्कर्ष होता. सुशिक्षित भारतीय स्त्रियांनी पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करु नये तर योग्य शिक्षण, सदाचार, चारित्र्य, पावित्र्य व संयमशील वर्तनाने स्त्रियांनी सीता, दमयंती व द्रौपदी यांचा आदर्श पुढे ठेवावा असे गांधींचे मत होते, स्त्रियांनी नोकरी करावी, व्यापार - व्यवसाय करावा हेही त्यांना मान्य नव्हते.

### २.७.६ हरिजन शिक्षणासंबंधी गांधींचे विचार :

हरिजनांच्या मुलांना मिळणारे प्रारंभिक शिक्षण इतर मुलांपेक्षा वेगळे असायला पाहिजे असे गांधी म्हणत. हरिजनांच्या मुलांना समाजाने आपल्यापासून दूर ठेवल्याने त्यांच्यावर संस्कार होत नाहीत असे गांधींना वाटे. सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या हरिजन सेवक संघामार्फत हरिजनांना प्राथमिक शिक्षण देताना कसे खावे, कसे वागावे, कसे कपडे घालावेत, नाक, कान, दात, नख, डोके इ. निगा कशी राखावी व आपली शाळा व घर कसे स्वच्छ ठेवावे या गोष्टीचे शिक्षण द्यावे असे गांधी म्हणत. थोड्याशा वरच्या वर्गात चांगल्या रीतीभाती, स्वच्छ वाणी, चांगले शिष्टाचार व चांगले वागणूक इ. गोष्टींचे शिक्षण द्यावे असे गांधींचे मत होते.

**२.७.७ बालशिक्षण :**

लहान मुलांना मुळाक्षरांची ओळख करुन देण्यापेक्षा शिक्षकाने त्यास तोंडी ज्ञान दिले तर त्याचा कितीतरी अधिक विकास होईल. बाराखडी पूर्ण व्हावयास ३ - ४ वर्षे लागली तरी हरकत नाही; परंतु या तीन वर्षांत मुलांना तोंडीच व्यवहारोपयोगी व धार्मिक ज्ञान दिले जावे. गीताई वगैरेतील श्लोक त्यांना शिकवून त्यांची स्मरणशक्ती वाढवावी. बालवयातच चांगल्या अक्षरासाठी प्रयत्न केले जावेत, असा आग्रह गांधींचा होता. केवळ अक्षरओळख हा शिक्षणाचा अर्थ नाही. मुलांना अक्षरओळखीच्या कामास जुंपने म्हणजे त्यांच्या मनावर व अन्य इंद्रियावर जुलूम करण्यासारखे आहे. बालशिक्षणाचे कार्य हे स्त्रियांच्याच हाती पाहिजे अशीही गांधींची सूचना होती. गांधीं म्हणतात, की काही काळ ते पुरुषामार्फतच बालशिक्षकाचे काम व्हावे, बालकांना सर्व शिक्षण मातृभाषेतच दिले जावे. बालशिक्षणात धार्मिक शिक्षण आवश्यक मानण्यात यावे. हिंदुस्थानातील प्रत्येक घर म्हणजे एक विद्यापीठच आहे. आपल्या मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी आई-वडिल तसेच अध्यापक यांचीही आहे, अशी भूमिका गांधीं घेतात.

**२.७.८ धार्मिक शिक्षण :**

सर्व धर्माबद्दल सारखीच आदराची भावना जोपासली जावी, आपला धर्म श्रेष्ठ आहे असे विद्यार्थ्यांना शिकवू नये, असे गांधीजी म्हणत. भारतात कट्टर नास्तिकवादाचे रोपटे कधीच रुजणार नाही याची त्यांना पक्की खात्री होती. धार्मिक शिक्षणाचा प्रश्न कठीण असला तरी धार्मिक शिक्षणाशिवाय आपले चालणार नाही, असेही गांधीजी म्हणतात. धार्मिक शिक्षणाच्या अभ्यासाक्रमात आपल्या धर्माव्यतिरिक्त अन्य धर्मांच्या सिध्दांताचाही समावेश व्हावयास पाहिजे. इतर धर्माच्या अभ्यासामुळे

स्वधर्माविषयी आदरभाव वाढून तो इतर धर्माविषयी वाढू लागतो. धार्मिक शिक्षणाचा सरकारशी काहीही संबंध नाही. तर ते कार्य सर्वस्वी धार्मिक संस्थांनी करावे, असे गांधीं म्हणतात. आईवडिलांनी आपल्या मुलांना आपल्या धर्मग्रंथांची ओळख करुन द्यावी पुराणांतील जे उच्च आदर्श आहेत, धर्मनिष्ठ व त्यागी व्यक्तीची जी चरित्रे आहेत ती मुलांना सांगावीत. नीतिकथा सांगाव्यात, नीतिवचने, सुभाषिते व प्रार्थना मुलांकडून पाठ करुन घ्याव्यात. या गोष्टी आत्मिक विकासासाठी आवश्यक आहेत असे गांधींनी म्हटले होते. ज्या मार्गाने सद्‌गुणांचा विकास होतो तो मार्ग म्हणजे धार्मिक शिक्षण होय. सत्य आणि अहिंसा या दोन सद्‌गुणांची जोपासना शिक्षकांनी करावी असे गांधीं म्हणत.

### २.७.९ विद्यापीठीय शिक्षण :

१९२१ मध्ये गुजरात विद्यापीठ स्थापन झाले व गांधीचे विद्यापीठीय शिक्षणासंबंधीचे विचार पुढे आले. गुजरात विद्यापीठाने जे कार्य केले त्याचे गांधीं कौतुक केले आहे. महाविद्यालये हे पवित्र मंदिर आहे. शाळा - महाविद्यालये ही चरित्र संवर्धनाची केंद्रे असली पाहिजेत असे ते म्हणत. Schools and colleges should be the factories of charactor building. महाविद्यालय हे जनसेवकांचे निर्माणस्थळ आहे, असे गांधींचे मत होते. महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या तरुणांनी काहीतरी नवे शोधण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. आपल्या ज्ञानशाखांत समाजोपयोगी असे काहीतरी नवीन शोधत राहिले पाहिजे असे गांधींचे मत होते. कॉलेजातील शिक्षणाचा व राष्ट्रीय गरजांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. विद्यापीठाच्या स्थापनेसाठी लागणारा पैसा गोळा करणे हे लोकशाही सरकारचे काम नव्हे. लोकांना गरज असेल तर लोकांनीच पैसा देऊन विद्यापीठे उभी करावीत. अशी विद्यापीठे देशाचे भूषण ठरतील

असे गांधी म्हणत. संपन्न भाषांची व त्या भाषा बोलणाऱ्या लोकांची संपूर्ण उन्नती व्हावयाची असेल तर अशा विद्यापीठांची गरज आहे. शिक्षणासाठी अशा विद्यापीठासाठी प्रचंड व खर्चीक इमारतीची गरज नाही तर उत्तम शिक्षकांची आहे, असे गांधींची भावना होती.

### २.७.१० लैंगिक शिक्षण :

कामवासना ही एक सुंदर व उदात्त गोष्ट आहे. तिचा दुरुपयोग हा गुन्हा आहें. गांधींच्या मते, तरुण मुलामुलींना ज्ञानेंद्रियांचे कार्य व उपयोग याबद्दल माहिती देणे आवश्यक आहे. कामवासनेचे भूत डोक्यात असले तर सर्वनाश होतो. योग्य वेळी योग्य अशी माहिती  देणे आवश्यक आहे. कामविज्ञानाची माहिती अधिकारी व्यक्तीकडून द्यावी असे त्यांना वाटे. लैंगिक शिक्षणाचा हेतू कामवासनेवर जय मिळवणे हा असला पाहिजे असे त्यांचे मत होते.

### २.७.११ शिक्षणातील विषय :

विद्यार्थ्यातील उपजत गुणांना वाव देण्यासाठी व्यायाम, खेळ, व्यवसाय, चित्रकला व संगीत या गोष्टी इतर विषयांबरोबर शिकवल्या जाव्यात, अशी गांधींची इच्छा होती. पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन व मुद्रण कार्य सरकारने आपल्या ताब्यात घ्यावे, अशी सूचना गांधींनी केली होती. उच्च शिक्षणात व्यापार, उद्योग, तांत्रिक कला, उच्च साहित्य, संगीत व विविध शास्त्रे यांचा समावेश असावा. विद्यापीठांनी आपला सर्व खर्च परीक्षा शुल्कातून भागवावा, असे गांधीं म्हणत.

**२.७.१२ वर्धा शिक्षण योजना :**

जीवन, संस्कृती व शिक्षण यांचा सातत्याने व एकात्मतेने विचार करणारी वर्धा शिक्षण योजना आपल्या अनुभवाचे सार म्हणून गांधींनी भारतास दिली. स्वत: गांधी म्हणत "मी हिंदुस्थानला आजपर्यंत अनेक चांगल्या गोष्टी दिल्या. त्यांत वर्धा शिक्षण योजना ही सर्वांत चांगली योजना होय."

या योजनेमागे गांधींची ४० वर्षांची तपस्या, चिंतन व प्रयोग होते. वर्धा शिक्षण योजना म्हणजे गांधींजींच्या जीवनभर चालवलेल्या विचारमंथनातील अमृतच होय.

२२, २३, ऑक्टोबर १९३७ रोजी येथे भरलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय परिषदेसमोर गांधींनी वर्धा शिक्षक योजनेची मांडणी केली. या योजनेतील मुख्य कलमे -

१) ७ ते १४ वर्षापर्यंतच्या मुला - मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे.

२) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

३) शिक्षण कोणत्या तरी उत्पादक उद्योगाच्या व्दारे देण्यात यावे.

४) निवडलेल्या उत्पादक उद्योगातून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सुटावा. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे. आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक असल्यामुळे सात वर्षाची प्राथमिक शिक्षणाची योजना गांधींना आवश्यक वाटत होती. ते म्हणत, I think we can postpone the question of higher education for sometime, but the problem of primary education can not be postponed for a minute.

मातृभाषेतून शिक्षण देणे हाच शिक्षणाचा पाया आहे, व त्यातून विद्यार्थ्यांच्या आत्मविकासास खरा वाव मिळतो, अशी गांधींची खात्री होती.

वर्धा शिक्षण योजना कृतिकेंद्रित असल्यामुळे ती मानसशास्त्रीय तत्त्वांशी अधिक सुसंगत आहे. उद्योगामुळे विद्यार्थ्यांना आपली ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये उपयोगात आणता येतात. पुस्तकी शिक्षणाच्या जुलमातून विद्यार्थ्यांची सुटका करुन त्यांच्या चैतन्यशील स्वभावाला चांगला वाब मिळतो असे गांधींना वाटे. उद्योगामुळे अनुभव येतो व त्यातून आत्मविश्वास, सौंदर्यरुची व जबाबदारीची जाणीव वाढीस लागते व मानसिक आनंदाचे संवर्धन होते. उद्योगाव्दारे शिक्षण दिले जात असल्यामुळे बुध्दिजीवी, श्रमजीवी वर्ग निर्माण होत नाहीत. अशा पध्दतीतून सामाजिक सहकार्य, त्याग, बंधुता, यांची भावना वाढीस लागते. कृतिकेंद्रित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या रचनात्मक प्रवृत्तीस वाव मिळून ज्ञान जीवनाशी एकरुप होते.

शिक्षणातून विद्यार्थ्यांना स्वावलंबी, सज्ञान, सक्षम व सतेज बनविण्यासाठी गांधींनी राष्ट्राला नवी शिक्षणपध्दती दिली. भारतीय संस्कृतीच्या आदर्शाला नवा अर्थ लावून आधुनिक काळातील समस्या व विचाराशी मेळ घालण्याचा प्रयत्न त्यांनी शैक्षणिक विचारातून केला होता.

राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग १९०५ सालच्या बंगालच्या फाळणीनंतर बंगाल प्रांतात सुरु झाला: पण हा प्रयोग निष्फळ झाला. या प्रयोगावर व्यवस्थापकांची श्रध्दा नव्हती. तसेच बंगालमधील सुशिक्षित वर्गास इंग्रजीचे फार वेड होते. त्यामुळे त्या प्रयोगाला यश आले नाही, असे गांधींचे निरीक्षण होते.[३४]

गांधी म्हणत, "By education I mean allround drawing out of the best child and man body, mind and spirit."[३५]

गांधींच्या शैक्षणिक विचारास त्यांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले होते. त्या शिक्षणप्रणालीचे आचार्य कृपलानी यांनी खालीलप्रमाणे मूल्यमापन केले.

"Gandhi laid down the foundation of a scheme of national education suited to our needs, reguirements and genious and our aspirations for the future. It is for us to perfect it and extend it to cover the entire field of education. In this process adjustment and adaptation may be necessary. But these must be undertaken in the spirit of the total philosphy of Gandhi for the individual and society."[३६]

## २.८ महात्मा गांधींचे धर्मासंबंधी विचार :

महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर कोणतीही परंपरा, संप्रदाय, धर्मादाय, धर्मग्रंथ व गुरु यांची एकसुरी छाप दिसत नाही. अनेक ग्रंथ व संप्रदाय यांतून गांधींनी विचार, प्रेरणा व तत्त्वे आत्मसात केली होती. गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर खालील घटकांचा प्रभाव होता.

१) आई-वडिलांच्या शिकवणुकीतून सर्वधर्मसमभावाचा संस्कार.

२) बौध्द, जैन, वैष्णव या धर्म व पंथांतील अहिंसावादी परंपरांचा प्रभाव.

३) रामायण, महाभारत व भगवद्गीता, तुलसी रामायण या ग्रंथांचा प्रभाव.

४) टॉलस्टॉय, रस्किन, थोरो यांच्या विचारांचा प्रभाव.

५) ख्रिश्चन धर्मातील मानवतावादी मूल्यांचा प्रभाव.

६) सामाजिक उत्क्रांतिवाद, क्रांत्या, संस्था इ. चा गांधींवर फारसा प्रभाव पडला नाही.

७) इंग्लंडमधील शाकाहारी चळवळीचाही गांधींवर प्रभाव पडला होता.

गांधींच्या एकंदर विचारसरणीचा पाया धार्मिक व नैतिक स्वरुपाचा आहे. सर्व ठिकाणी नीती व धर्म यांस त्यांनी महत्त्व दिले आहे. माणसाचे जीवन धर्माधिष्ठित असले पाहिजे, असे ते म्हणत. मनुष्याच्या राजकीय जीवनाचा आधारही धर्म असला पाहिजे. राजकारण धर्महिन झाले तर ते विनाशाकडे गेल्याशिवाय राहणार नाही. धर्मापासून राजकारणाला विभक्त करणे म्हणजे समाजास अधोगतीच्या दिशेने नेणे होय असे गांधी म्हणत.

धर्म मानवी मनाची मूलभूत गरज आहे असे गांधीं म्हणत. "माझ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध कार्यांची प्रेरणा धार्मिक आहे. धर्म हेच माझ्या जीवनाचे प्राणतत्त्व आहे. त्याशिवाय मी क्षणभरही जगू शकत नाही," असे स्वतः गांधींनी म्हटले होते. धर्म हाच जगाचा आधार आहे. भौतिक सुधारणा म्हणजे सर्वस्व होय असे मानून धर्मभावना नष्ट करण्याचा कितीही प्रयत्न झाला तरी त्या प्रयत्नास यश येणार नाही, अशी गांधींची धारणा होती.

गांधींचे धर्मविषयक विचार भाषणे, स्फुट लिखाण व मुलाखतींमधून विखुरलेले आहेत. टिळक किंवा अरविंद घोष यांच्याप्रमाणे त्यांनी स्वतंत्र ग्रंथ लिहून आपल्या विचारांची सुसंगतपणे किंवा समग्रतेने मांडणी केली नाही. गांधीजी म्हणतात, धर्म याचा अर्थ संप्रदाय नाही. धर्म म्हणजे विश्वाच्या नियमबध्द नैतिक शासनावरील श्रध्दा. श्रध्देवाचून हे जग क्षणार्धात अर्थशून्य होईल. हजारो वर्षापूर्वी होऊन गेलेल्या प्रेषितांवर व अवतारांवर श्रध्दा ठेवणे हा एक भ्रामक समजुतीचा प्रकार नाही तर आंतरिक, आध्यात्मिक गरजेची पूर्ती आहे. प्रत्येकाने ईश्वरावर व धर्मावर श्रध्दा ठेवावी असे गांधी म्हणत.

धर्म हा शब्द उच्चारला, की हिंदू, जैन, बौध्द, ख्रिस्ती, ईस्लाम इ. प्रमुख धर्म आपल्या दृष्टीसमोर उभे राहतात; परंतु गांधींची धर्मकल्पना या परंपरागत धर्मकल्पनेपासून वेगळी आहे. ईश्वराची इच्छा,

मोक्ष, आत्मशुध्दी, यज्ञ, तपस्या, त्याग, व्रतपालन, संयम, लीनता इ. धार्मिक परिभाषेतील शब्द त्यांच्या लिखाणात व भाषणात वारंवार येतात.

गांधींची धर्मकल्पना वरील धर्मांच्या परंपरागत धर्मकल्पनेहून अगदी भिन्न आहे. तिच्यात सांप्रदायिकता व साचेबंदपणा यांचा लवलेशही नाही. धर्माच्या गांधीप्रणीत कल्पनेत सामान्यत: ईश्वर व सृष्टी व मानव यासंबधी मूलभूत विचार, मानवाचे जीवित साकल्य, नीतिमीमांसा, उपासना पध्दती व नित्यनैमित्तिक आचार या गोष्टींचा समावेश होतो. गांधींजी सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करत; पण पूजाअर्चा, तीर्थयात्रा, कर्मकांड इ. गोष्टींना ते मुळीच महत्त्व देत नसत. आत्मोन्नतीला उपकारक मार्ग म्हणून प्रार्थना, उपवास, मौन या पारंपारिक साधनांची गांधीं तरफदारी करतात.

गांधीच्या मते, सर्व धर्म सारखेच पवित्र आहेत. तेव्हा प्रत्येक मनुष्याला आपल्या धर्माच्या द्वारे स्वत:ची भौतिक व पारमार्थिक उन्नती साधता येईल. देशकालपरत्वे वेगवगळ्या स्वरुपात अनेक धर्म अस्तित्वात आले असले तरी सर्व धर्मांच्या मुळाशी एकच शाश्वत धर्म असून तोच विश्वधर्म होय असे गांधींनी वारंवार सांगितले. धार्मिक व ईश्वरी अस्तित्वावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्ती या निर्भय असतात. सत्य व न्याय यावर त्यांची श्रध्दा असते असेही गांधी म्हणत.[३७]

## ४) सत्य हाच परमेश्वर :

गांधींच्या मनावर हिंदूधर्मातील अध्यात्मवादी परंपरेचे दृढ संस्कार झाले होते. आत्म्याचे अमरत्व, आत्मशुध्दी, पुनर्जन्म, कर्म हे शब्द त्यांच्या लिखाणात वारंवार आले आहेत. आत्म्याचे स्वरुप व मानवी व्यवहाराशी त्यांचा असलेला अनुबंध यांचे संशोधन करणारे शास्त्र म्हणजे धर्म होय, असे

गांधी म्हणत. "Religion deals with the science of the soul" परमेश्वराचे अस्तित्व मानवी बुध्दीने सिध्द करता येत नाही. त्याचे कारण मानवी बुध्दीच्या मर्यादा होत, असे गांधी म्हणतात. त्यांनी तर्कशुध्द व्यक्तित्वाच्या आधारे परमेश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा प्रयत्न कधी केला नाही. जगाचे नैतिक शासन करणारे हे जे परमेश्वरी नियम आहेत, त्यांच्या मुळाशी असलेले तत्त्व म्हणजे सत्य होय. हे सत्य शोधून काढून त्याप्रमाणे वर्तन करणे हीच ईश्वरशक्ती होय. आयुष्यातील एखाद्या बिकट प्रसंगी आपले कर्तव्य कोणते? सत् आणि असत्; कार्य व अकार्य, नीती व अनीती याचा निर्णय करण्याची कसोटी कोणती ? असा प्रश्न अर्जुनाप्रमाणे प्रत्येक माणसाच्या मनात संभ्रम निर्माण करतो. अशा वेळी माणसाच्या हृदयातील दैवी प्रेरणा जो निर्णय देईल; तेच सत्य होय अशी गांधींची सत्याची व्याख्या विज्ञानाला मान्य होणारी नाही. सत्याचा शोध ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. मानवाच्या आत्मविकासाशी ती निगडित आहे. मानव हा स्वभावतःच अपूर्ण असल्याने त्याने कितीही एकनिष्ठेने तपश्चर्या केली तरी संपूर्ण सत्याचे आकलन त्याला कधीच होणे शक्य नाही असे गांधीजी म्हणतात.[३८]

५) हिंदू धर्मावर गांधींची अढळ श्रध्दा होती. स्वतःला सनातनी हिंदू म्हणवून घेण्यात त्यांना अभिमान वाटे. वेद, उपनिषद, पुराणे, यांबद्दल त्यांना आदर होता. भागवद्‌गीता हा श्रेष्ठ ग्रंथ आहे असे ते मानत असत. गीताबोध ही गीतेचा मथितार्थ सांगणारी एक छोटी पुस्तिका त्यांनी लिहिली होती.

आत्म्याचे अमरत्व, पुनर्जन्म, मोक्ष, कर्मवाद, वर्णाश्रम, धर्म या हिंदू धर्मास पायाभूत असणाऱ्या कल्पनांचा त्यांच्या विचारावर पगडा दिसतो; तरीही त्यांची धर्मकल्पना सनातनी धर्मपंडितांच्या विचारांहून वेगळी आहे.

६)	हिंदू धर्म प्रचंड वृक्षासारखा आहे. त्यात विविध पक्ष व संप्रदाय आहेत. या धर्मात वैगुण्ये नाहीत असे नाही; पण त्याचा मूलस्त्रोत गंगेच्या प्रवाहासारखा पवित्र आहे. शेकडो वर्षे वाहत असलेल्या त्याच्या प्रवाहात काही घाणही साचून राहिली आहे असे ते म्हणत.

एखादे शास्त्रवचन बुध्दीस न पटणारे व अनुभवांच्या विरोधी असेल तर त्याचा त्याग करणेच श्रेयस्कर आहे, असे गांधीजी म्हणत.आपल्या धर्मातील दोष काढून टाकण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे असे गाधीं म्हणत. अस्पृश्यता, जन्मसिध्द विषमता, कर्मकांड, व्रतवैकल्य, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व हे हिंदू धर्मातील दोष आहेत असे ते म्हणत. अस्पृश्यतेला शास्त्रांचा आधार नाही. अस्पृश्यता शास्त्रसंमत आहे असे सांगण्यास माझ्याविरुध्द सर्व हिंदुस्थान उभा राहिला तरी मी ते कधीच मान्य करणार नाही, असे गांधीं म्हणत. अस्पृश्यता हा हिंदूधर्मावरील कलंक आहे, अस्पृश्यता पाळणे हा काही धार्मिक विधी नाही असे गांधीं म्हणत.

७)	गांधींचा पुनर्जन्म व कर्मवाद यावर विश्वास होता. प्रत्येक माणसाचा स्वभाव व त्याची प्रवृत्ती हा भूतकाळातील त्याच्या वर्तनाचा व कृत्यांचा परिणाम आहे याबद्दल त्यांच्या मनात संदेह नव्हता. प्रत्येक माणसाच्या मनाची जडणघडण हा त्याच्या पूर्वकर्माचाच परिपाक असतो असे गांधीं म्हणत.

मंदिरात जाण्याची किंवा मूर्तिपूजा करण्याची गांधींना स्वतःला कधी आवश्यकता वाटली नाही; पण भारतातील कोट्यांवधी लोक मूर्तिपूजक होते. त्यांच्या भावनेबद्दल त्यांना आदर होता. मूर्तिपूजेमुळे अंधश्रध्दा, पुरोहितशाही, चमत्कारप्रियता वाढीस लागते व या गोष्टी खऱ्या धर्मभावनेच्या विरुध्द आहेत असे गांधी म्हणत.[३९]

८) गांधींचा धर्मांतरास विरोध होता. धर्म हा शेकडो वर्षे जगातील विविध देशांतील समाजजीवनाचा पाया होता. प्रत्येक माणसाची बौध्दिक व मानसिक जडणघडण ज्या सांस्कृतिक परंपरेतून झाली, तिला सर्वत्र धर्माचेच अधिष्ठान होते असे गांधीजी म्हणत. हिंदू साहित्य व इतर धर्माबद्दल त्यांच्या मनात आदर होता. दुसऱ्या धर्मातील उत्तमोत्तम तत्त्वांचा आपल्या धर्मात समावेश करुन आपल्या धर्माचा विकास करावा, त्यामुळे कोणासही धर्मांतराची गरज नाही, असे गांधीजी म्हणतात.[४०]

गांधींनी धर्मसहिष्णुतेची कल्पना आग्रहाने मांडली. ते म्हणतात, "भारतासंबंधी माझी जी स्वप्ने आहेत त्याच भारतात केवळ एकच धर्म सर्व हिंदू किंवा सर्व ख्रिश्चन किंवा सर्व मुसलमान राहावा, अशी माझी मनीषा नाही तर भारतातील सर्व लोक पूर्णपणे सहिष्णू असावेत व सर्व धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहावेत, अशी माझी इच्छा आहे."

गांधी म्हणत, "सत्य व सदाचार याहून अधिक श्रेष्ठ असा धर्म नाही, निरनिराळे धर्म हे एकाच विश्वधर्माचे पैलू आहेत. परमेश्वर हाच सर्व धर्मांचे उगमस्थान असल्याने प्रत्येक धर्मातून शाश्वत सत्याचाच आविष्कार होतो" धर्मानेच सामान्य माणसांना नैतिक जीवन जगण्याची प्रेरणा दिलेली आहे असे त्यांना वाटत असे. मानवी व्यवहार न्यायाच्या व नीतीच्या पातळीवर आणण्यासाठी सदैव झटणे ही खरी ईश्वराची उपासना आहे असे गांधींना वाटत होते.[४१]

## २.९ सारांश

अशा प्रकारे आपण गांधींवाद या प्रकरणात गांधीजींचे समग्र विचार अभ्यासण्याचा प्रयत्न केला. गांधींचे समग्र सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार, स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान यावरुन हे स्पष्ट होते, की भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म. गांधींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते. निर्मलकुमार बोस_यांनी म्हटले "भारतीय राजकारणात गांधींचा अवतार झाला नसता तर सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे तरुण वळले असते यात शंका नाही."

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी म्हटले "जी माणसे गांधींच्या प्रत्यक्ष सहवासात येतात त्यांनाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी कळून येते."

विनोबा भावे यांच्या मते, भगवान बुध्दांनंतर सत्य, अहिंसेचा एवढा मोठा पुजारी दुसरा झाला नाही. रवींद्रनाथ टागोरांनी म्हटले, असाधुतेशी साधुत्वाने कसे झगडावे याची शिकवण देणारा हा एक महामानव होता. ऑईनस्टाइन गांधींबद्दल म्हणतो, हाडामांसाचा हा महामानव आमच्यात होता यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही.

**संदर्भ सूची :**


१) पटवर्धन सीताराम पुरुषोत्तम (१९५१): महात्माजींचे सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा : मराठी अनुवादः पृ.क्र.५.

२) कित्ताः पृ. ६२.

३) कित्ताः पृ. ६३.

४) म.गांधीः एका पुस्तकाचा विलक्षण परिणामः (खंड चौथा) प्रकरण १८ वेः पृ.क्र.२७५ ते २७७

५) म.गांधी : रोमां रोलां : पृ.क्र. ३६.

६) मुनशी के.एम.:आय फॉलो दि महात्मा : पृ.क्र. १०-११

७) फिशर लुईः दि लाईफ ऑफ महात्मा गांधीः भाग दुसरा १९६५, पृ.क्र.२५५

८) भारदे बाळासाहेबः गांधी विचारमीमांसा : महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे १९९३: पृष्ठ क्र. ३

९) उद्धृतः कित्ता : पृ. १४

१०) जोशी लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश खंड ४ : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९७६: पृ.९४२.

११) कित्ताः पृ. ९४३-४.

१२) भारदे पूर्वोक्त : पृ. ७

१३) कित्ताः पृ. ४३

१४) प्यारेलाल : महात्मा गांधी-दि लास्ट फेज, खंड दुसरा : नवजीवन  पब्लिशिंग हाऊस : अहमदाबाद १९५६: पृ. १३९.

१५) कित्ता

१६) ॲम्बलर रेक्सः गांधीयन पीसमेकिंग फॉर दि वेस्ट, व्ही. टी. पाटील (संपा.) न्यू डायमेन्शन्स अँड पर्स्पेक्टिवज् इन् गांधीझम्: इंटर इंडिया पब्लिकेशनः न्यू दिल्ली १९८९: पृ.३७६

१७) डॉक्टर, आदि हो : सर्वोदय-ए पोलिटिकल अँड इकॉनॉमिक स्टडी : आशिया पब्लिशर्सः मुंबई १९६७: पृ. ३.

१८) कित्ता

१९) जोशी : पूर्वोक्तः पृ. ९४२.

२०) गाठाळ साहेबराव : आधुनिक राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्र. २२६,२२७,२२८,२२९,२३०.

२१) वकील व्यंकटेश : गांधी विचार दर्शन, अहिंसा विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे,  १९९४, पृ.क्र. ०८ ते २४

२२) वकील व्यंकटेश : गांधी विचार दर्शन, अहिंसा विचार महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, १९९४, पृ.क्र. ४५ ते ६१.

२३) गाठाळ साहेबराव  : कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष १९९९-२०००, पृ.क्र. २३०

२४)	भारदे बाळासाहेब : गांधी विचार दर्शन, सत्याग्रह विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ०१ ते ०४

२५)	भारदे बाळासाहेब : गांधी विचार दर्शन सत्याग्रह विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. १६,१७.

२६)	भारदे बाळासाहेब : गांधी विचार दर्शन सत्याग्रह विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ४८ ते ६५.

२७)	गाठाळ साहेबराव : कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रकाशनवर्ष १९९९-२०००, पृ.क्र. २३०,२३१.

२८)	गाठाळ साहेबराव : कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रकाशनवर्ष १९९९-२०००, पृ.क्र. २३२ ते २३७.

२९)	गाठाळ साहेबराव : कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रकाशनवर्ष १९९९-२०००, पृ.क्र.२३७ ते २४४.

३०)	कुंभार नागोराव : महात्मा गांधी : विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन लातूर, प्रकाशन वर्ष डिसेंबर १९९५, पृ.क्र. २४,२५

३१)	कुंभार नागोराव : महात्मा गांधी : विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन लातूर, प्रकाशन वर्ष डिसेंबर १९९५, पृ.क्र. ३६,३७,३८, ११८

३२)	अकोलकर ग. वि. : गांधी विचार दर्शन, शिक्षण विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ११,१२

३३) अकोलकर ग. वि. : गांधी विचार दर्शन शिक्षण विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. १८,१९

३४) अकोलकर ग. वि. : गांधी विचार दर्शन, शिक्षण विचार, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ८४ ते १२८

३५) गाठाळ साहेबराव : आधुनिक भारतीय विचारवंत कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष १९९९-२०००, पृ.क्र. २६१

३६) गाठाळ साहेबराव : आधुनिक भारतीय विचारवंत कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष १९९९-२०००, पृ.क्र. २६२

३७) धर्माधिकारी भाऊ : गांधी विचार दर्शन, धर्मविचार खंड ०१, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ०१ ते १५

३८) धर्माधिकारी भाऊ : गांधी विचार दर्शन, धर्मविचार खंड ०१, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ७५ ते ७९

३९) धर्माधिकारी भाऊ : गांधी विचार दर्शन, धर्मविचार खंड ०२, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. ०१ ते ०४

४०) धर्माधिकारी भाऊ : गांधी विचार दर्शन, धर्मविचार खंड ०२, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र. १३०,१३१

४१) धर्माधिकारी भाऊ : गांधी विचार दर्शन, धर्मविचार खंड ०२, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष १९९४, पृ.क्र.१२०,१२१,१२२,१२३